**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी**. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविण्याची आवश्यकता

**मु.शी**. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविण्याची आवश्यकता या विषयावर सर्वश्री संजय दत्त,सुरेशदादा देशमुख, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी,श्री.उल्हास पवार,डॉ.वसंत पवार, श्री.भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु......

प्रा. बी.टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, युवा धोरणा विषयीचा प्रस्ताव सन्माननीय संजय दत्त आणि इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे त्यावर काल मी या सभागृहात माझे विचार व्यक्त करीत होतो.

सभापती महोदय, मी माझे विचार व्यक्त करीत असताना सुरुवातीलाच असे सांगितले होते की, सर्वसामान्यपणे युवा धोरण ठरवताना ज्या बाबी विचारात घेण्यात येत आहेत त्याच्या पेक्षा वेगळी स्थिती महाराष्ट्रात आहे ती विचारात घेणे अगत्याचे आणि अपरिहार्य आहे. सामान्यपणे युवा धोरण ठरवताना ज्या बाबी विचारात घेऊ त्यापेक्षा वेगळया अशा काही गोष्टी अपरिहार्यपणे लक्षात घेतल्या पाहिजेत. सभापती महोदय, या युवा धोरणामध्ये दोन अतिशय महत्वाच्या बाबी मी काल सांगितलेल्या होत्या. दुर्मिळ शिक्षण विशेषत: टेक्निकल, तांत्रिक व मेडिकलच्या शिक्षणामध्ये युवकांना शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे. यामधील सर्व विभागांचा सहभाग आणि समभाग हा पहिला मुद्दा आणि शासकीय सेवांमध्ये राज्यातील सर्व विभागांना समभाग आणि सहभाग या दोन मुद्याकडे युवा धोरण ठरवताना या समितीने आणि माननीय मंत्रिमहोदयांनी विशेष लक्ष दिले पाहिजे असे प्रतिपादन मी काल करीत होतो. हे करण्याचे कारण मी सांगू इच्छितो. विशेषत: महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या राज्याच्या फाऊंडेशनचा आपल्याला विसर पडता कामा नये. या राज्यातील तीनही भागांतील नेत्यांनी एकत्र येऊन ठरवलेले हे फाऊंडेशन आहे. 1953 मध्ये या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख.....

तीनही भागातील नेते नागपूरमध्ये एकत्र बसले आणि त्यांनी असे ठरवले की, मराठी भाषा बोलणारांचे एक राज्य झाले पाहिजे अशी आमची इच्छा आहे आणि ही इच्छा व्यक्त करीत असताना आम्ही या तीनही भागातील नेते काही गोष्टी सहमतीने मान्य करीत आहोत. त्यामध्ये अनेक गोष्टी आहेत. पण त्यातील पहिल्या तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे विदर्भ,मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या तीनही भागामध्ये विकासासाठी ज्या निधीचे वाटप होईल त्याचे समन्यायी वाटप केले जाईल. नोकऱ्यांमध्ये जे प्रतिनिधीत्व द्यावयाचे आहे हे शासकीय नोकऱ्यांमधील प्रतिनिधीत्व या तीनही विभागांना समप्रमणात दिले जाईल. इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन केले जाईल आणि शिक्षणाच्या संधीमध्ये विशेषत: तांत्रिक शिक्षणाच्या संधीमध्ये या तीनही विभागाना समभाग व सहभाग दिला जाईल.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

त्या इतिहासाची पूर्ण माहिती असलेले माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगरावजी कदम सभागृहामध्ये उपस्थित झालेले आहेत. हे तीन विभागाचे नेते नुसते आपसात करार करुन थांबले नाहीत तर महाराष्ट्रातील तीनही विभागातील या सर्व नेत्यांनी, जी राज्य पुनर्रचना समिती होती, ज्याला जॉईन्ट सिलेक्ट कमिटी ऑफ पार्लमेंट असे आपण म्हणू ती समिती त्यावेळचे माननीय गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली होती. त्या जॉईन्ट सिलेक्ट कमिटीपुढे हे सर्व नेते गेले आणि त्या नेत्यांनी जाऊन त्या जॉईन्ट सिलेक्ट कमिटीला असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यासाठी जे अधिष्ठान आहे, जे फाऊंडेशन आहे त्याला आपण कायदेशीर दर्जा द्यावा, घटनात्मक दर्जा द्यावा अशी आमची या समितीला विनंती आहे. मी मुद्दाम या जॉइन्ट सिलेक्ट समितीचा जो रिपोर्ट आहे त्यातील एक लहानसे वाक्य आपल्याला वाचून दाखवतो. या रिपोर्टमध्ये पृष्ठ क्रमांक 4 वर मूळ क्लॉज 21 मध्ये असे म्हटले आहे की, "It was argued before the Committee by its Members from the Vidarbha that the agreement entered into on September, 1953, known as Nagpur Agreement, should to the extent practicable be given constitutional recognition. The Members from other Maharashtra area gave their full support to this proposal. A new clause has accordingly been added to the proposed Article 371 with the consent of the Members from Maharashtra." महाराष्ट्रातील सर्व सदस्यांनी एकमताने आमच्यासमोर ही जी विनंती केलेली आहे ती मान्य करुन आम्ही भारताच्या घटनेमध्ये हे नवीन कलम सुचवित आहोत आणि त्यातून 371(2) या कलमाचा जन्म झाला. 1956 मध्ये हे कलम देशाच्या घटनेमध्ये आले. हा इनेब्लींग क्लॉज आहे. त्यामध्ये माननीय राष्ट्रपतींना अधिकार दिलेले आहेत. त्याचा वापर झालाच पाहिजे असे नाही. जर गुण्यागोविंदाने आपले सर्व नीट चालत असेल तर त्याचा वापर करण्याची गरज नाही. 1956 नंतर 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि 20-22 वर्षानंतर या राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांवर अशी पाळी आली की, 26 जुलै, 1984 ला दोन्ही सभागृहांनी ठराव करुन एकमताने देशाच्या माननीय राष्ट्रपतींना विनंती केली की, आपण आता 371(2) चा वापर करावा. 371 (2) चा

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वापर दहा वर्षानंतर झाला. ठराव केल्यानंतर 10 वर्षाने म्हणजे 9 मार्च, 1994 ला समन्यायी वाटपाबाबतचे आदेश निघाले. समन्यायी वाटपाबाबतचे आदेश निघाल्यानंतर दोन बाबतीत वारंवार विनंती करुन सुध्दा निदेश निर्गमित झाले नाहीत. विकासाच्या बाबतीत निदेश निर्गमित झाले. विशेषत: जलसिंचनाच्या बाबतीत राज्यपालांनी निदेश निर्गमित केले. 1994 मध्ये माननीय राष्ट्रपतींनी आदेश काढल्यानंतर विकासाच्या बाबतीत फक्त जलसिंचनाचा पहिला आदेश डिसेंबर, 2001 मध्ये निर्गमित झाला. त्याची पुढे काय वाताहत झाली हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. या विषयामध्ये ते लागू नाही. पण या तीन भागांत नोकऱ्यांमध्ये समन्यायी वाटप झाले पाहिजे ही एक गोष्ट आणि शिक्षणाच्या ज्या दुर्मिळ संधी आहेत म्हणजे जेथे प्रवेश मिळत नाही अशा ठिकाणी त्यांचे समन्यायी वाटप झाले पाहिजे या दोन बाबतीत वारंवार विनंती करुन सुध्दा आदेश निघालेले नाहीत.

सभापती महोदय, ज्यावेळी कृषी मंत्री एका जिल्ह्यातील आहेत म्हणून दुसऱ्या एखाद्या भागात त्या जिल्ह्यातील सर्व लोक कृषी सहाय्यक म्हणून येतात तेव्हा तरुणांच्या मनावर त्याचा काय आघात होतो हे मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे आणि स्वत: सभागृहात मांडलेले आहे. सभागृहाने त्याबाबत थोडेफार रिलीफ दिले, नाही असे नाही. पण सभागृह हे रोज रिलिफ देण्याचे काम करु शकत नाही. मूळ ज्या यंत्रणा आहेत त्या मजबूत असल्या पाहिजेत. या भागातील माणसाला त्या भागात मारहाण होणे आणि त्या भागातील माणसाला या भागात मारहाण होणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ही चांगली गोष्ट नाही. म्हणून माझी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती आहे की, युवा धोरणाचे बाकीचे मुद्दे लक्षात घेत असताना या राज्याचे फाऊंडेशन असलेले हे जे दोन मुद्दे आहेत त्याकडे आपण दुर्लक्ष करु नका. हे दुर्लक्ष करणे अत्यंत महाग पडेल. त्याची फार मोठी किंमत महाराष्ट्राला चुकवावी लागेल. त्याची उदाहरणे सुरु झालेली आहेत. आपण अनेक ठिकाणी पाहिलेले आहे. सावंतवाडीला काय झाले, अकोल्याला काय झाले हे आपण पाहिलेले आहे. म्हणजे मराठवाडा विद्यापीठातील एखाद्या माणसाला अकोल्याला प्रवेश मिळाल्यानंतर अकोल्यातील लोकांनी त्याला मारहाण करणे किंवा अकोल्यातील एखादा मनुष्य सावंतवाडीला आल्यानंतर त्या ठिकाणी

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B-3

RDB/ D/ ST/ पूर्वी कु. थोरात 10:35

प्रा. बी. टी. देशमुख ....

असा प्रकार होणे ही गोष्ट योग्य नाही. याला आपण बैठक द्या. मी आपल्याला कालही सांगितले की, देशातील कोणत्याही राज्यामध्ये असे करता येत नाही. घटनेप्रमाणे या भागातील माणसाच्या बाबतीत असे करता येत नाही. फक्त ती व्यवस्था महाराष्ट्रामध्ये उपलब्ध आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख......

आणि ती 371(2) मुळे आहे. या राज्याचे ते अधिष्ठान आहे. त्या अधिष्ठानाकडे दुर्लक्ष करु नका. शासनाला ते अधिकार नाहीत. पण शासनाने राज्यपालांना तशी विनंती केली तर राज्यपाल तसे निदेश काढू शकतात आणि स्थिर स्वरुपाची व्यवस्था या राज्यात निर्माण होऊ शकते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, याबाबतच्या समितीचा रिपोर्ट तयार करीत असताना या दोन मुद्यांचा जरुर समावेश करावा. आदेश काढणे ही पुढची गोष्ट आहे. वाटचाल योग्य दिशेने चालू आहे की नाही हे महत्वाचे आहे. प्रवास केव्हा पूर्ण होईल आणि आपण मुक्कामाच्या ठिकाणी केव्हा पोहोचू हा नंतरचा विषय आहे, एवढाच मला मुद्दा मांडावयाचा होता. शासनाने समितीच्या त्या रिपोर्टमधील शिफारशींमध्ये या दोन मुद्यांचा अवश्य समावेश करावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

NTK/ ST/ D/

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या युवकांच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर गेले 3 दिवस चर्चा चालू आहे, ही आनंदाची बाब आहे. मी त्याचे स्वागत करीन. किमान या सभागृहाला या युवकांची चिंता आहे, सभागृह त्याचे चिंतन करु इच्छित आहे. त्यामुळे निरनिराळया भागातील सन्माननीय सदस्य त्यावर विचार मांडत आहेत. आजचा तरुण हा अत्यंत हुशार आहे. मग तो विद्यार्थी असो, कॉलेजचा विद्यार्थी असो की कॉलेजमधील सर्व शिक्षण संपवून बाहेर पडलेला तरुण असो. त्याला दिशा दाखविण्याचे जे काम आहे ते जसे सरकारचे आहे, तसे समाजाचे आहे, निरनिराळया एनजीओजचे आहे, हे देखील मी येथे नमूद करीन. सरकारच याला संपूर्णपणे जबाबदार असते असे कोणत्याही राज्यामध्ये, देशामध्ये होत नसते. त्या त्या अनुषंगाने सेवाभावी संस्थेने अशाप्रकारचे काम करावयाचे असते. परंतु एक बाब खेदाने म्हणावीशी वाटते की, या तरुणांचा यंत्रणेवरील विश्वास उडालेला आहे, सरकारवरचा विश्वास उडालेला आहे, सरकारच्या धोरणावरील विश्वास उडालेला आहे. एकदा विश्वास उडाला की, त्यांच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि ती निर्माण झाली की, अनेक गोष्टी राज्यभर घडत असतात. त्याच्या अनुषंगाने निरनिराळया घटना घडत असल्याचे आपण बघत असतो. युवकांच्या अनेक अडचणी आहेत, समस्या आहेत. त्यांच्या शिक्षणासंबंधीच्या अडचणी आहेत, पुढील करियरबद्दलच्या अडचणी आहेत, रोजगारासंबंधी अडचणी आहेत. अशा विविध अडचणी आज या राज्यातील तरुणांच्या डोळयासमोर आ वासून उभ्या आहेत. केवळ तरुणच चिंतेत आहे असे नाही तर त्यांचे पालक सुध्दा चिंतेत आहेत. 'बेस्ट ऑफ फाईव्ह' चा विचार केला तरी त्यामुळे किती पालकांना नैराश्य आले होते ? कोर्टाकडून केव्हा निकाल लागणार, दहावीचा निकाल लागून बरेच दिवस झाले होते. आमच्या मुलांचे काय होणार, त्या मुलांना सुध्दा काय करावयाचे ते समजत नव्हते. म्हणजे ज्याला दिशाहीन म्हणता येईल, ज्याला मानसिक तणावाखाली दबून गेला आहे असे म्हणता येईल अशी त्यांची स्थिती झाली होती. सुप्रीम कोर्टाकडून त्या विद्यार्थ्यांना रिलीफ मिळेपर्यंत ते दबून गेले होते.

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.संजय केळकर......

शेतक-यांच्या आत्महत्या गेले वर्षभर चालू होत्या, त्याच्या पाठोपाठ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु झाले होते. त्याला विविध कारणे जबाबदार असतात त्याचबरोबर दिशाहीन धोरण सुध्दा जबाबदार असते. मग शिक्षणातील प्रवेश प्रक्रियेसंबंधीचे असेल, नोकरीसंबंधीचे असेल, अभ्यासक्रमासंबंधीचे असेल असे अनेक विषय यामध्ये समाविष्ट आहेत. यामुळे सर्व पिढी तणावग्रस्त असल्याचे बघावयास मिळते. असे म्हणतात की, राज्यकर्त्यांनी पुढच्या पिढीकडे बघितले पाहिजे. परंतु केवळ पुढील निवडणुकांकडे पाहिले जाते, परंतु त्यापेक्षाही पुढील पिढीच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांना सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यकर्त्यांनी त्याकडे पाहिले पाहिजे. केवळ व्होट बँक म्हणून त्यांच्याकडे पाहून चालणार नाही. उद्याची पिढी राज्य सरकार घडविणार आहे त्यादृष्टीने बघावयाचे असते. पण त्याचा अभाव असल्याचे दिसून येते. शासनाकडून अनेक उपक्रम सुरु केले जातात, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. मी कालच पुरवणी मागण्यांवर बोलत असताना असे म्हटले होते की, शासन दुर्गम भागामध्ये, आदिवासी भागामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणार आहे, आदिवासी मुले इंग्रजी शाळेत शिकली पाहिजेत, जगाच्या बरोबरीने आली पाहिजेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...

प्रत्येक तालुक्यातील आयटीआयमध्ये संगणकाचा ट्रेड सुरु केला पण तो ट्रेड देखील बंद झाला. याबाबतीत 25 आदिवासी मुलांच्या सह्यांच्या निवेदनासहीत संबंधितांना मी पत्र लिहिलेले आहे. त्या मुलांना संगणकाचे शिक्षण मिळत नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये चालू केलेला ट्रेड बंद केला असेल तर तो तातडीने सुरु केला पाहिजे. मी हे एक उदाहरण आपल्याला दिले. सरकारच्या माध्यमातून अशा प्रकारचे उपक्रम आपण सुरु करतो परंतु शिक्षक नसल्यामुळे ते बंद करावे लागतात. त्या ठिकाणी शिक्षकांची व्यवस्था झाली पाहिजे, अधिकाधिक मुलांना सामावून घेतले गेले पाहिजे. आपण केवळ गप्पा मारुन चालणार नाही. तरुणांना योग्य दिशेने नेण्याचे काम करायला पाहिजे. स्वामी विवेकानंदांचा दिग्विजय दिवस 12 जानेवारी आहे. तो 13 सप्टेंबर असे कोणी तरी येथे सांगितले होते. सभापती महोदय, पुढच्या पिढीला विकासाची दिशा दाखवयाची असेल तर आपण दूरगामी धोरण आखले पाहिजे. केवळ दोन आणि पाच वर्षाचे धोरण असता कामा नये. दूरगामी धोरण असे असले पाहिजे की त्यातून कला, क्रीडा, रोजगार, स्वयंरोजगार, सेवाभावी कामे या सर्व क्षेत्रामध्ये तरुण पिढी परिपक्व होऊ शकेल.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संबंधी बोलायचे झाले तर आपल्याला रोजगाराभिमुख कौशल्य असलेले अभ्यासक्रम आणता येणार नाहीत काय असे मला शासनाला विचारावयाचे आहे. आज निरनिराळे लोक, सेवाभावी संस्था वर्तमानपत्राच्या माध्यमातून, इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या करिअरच्या कोणकोणत्या संधी आहेत याचे मार्गदर्शन करीत असतात. मी देखील एक वेबसाईट निर्माण करुन त्यावर 610 कोर्सेची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. हे कोर्सेस कोणकोणते आहेत, किती वर्षाचे आहेत आणि ते कोठे करावे लागतील याचा सर्व तपशील त्या वेबसाईटवर दिलेला आहे. एक बटन दाबले की हा सर्व तपशील उपलब्ध होतो. संगणकाचा असा फायदा होतो. शहरातील मुलांना या सुविधा सहज उपलब्ध होतात. परंतु आमच्या खेड्यापाड्यातील तरुणांनी काय करायचे. त्यांना अशा प्रकारची माहिती उपलब्ध होण्याची सोय नाही. खेडयापाड्यातील तरुण आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स शाखेत पदवी घेतात आणि तुमच्या आमच्याकडे नोकरीच्या अपेक्षेने येतात. मग आपल्यालाच, त्यांचे कौन्सिलींग करावे लागते. ज्याला अधिक माहिती असेल तो जास्त चांगले कौन्सिल करतो. आपण त्याला सांगतो की, तू संगणकाचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...

कोर्स कर, कोणत्या तरी विषयात स्पेशलायझेन कर. ही परिस्थिती जर आपण अशाच पध्दतीने चालू ठेवली तर त्यातून स्वयंरोजगार किंवा रोजगाराच्या वाटा निर्माण होणार नाहीत. हे तरुण पदवीधर होतील आणि रोजगार नसल्यामुळे नाक्यावर उभे राहातील. त्यांच्याकडे कोणते कौशल्य नसेल तर ग्रॅज्युएट होऊन काही उपयोग होणार नाही. ब्रिटीशांच्या काळामध्ये या देशामध्ये आपण बाबू म्हणजे क्लार्क निर्माण केले. मुलगा शिकला की त्याला बँकेत किंवा एलआयसीमध्ये क्लार्क म्हणून चिकटवले की संपले. आता 21व्या शतकामध्ये जग जवळ आलेले आहे. त्यानुषंगाने रोजगार आणि स्वयंरोजगाराची साधने मोठ्या प्रमाणावर निर्माण करायला पाहिजेत. या निमित्ताने मी आपणाला सांगू इच्छितो की, प्रत्येक तालुक्यामध्ये आपण सर्व माहिती उपलब्ध असलेला कक्ष सुरु केला तर हे तरुण तेथे जातील आणि करियर बाबतची माहिती घेतील. मग ज्याला एपीएससीच्या परीक्षांना बसावयाचे असेल तो त्यादिशेने प्रयत्न करील, एखाद्याला कोणता व्यावसायिक कोर्स करावयाचा असेल तर त्या कोर्सकडे तो वळेल. म्हणून प्रत्येक तालुक्यामध्ये अशा प्रकारे तरुणांना मार्गदर्शन करणारी यंत्रणा आपण निर्माण केली पाहिजे. हे शासनाचे काम आहे. काही ठिकाणी एनजीओ मार्फत हे काम चालू आहे. मी देखील एनजीओ मार्फत अशा प्रकारचे काम करीत असतो. शासकीय पातळीवर युवकांचे धोरण ठरविताना रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आणि स्वयंरोजगाराच्या वाटा निर्माण करायला पाहिजे. यामध्ये विविध कॅटेगरीज आहेत. मला आठवते, ग्रामीण भागतील हुशार मुलांच्या एण्ट्रन्स एक्झाम घेऊन त्यांना शासकीय विद्या निकेतनमध्ये दाखल केले जात होते. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या 4 गव्हर्नमेण्ट पब्लिक स्कूल चालू करण्यात आल्या होत्या.

मी कै.मधुकरराव चौधरी यांचा खूप आदर करतो. मी देखील शासकीय विद्यानिकेतन मधील विद्यार्थी आहे. मी खेड्यामधे रहात होतो. शिक्षणाची अडचण होती. इयत्ता 5वीच्या परीक्षेमध्ये मी ठाण्यामध्ये पहिला आलो. मी पहिला येईल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. त्यानंतर नाशिकमधील शासकीय विद्यानिकेतनमध्ये माझी शिकण्याची व्यवस्था केल्याचे पत्र मला आले. त्या शाळेमधून 6 वर्षामध्ये विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला जात होता. आता त्या शाळांची परिस्थिती काय आहे याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. त्यावेळच्या बॅचचे आम्ही लोक अजूनही भेटत असतो.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर........

परंतु मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, या शाळांमधून खेड्यापाड्यातील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले. असे विद्यार्थी आज सरकारी क्षेत्रात, निरनिराळ्या खाजगी क्षेत्रात मोठया पदावर काम करीत आहेत. त्यांचा उद्देश हाच होता की, सर्वांगीण व्यक्तिमत्व असलेल्या तरुणांचा विकास करायचा आणि उद्याच्या प्रशासनामध्ये सामाजिकदृष्टया त्यांचा उपयोग करुन घ्यायचा. अशा प्रकारच्या शाळांना ताकद देणार आहात का? अशा प्रकारच्या विशेष शाळा सुरु करण्याची गरज आहे. अशा शाळांमध्ये शिक्षण मिळते व संस्कार देखील होतात.

सभापती महोदय, क्रीडा विषयाबाबत या सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. क्रीडा धोरण तयार केले जाते. केवळ क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धा घेतल्यानंतर निवडक मुलांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभाग घेण्यासाठी तयार करण्याच्या दृष्टीने क्रीडा प्रबोधिनीची काही ठिकाणी व्यवस्था केली आहे. परंतु प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी, विभागाच्या ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून जाणीवपूर्वक क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव पुढे नेतील असे हिरे आहेत त्यांना शोधून काढण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाचा बास्केटबॉल संघ ९ वर्षानंतर पहिल्यांदा क्वालिफाय ठरला. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी त्या संघाला वाराणसी येथे जायचे होते. परंतु मुंबई विद्यापीठाचा लहरी कारभार सर्वांना परिचित आहे. तेथील क्रीडा प्रशिक्षकांनी हा कार्यक्रम रद्द केला. राष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळणे म्हणजे खेळाडूंच्या दृष्टीने तो मानाचा तुरा असतो. त्यामागे त्यांचे कष्ट असतात. मी स्वत: राज्य पातळीवर बास्केटबॉल खेळलो आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या बॉस्केटबॉल संघातील खेळाडूंनी माझ्याशी संपर्क साधला. मी सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांचे निश्चित कौतुक करतो. त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर त्यांनी २४ तासात होत्याचे नव्हते करुन दाखविले. त्यांच्या आदेशामुळे हा संघ वाराणसी येथील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जाऊ शकला आणि सेमी फायनलपर्यंत पोहोचला. मुंबई विद्यापीठाकडून दाखविलेल्या अनास्थेमुळे या संघातील मुले फ्रस्ट्रेटेड झालेली होती. प्रचंड मेहनत घेऊन ९ वर्षानंतर संधी मिळाली असताना ती हुकते की काय? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला होता. म्हणून युवा धोरण ठरवित असताना गुणी खेळाडू वंचित होणार नाहीत यादृष्टीने जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ 10:50

श्री.संजय केळकर........

सभापती महोदय, सांस्कृतिक क्षेत्राच्या संदर्भात युवकांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. केवळ रोजगार आणि नोकऱ्या देण्यापुरता विचार न करता त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आय.क्यू.डेव्हलप होत असताना इमोशनल कोशन्ट देखील मजबूत करण्याची गरज आहे. सांस्कृतिक विभागामार्फत निरनिराळ्या स्पर्धा घेतल्या जातात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आंतरराज्य पातळीवर नाट्य स्पर्धा घेतल्या जातात. परंतु पुढे काय होते? नाट्य क्षेत्रातील गुणी कलाकारांना प्रशिक्षण दिले पाहिजे. असे म्हटले जाते की, कलाकार जन्माला यावा लागतो. हे अर्धसत्य आहे. कलाकारांना शास्त्रशुध्द पध्दतीने मार्गदर्शन केले पाहिजे. नाट्य आणि चित्रपट सृष्टीमध्ये संधी मिळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण दिले तर त्यांना खूप उपयोग होऊ शकतो. अशा प्रकारच्या होतकरु कलाकारांना, हौशी कलाकारांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली तर त्यांना निश्चितपणे उपयोग होईल. वेळेचे बंधन लक्षात घेऊन या निमित्ताने एवढेच सांगतो की, २८ लाख सुशिक्षित बेरोजगारांची सेवायोजन कार्यालयात नोंदणी झालेली आहे. या तरुणांना विश्वास दिला नाही, योग्य दिशा दिली नाही, गंभीरपणे विचार केला नाही तर ही आजची तरुण पिढी राज्यकर्त्यांना दोष देईल.

नंतर एफ.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.......

लाखो तरुण आज भरकटलेल्या अवस्थेत आहेत. साधे उदाहरण पाहिले तर मुंबईतील रेल्वे स्टेशनवर वर्षभरात साडेचार ते पाच हजार तरुण देशाच्या काना-कोपऱ्यातून पळून येतात. येथे आल्यानंतर त्यांना काम मिळतेच असे नाही. त्याचा परिणाम असा होतो की हे तरुण निरनिराळ्या प्रकारे व्यसनाधिन होत असतात आणि उद्याचे गुन्हेगार सुध्दा बनतात. अशा मुलांना काही तरी वळण देण्याचे काम झाले पाहिजे. त्यासाठी एनजीओ तसेच शासनाने सुध्दा प्रयत्न केले पाहिजेत अशी माझी विनंती आहे. आमच्या "समतोल" फाऊंडेशनच्या वतीने आम्ही अशा मुलांना कौन्सिलिंग करुन तयार करतो. त्यासाठी आमचे एक महिन्याचे शिबीर असते. या शिबीरात मुले आल्यानंतर कालांतराने त्यांच्याच तोंडून ते घरातून पळून येण्याचे कारण समजते. त्यानंतर त्यांच्या पालकांशी संपर्क करुन त्या मुलांना त्यांच्याबरोबर घरी पाठवून देतो. अशा सर्व गोष्टी केवळ शासनाच्या माध्यमातून होतीलच असे नाही तर त्यासाठी एनजीओज सुध्दा ॲडॉप्ट केल्या पाहिजेत आणि काही प्रमाणात शासनाने देखील अशा कामासाठी मदत केली पाहिजे. मात्र अशा गोष्टीकडे डोळेझाक करुन चालणार नाही. शासन आता युवा धोरण ठरविणार आहे त्यात हा अंतर्भाव असावा. आजचे तरुण अत्यंत हुशार, कर्तबगार, कल्पक असून त्यांच्याकडे उद्याचा देश घडविण्याची शक्ती आहे. त्याचबरोबर या तरुणांच्या माध्यमातून राष्ट्रभक्त तरुणांची फळी उभी करावयाची असेल तर त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीनेच हे युवा धोरण ठरवावे अशी सूचना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. गुरुनाथ कुलकर्णी तसेच सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त व इतर सदस्यांनी नियम 260 अन्वये अतिशय महत्वाचा युवा धोरणासंबंधीचा प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी सादर केला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आपणा सर्वांनाच माहीत आहे की, आजचा युवक हा देशाचा उद्याचा आणि भविष्याचा कायम आधारस्तंभ राहिलेला आहे. जगामध्ये आपण पाहतो की, सर्व देशांच्या लोकसंख्येचा विचार करता सन 2020 नंतर भारत हा जगातील सर्वात तरुण देश म्हणून गणला जाणार आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना युवा धोरणाबाबत सुध्दा खंबीरपणे विचार करुन निर्णय घेण्याची तयारी शासनाने दाखविली आहे म्हणून मी आघाडी शासनाला सुध्दा धन्यवाद देतो. पण इतिहासाकडे वळून पाहिले तर आपल्या लक्षात येते की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 10 वर्षांनी म्हणजेच जवळपास 1956 च्या दरम्यान केंद्रशासनाने सुध्दा युवा कल्याणासाठी पहिल्यांदाच नियोजन केले आणि त्या काळात यासाठी 10 हजाराची तरतूद केली होती. युवा कल्याण झाले पाहिजे आणि त्यासाठी बजेटमध्ये तरतूद सुध्दा करायला पाहिजे हा विचार रुढ झाला आणि तेव्हापासून युवकांच्या बाबतीत विचार व्हायला लागला. प्रत्येक क्षेत्रात क्रांती घडविण्याचे सामर्थ्य या युवकांमध्ये असते. म्हणून आज आपला देश जगात एक नंबरचा तरुण देश होत असताना या युवकांच्या माध्यमातून आपला देश तसेच राज्यातील तरुणांसाठी धोरण ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण जगाचे लक्ष आज आपल्या देशाकडे तसेच राज्याकडे लागून राहिले आहे. तसेच संपूर्ण जगात मंदीची लाट असताना सुध्दा या जगातील भारत आणि चीन हे दोन देश आर्थिक प्रगतीमध्ये आघाडीचे ठरलेले आहेत. म्हणून आर्थिक सत्तेत आघाडीवर असलेले किंवा इतर देश असतील त्यांनी सुध्दा आपल्या देशाकडे नजरा वळविलेल्या आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

आपल्या देशाकडे जगातील मोठ मोठे देश, आर्थिक महासत्ता असलेले देश मोठया अपेक्षेने पाहत आहेत. महासत्ता देश आपल्या देशाकडे का बघत आहेत तर त्या सर्वांना माहिती आहे की, सन 2020 सालानंतर भारत देश हा जगामध्ये सर्वात तरुणांचा देश असणार आहे त्यामुळे ते आपल्या देशाकडे मोठया अपेक्षेने पाहत आहेत. शिक्षण, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात भारत देश आताच आघाडीवर आहे आणि 2020 नंतर सुध्दा भारत देश पूर्ण जगात आघाडीवर राहणार आहे याची खात्री जगातील महासत्तांना पटलेली आहे. अमेरिका, इंग्लंड अशा देशातील नेते मंडळी आता आपल्या देशाकडे यावयास लागली आहे. आपल्या देशाबरोबर चांगले संबंध कसे प्रस्थापित करता येईल यासाठी ते आज आपल्याकडे येत असतात. आपल्या देशाचे आणि आपल्या राज्याचे मूळ भांडवल हे तरुण पिढी असणार आहे. जगातील सर्व देशांपेक्षा आपल्या भारतात सर्वात जास्त तरुण राहणार आहेत. त्यामुळे जगापुढे एक प्रकारची स्पर्धा घेऊन जाणारे युवा धोरण आपल्याला करावे लागणार आहे. मला अभिमानाने सांगावयाचे आहे की, आपल्या राज्याचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांनी म्हटले आहे की, "युवा पिढीच्या हाती राष्ट्राचे भवितव्य सुरक्षित आहे असे मी मानतो, कारण तरुण पिढीला उत्तम सामाजिक जाण असते. उत्साह,प्रामाणिकपणा, तळमळीने काम करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये दिसून येते मात्र त्यांना योग्य संधी मिळावयास पाहिजे." मला सांगावेसे वाटते की, आपल्याकडे जी तरुण पिढी आहे त्या तरुण पिढीचा विचार करुन त्यांच्या प्रगतीच्या अनुषंगाने राज्याची आणि देशाची प्रगती व सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

युवक म्हटल्यानंतर सर्वात प्रथम येतो तो त्यांचा रोजगार, स्वयंरोजगाराचा विचार. युवकांना घडवायचे असेल तर सर्व क्षेत्रामध्ये युवकांचे सामर्थ्य वाढले पाहिजे. शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर आपल्या तरुणांना सर्वात मोठी चिंता असते ती रोजगाराची. आपल्या राज्यात बेरोजगारांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. आपल्या राज्यामध्ये एसएससी पर्यंत शिक्षण घेतलेल्या बेकारांची संख्या 4.16 लक्ष आहे. एसएससी झालेल्या बेकारांची संख्या 7,15,338 आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या बेकारांची संख्या 9.1 लक्ष आहे. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, अभियांत्रिकी डिल्पोमा धारकांच्या बेरोजगारांची संख्या 1,22,353 आहे. औद्योगिक प्रशिक्षण



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

घेतलेले तरुण खरे म्हणजे बेकार असता कामा नये. परंतु औद्योगिक प्रशिक्षण घेतलेले बेरोजगार 1,32,781 आहेत. पदविकाधारक बेरोजगारांची संख्या 44,673 असून आणि सुशिक्षित बेकारांची संख्या 24,58,997 आहे. हे बघितल्यानंतर चिंतेचे वातावरण तयार होते. आज जवळ जवळ 28,75,988 बेरोजगार आपल्या राज्यात आहेत. ही संख्या केवळ नोंदित बेरोजगारांची आहे परंतु ज्यांनी आपले नाव नोंदलेले नाही अशांचा यामध्ये उल्लेख नाही त्यामुळे खरे म्हणजे बेरोजगारांची संख्या अजून वाढण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना, तरुणांना आपण जे शिक्षण देतो त्या शिक्षणाने रोजंदारीभिमुख, व्यवसायाभिमुख आणि स्वयंरोजगाराभिमुख शिक्षण असले पाहिजे असे मला वाटते.

मी या ठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छितो की, काही वर्षापूर्वी एकाच गावातील दोन मुले एकाच शाळेत शिक्षण घेत होते त्यातील एक मुलाला अडचण असल्यामुळे तो जेमतेम सातवी आठवीपर्यंत शिकला व शाळा सोडली. दुसरा मुलगा मात्र अतिशय हुशार होता. या मुलाचा गौरव प्रत्येक परीक्षेत होत होता. प्रत्येक परीक्षेत त्याचा पहिला नंबर यायचा त्यामुळे त्याचे कौतुक व्हायचे, सत्कार व्हायचा. सातवी आठवी झालेल्या मुलाला शिक्षण घेता येत नव्हते त्यामुळे तो नातेवाईकांच्या माध्यमातून मुंबईला आला व मुंबई बंदरात माथाडी कामगार म्हणून काम करावयास लागला.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

त्या शाळेतील अतिशय हुशार मुलगा 5-6 वर्षाने पदवीधर झाला. बी.ए., एम.ए.झाला. नोकरीच्या शोधात तो मुंबईला आला. 6-7 वर्षापूर्वी आठवी पर्यंत शिक्षकलेला तो विद्यार्थी मुंबईत येऊन माथाडी कामगार झाला होता. तो जवळ जवळ 20 ते 22 हजार रूपये पगार घेत होता. तो हुशार विद्यार्थी मात्र नोकरी मिळत नाही म्हणून जवळ जवळ एक वर्ष त्या अर्धशिक्षित मित्राकडे रहात होता. त्या हुशार विद्यार्थ्याच्या जेवणाचा सर्व खर्च तो माथाडी मित्र करत होता. तेव्हा त्या हुशार मित्राला वाटायचे की, मी सुद्धा शिक्षण सोडून मुंबईला येऊन माथाडी झालो असते तर बरे झाले असते. कारण त्या माथाडीला 20 ते 22 हजार रुपये पगार मिळत होता. तेव्हा या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. कुठल्या प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे याचा विचार केला पाहिजे. शासनाने रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा विचार केला पाहिजे. युवकांसाठी रोजगार, स्वयंरोजगाराची संधी प्राप्त करून दिली पाहिजे. त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. युवकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. यासाठी शासनाने व्यवस्था केली पाहिजे, सामाजिक संस्थेने व्यवस्था केली पाहिजे. आज प्रत्येक ठिकाणी औद्योगिकीकरण झाले पाहिजे. देशात आपण कृषि धोरण राबवित आहोत. त्यात देखील पैसे मिळत आहेत. तेव्हा कृषि आधारित उद्योग काढण्यासाठी युवकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, पशुसंवर्धन यामध्ये युवकांना समर्थ बनविले पाहिजे. आज तरूण स्वत:ला अँग्री यंग मॅन समजतो. त्याची ही प्रतिमा आपण बदलली पाहिजे. यासाठी त्याला कृषि उद्योगामध्ये सहकार्य केले तर तो ॲग्रो यंग मॅन झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपल्या राज्यातील युवकांमध्ये सामर्थ्य आहे. राज्यातील सर्वात तरूण मुख्यमंत्री म्हणून श्री.शरद पवार यांच्याकडे पाहिले जाते. ते वयाच्या 38 व्या वर्षी राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे राजकारणामध्ये काम करणारे युवा नेते म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या मुळेच राजकारणामध्ये युवकांना चांगले काम करण्याची संधी मिळाली आहे. राजकारणी मंत्री हा वयस्कर असायचा अशी पूर्वी भावना असायची. पण श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री झाल्यापासून राजकारणामध्ये तरुणांच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होत गेली. त्याचे मुख्य कारण आपले राज्य तरूण राज्यकर्त्यांच्या माध्यमातून पुढे जात आहे. श्री.शरद पवार साहेबांनी युवा काळात समर्थपणाची बिजे रोवल्यामुळे ते आज ICC मध्ये 104 देशाचे प्रतिनिधीत्त्व करीत आहेत. तेव्हा युवकांना चांगल्या प्रकारची संधी आपण दिली तर देशाची, राज्याची प्रगती निश्चितपणे होऊ शकेल. सन 1992-93 मध्ये श्री.शरद



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

पवार साहेबांनी महिला धोरण राबविले. तेव्हा युवा धोरण आखताना आपण तरूणींचा देखील विचार केला पाहिजे असे मला या निमित्ताने सुचवावयाचे आहे. तरूणी, महिला ह्या उद्यमशील असतात. चिवट, काटकसर आणि कष्टाळू प्रवृत्तीच्या असतात. त्यांच्यासाठी रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली तर त्या देखील आपल्या क्षेत्रात निश्चितपणे प्रगती करतील,असे मला वाटते. युवा धोरणाची जाण ठेवून आमच्या खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी जानेवारी महिन्यामध्ये या राज्याला युवा धोरणाची आवश्यकता आहे, युवा प्रगतीची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत 'युवा महाराष्ट्राचे युवा अभियान' नावाचे धोरण जाहीर केले.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी भारवि.. 11:10

श्री.रमेश शेंडगे...

मी याठिकाणी युवा धोरण वाचून दाखविणार होतो, परंतु त्यामध्ये वेळ जाईल म्हणून मी ते वाचत नाही. या युवा धोरणामध्ये ज्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत त्या जशाच्या तशा राबविल्या तर आपणास अपेक्षित असलेल्या युवा सामर्थ्याच्या माध्यमातून देशाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी हे युवा धोरण जाहीर केलेले आहे.त्याची प्रत मी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना देतो. माझी त्यांना विनंती आहे की, या युवा धोरणात नमूद केलेल्या गोष्टींची अंमलबजावणी करावी.... सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब आपण राजकीय जीवनामध्ये अनेकांची भाषणे ऐकत असतो....तरुणांना शक्ती आली पाहिजे यासाठी एक शेर वाचून दाखवितो.

" कर खुद ही को इतना बुलंद, हर तकदीर से पहले
खुदा बंदे से पूछे की बता तेरी रज़ा क्या है "

युवा वर्गाला सामर्थ्यशाली बनविण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा ( विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, मैं युवा नीति से संबंधी इस प्रस्ताव पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. मैं 5-6 सुझाव देना चाहता हूं. मैं माननीय मंत्री जी का ध्यान खींचना चाहता हूं. महाराष्ट्र सरकार युवा नीति बना रही है. युवाओं के लिए यह एक अच्छा कदम महाराष्ट्र सरकार ने उठाया है. युवा नीति एवम् क्रीडा नीति निर्धारित करने के लिए एक समिति का गठन किया गया है. फरवरी माह में यह समिति गठित की गई है. इस समिति को अपनी रिपोर्ट 6 महीने में प्रस्तुत करनी है. युवा नीति निर्धारित करने के लिए सरकार समयबध्द तरीके से काम करके इसे अंतिम स्वरुप प्रदान करेगी, ऐसा मुझे विश्वास है.

सभापति महोदय, मेरा पहला सुझाव यह है कि सबसे पहले यूथ की परिभाषा निश्चित की जानी चाहिए. भारत सरकार ने 2003 में नेशनल यूथ पॉलिसी बनाई है. उसमें उन्होंने 13-35 आयु वर्ग को यूथ माना है. हाल ही में सरकार ने सभी बच्चों को संवैधानिक रुप से शिक्षा का अधिकार प्रदान करके 8-14 साल की उम्र के बच्चों को शिक्षा की गारंटी दी है. इस पृष्ठभूमि में नई युवा पॉलिसी बन रही है. इसलिए यूथ की परिभाषा भी इस नीति के अन्तर्गत स्पष्ट होनी चाहिए. पहले 21 साल की आयु सीमा के वर्ग को वोट का अधिकार था, अब वह आयु सीमा कम करके 18 साल कर दी गई है. अंग्रेजी में एक शब्द adolescence है. 20 साल से कम की आयु के युवाओं को टीनएजर कहा जाता है. हम जिस क्षेत्र में काम करते हैं वहां इस आयु के वर्ग को adolescence कहते है. वह 16-18 के बीच का आयु वर्ग हैं और 18-20 आयु के वर्ग को टीनएजर कहते हैं. इसलिए युवा नीति निर्धारित करते समय युवा किसे कहा जाएगा, इसकी व्याख्या की जानी चाहिए, उसको डिफाईन करना चाहिए.

सभापति महोदय, हर जनरेशन को ऐसा लगता है कि हमारी जनरेशन अच्छी थी. मेरा यह मानना है कि युवाओं को भीख मांगने से शक्ति नहीं मिलती है. इतिहास देखें तो पता चलता है कि आजादी के पहले और बाद युवा वर्ग खुद ही अपने लिए जगह बना लेता है. आज 21 वीं सदी में हम युवा नीति बना रहे है तो तब्दीली जरुरी है. आज का युवा वर्ग पढ़ा-लिखा है. वह पॅट्रिओटिक, प्रोग्रेसिव्ह, सेक्युलर है. वह ज्यादा पैसा कमाना चाहता है, नाम कमाना चाहता है, वह नेता बनकर आगे नहीं बढ़ना चाहता. वह professionally, intellectually & technically sound बनकर पैसा कमाना चाहता है. इसलिए मैं आज के युवा वर्ग को कॉम्प्लीमेंटस देता हूं.



AJIT/ SBT/ ST/ पूर्वी भारवि.. 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा ....

आज देश का भविष्य इसी युवा वर्ग पर निर्भर है. इसलिए मेरा यह सुझाव है कि युवा नीति निर्धारित करने के लिए जो कमेटी गठित की गई है, उसे इन बातों पर ध्यान देना चाहिए. तीसरा मेरा सुझाव यह है कि employable Youth Policy होनी चाहिए. हमारे वरिष्ठ सम्माननीय सदस्यों ने कहा कि आज के बच्चे अंग्रेजी शिक्षा ग्रहण नहीं करेंगे, टेक्नीकल शिक्षा ग्रहण नहीं करेंगे तो employable नहीं बन पायेंगे. मैं इस सिलसिले में यह कहूंगा कि अच्छी शिक्षा मिलेगी तो वे employable बन सकते हैं. तो इस बात का भी युवा नीति में समावेश होना चाहिए. आज का युवा वैसे तो प्रगतिशील है. युवा नीति बनाते समय शहरी क्षेत्र का जो गरीब युवा वर्ग है, गरीबी रेखा से नीचे का जो युवा तबका है, उसी प्रकार से ग्रामीण क्षेत्र का जो गरीब युवा है, उनके बारे में विशेष ध्यान देना चाहिए. समाज का जो affluent class है, अमीर वर्ग है, वे अपना करिअर अपने ढंग से स्थापित कर लेते हैं लेकिन जो गरीब वर्ग है, आर्थिक रुप से कमजोर वर्ग है, जो अपने परिवार की अच्छी प्रकार से व्यवस्था नहीं कर सकता है, ऐसे शहरी एवम् ग्रामीण वर्ग के बारे में युवा नीति में विशेष प्रावधान होना चाहिए. ऐसा न हो कि शहरी क्षेत्र के युवा वर्ग का ही विचार हो. इसलिए scientific temperament युक्त युवा नीति होनी चाहिए. बहुत सारी बातें unscientific है, वे दूर होनी चाहिए. जो बातें scientific है, उनका इस नीति में प्रावधान होना चाहिए. शिक्षा नीति इससे अलग है. शिक्षा नीति में 8-14 आयु सीमा के वर्ग को शिक्षा का अधिकार प्रदान किया गया है. लेकिन 8 साल की उम्र से कम और 14 साल की उम्र से अधिक वर्ग का भी हमें युवा नीति बनाते समय विचार करना है. शिक्षा नीति में, युवा नीति में इनको रेशनालाईज करके उनका एक्सेसिबल अफोर्डेबल कास्ट पर करना है. शिक्षा नीति को ध्यान में रखते हुए युवा नीति बनाई जानी चाहिए. हर युवक/युवती को बराबर का मौका मिलना चाहिए. मैं रिजर्वेशन के विरोध में नहीं हूं. जाति या समाज का विचार करते समय जो आर्थिक रुप से दुर्बल है, उस वर्ग को ध्यान में रखते हुए नीति बनाई जानी चाहिए, यही मेरा कहना है.

सभापति महोदय, महाराष्ट्र विधान सभा में 289 सदस्य है और विधान परिषद में 79 सदस्य हैं. यूथ पॉलिसी और स्पोर्ट पॉलिसी अलग अलग पॉलिसी है. इस संबंध में एक्शन प्रोग्राम बनाते समय दोनों को इंटीग्रेट करके बनाए. इस काम के लिए बजट में जितनी धनराशि का





श्री सय्यद ज़मा....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रावधान होगा, वह होगा. मैं इस संबंध में यह सुझाव देना चाहता हूं कि दोनों हाऊस के हम जितने आमदार है, वे अपने आमदार फंड से 10 लाख रुपये युवा फंड के रुप में, स्पोर्ट फंड के रुप में दें. एमएलसी 10 लाख रुपये दे सकते हैं. मगर एमएलए वन टाईम दें. महाराष्ट्र के सुवर्ण महोत्सवी वर्ष के उपलक्ष में हम यह फंड बनाकर यूथ को डेडीकेट कर सकते हैं. सरकार इस प्रकार के फंड को अनुमति देने के बारे में विचार करें. अगर इस प्रकार से युवा वर्ग के विकास के लिए, स्पोर्ट के विकास के लिए फंड बनेगा तो वह युवा वर्ग का सम्मान होगा. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

......

यानंतर डॉ. दीपक सावंत

यांचे भाषण

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, सुरेशदादा देशमुख, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.उल्हास पवार, डॉ.वसत पवार,श्री.भाई जगताप यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यासाठी युवा व क्रीडा धोरण ठरविण्याची संकल्पना राज्य सरकारने मांडलेली आहे परंतु हे धोरण नेमके कसे असावे याबाबतीत कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस यांच्यामध्ये प्रश्न असल्यामुळे ते अद्याप जाहीर होऊ शकले नाही..

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्यामुळे कोणताही राजकीय प्रश्न येऊ न देता सर्व पक्षीय लोकांना विश्वासात घेऊन आपण युवा धोरण मांडावे अशी मी सूचना करतो. सभापती महोदय, आजचा तरुण हा अस्वस्थ आहे, या तरुणाच्या मनामध्ये असंतोषाचा ज्वालामुखी धगधगतो आहे. आजचा तरुण राजकीय पुढाऱ्यांना मान द्यायला तयार नाही. राजकारण आणि राजकीय पुढारी हे त्याच्या टीकेचे मोठे लक्ष्य आहे. आजच्या विविध वर्तमानपत्रांमध्ये तरुण-तरुणींच्या प्रतिक्रिया येतात. हे आपण पाहिले तर त्यांच्यामधील असंतोष आपल्याला जाणीवपूर्वक बाहेर येतांना दिसतो. कदाचित अशाप्रकारे त्याच्यातील दबलेला असंतोष या राज्यातील नक्षलवादाला वेगळी चालना देत आहे. आदिवासी तरुणांमध्ये असंतोष आहे, तो हातामधील नांगर खाली टाकून, शेती करावयाचे सोडून, अन्य उद्योगधंदे करावयाचे सोडून बंदूक हातामध्ये घेत आहे. या नक्षलवादाकडे युवा धोरणाच्या माध्यमातून पहाणे आवश्यक आहे. मानसिकदृष्टया आजचा तरुण डिस्टर्ब झाला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आज छोटया छोटया प्रश्नांच्या बाबतीत तात्काळ आंदोलने होतात. शिक्षक-विद्यार्थी यांच्यामधील गुरु-शिष्य ही परंपरा संपुष्टात आली आहे. त्यामुळे शिक्षक हा मुलांना शिकविणारा कमर्शिअल माणूस आहे. मी शिकतो हे मी माझे कर्तव्य करतो, त्यांनी शिक्षण देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यामध्ये मी भरलेल्या फीचे 100 टक्के मोल मला मिळाले पाहिजे अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. तिला काही अंशी पालक सुध्दा जबाबदार आहेत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आज पालकांची जीवघेणी स्पर्धा सुरु आहे, विद्यार्थ्यांची जीवघेणी स्पर्धा सुरु आहे. त्यामध्ये विद्यार्थी होरपळून निघत आहे. गुरु-शिष्य परंपरा नष्ट होत आहे. परंतु आजकाल विद्यार्थ्यांकडून शिक्षक, प्राचार्यांच्या तोंडाला काळे फासण्याची नवीन परंपरा सुरु झाली आहे. त्यांच्यामधील पेशन्स, सहनशीलता संपली आहे, तिचा कडेलोट झाला आहे. त्यामुळे हे युवा धोरण आखतांना त्याकडे अतिशय संवेदनशीलपणे आपण पाहिले पाहिजे.

आई-वडिल-मुलगा यांच्यामध्ये कम्युनिकेशन गॅप मोठया प्रमाणामध्ये असून ती भरुन काढणे फार कठीण आहे. आज आपण न्यूक्लिअर फॅमिलीची संकल्पना घेऊन पुढे चाललो आहोत. आजच्या आई-वडिलांना आपल्या तरुण मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. मध्यंतरी "मुंबई मिरर" या वर्तमानपत्रामध्ये सर्व्हे छापून आला होता. सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने त्यामधील मुंबईची भयानक स्थिती आपणासमोर वाचून दाखवितो. त्यामधील काही गोष्ट या सभागृहामध्ये मी वाचू शकत नाही.परंतु हा अंक मी नंतर आपणाकडे पाठवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

"Less than 10 per cent of teens, a boy or a girl, feels to choose their fathers. More than 40 per cent of boys smoke in their teens. 50 per cent of teens bunk their college and school. 40 per cent of the boys start driving even before the age of 17. More than 50 per cent of boys consume alcohol. Around 40 per cent of teens have stolen the money from their parents. If given a chance 1 out of 3 teens would change their carrier path. 15 per cent of teens admit getting intimate with someone in their school and college. 30 per cent of teens do not share their stress with their parents."

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

सभापती महोदय, हे तरुणाईचे सगळे चित्र बघितले तर त्यामध्ये वेगवेगळे पर्सेंटेज आहेत. म्हणून आपण सर्वांनी याबाबत अंतर्मूख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. कोणत्या पक्षाचे धोरण आहे हा विषय नसून तरुणाला केंद्र बिंदू मानून आणि तो अतिशय संवेदनशील झालेला आहे हे मानून युवा धोरण ठरविण्याची गरज आहे. मध्यंतरी ड्रग्ज घेण्याची प्रवृत्ती व आत्महत्येची प्रवृत्ती तरणांमध्ये बोकाळली होती. या बाबतीत शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत? शासनाने या बाबतीत काहीच केले नाही. ड्रग्ज ट्रॅफिकिंग आपण थांबवू शकत नाही ही गोष्ट जेवढी खरी आहे तेवढीच या ड्रग्ज ॲडिक्ट तरुणांना त्या जाळयातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येत नाहीत हेही खरे आहे. थ्री इडिएट्स नावाचा चित्रपट रिलिज झाला आणि आत्महत्येचे प्रमाण ट्रिगर झाले असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. यातून विद्यार्थ्यांना चालना मिळाली आणि ते आत्महत्येकडे थोडेसे जास्त वळले. त्या काळामध्ये बारा ते चौदा आत्महत्या झाल्या. याचा अर्थ असा की, आजचा तरुण हा अत्यंत संवेदनाशील आहे. कोणतीही छोटी गोष्ट त्याच्यातील भावनांचा भडका उडवायला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे युवा धोरण अत्यंत संवेदनशील असण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कॉलेजमध्ये जाताना ड्रेसकोड हवा की नाही, माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी साहेबांचे याबाबतीतील मत काय आहे हे मला माहीत नाही. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे मत काय आहे हे मला माहीत नाही. मंदिरामध्ये जाताना शाळा कॉलेजमध्ये जाताना ड्रेसकोड हवा की नाही हा एक वादाचा मुद्दा आहे. आपण कुठल्या बाजूने आहोत हे प्रत्येकाने ठरवायचे आहे. काही लोक असे म्हणतील की, होय, ड्रेसकोड पाहिजे. काही लोक असे म्हणतील की, आमच्यावर बंधन घालणारे तुम्ही कोण. त्यामुळे हे सगळे विषय अतिशय बारकाईने तपासण्याची आवश्यकता आहे. शाळा कॉलेज हे तरुणाईचे मुख्य ठिकाण आहे. राज्यामध्ये डिम्ड युनिव्हर्सिटीज, काढण्यात आल्या. या डिम्ड युनिव्हर्सिटी काढण्यामागे शासनाची भूमिका काय होती?पाश्चात्य संस्कृतीप्रमाणे अमेरिकन युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर शासनाने या डिम्ड युनिव्हर्सिटी काढल्या. त्या काढतांना शासनाने असे ठरवले होते की, त्या त्या भागामध्ये वेगळया प्रकारचे शिक्षण त्या विद्यार्थ्यांना देता येईल. पण डिम्ड युनिव्हर्सिटीची संकल्पना पुसून गेली. खरे म्हणजे या डिम्ड

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

युनिव्हर्सिटीच्या माध्यमतून एखाद्या फॅकल्टीचे शिक्षण देता आले असते. संस्कृत भाषेच्या डिम्ड युनिव्हर्सिटीमध्ये संस्कृत भाषेचे सर्वोत्तम शिक्षण, हिंदी भाषेच्या डिम्ड युनिव्हर्सिटीमध्ये हिंदी भाषेचे सर्वोत्तम शिक्षण, आणि इंजिनिअरिंगच्या डिम्ड युनिव्हर्सिटीमध्ये इंजिनिअरिंगचे सर्वोत्तम शिक्षण देता आले असते. पण तसे झाले नाही. ती संकल्पनाच पुसून गेली. त्यामुळे आजचा तरुण मला उद्या जी नोकरी करायची आहे त्याबाबतचे शिक्षण द्या असे सांगतो. पण आपण आज ते शिक्षण देऊ शकत नाही. ज्यावेळी हे विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतील त्यावेळी त्यांना कळले पाहिजे की, माझ्या अभ्यासाचा आणि माझ्या नोकरीचा काही तरी समन्वय आहे तरच त्याला त्या नोकरीमध्ये आवड निर्माण होईल. आज आय.टी. क्षेत्रातील लोक दर तीन महिन्याला मोठे पॅकेज घेऊन नोकऱ्या बदलत आहेत. म्हणजे त्यांच्याकडे चेंजेबिलिटी आहे. मनसिकता बदलणे फार सहज शक्य आहे.

सभापती महोदय, राष्ट्राभिमान निर्माण करणारे यापूर्वी एन.सी.सी. चे ट्रेनिंग होते ते आज बंद झालेले आहे. माननीय मंत्रिमहोदय कॉलेज जीवनातून आपण देखील युवक चळवळीमधून आलेले आहात. आपल्याला त्यावेळी आपण एन.सी.सी. जॉईन केली ही किती अभिमानाची गोष्ट वाटायची. पण आजचा तरुण एन.सी.सी.कडे जात नाही. आजचा तरुण लष्करामध्ये जात असताना दहा वेळा विचार करतो. माझ्या घरातल्याच व्यक्तिने लष्करी अधिकारी का व्हावे, शेजारच्या घरातील व्यक्तिने कां नको? असा विचार करतो. जर एन.सी.सी. सुरु केली तर जे लोक यामध्ये इंटरेस्टेड आहेत निदान ते लोक तरी एन.सी.सी.मध्ये जाऊ शकतात.

सभापती महोदय, आय.ए.एस., आय.पी.एस.कडे आज आपले विद्यार्थी जात नाहीत असे आपण म्हणतो पण राज्य शासनाने आय.ए.एस., आय.पी.एस. तयार करण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत? शिवसेनेमार्फत आम्ही प्रयत्न करतो ही गोष्ट बरोबर आहे. पण याबाबतीत राज्य शासनाने काही प्रयत्न केले आहेत काय? आज तरुणाईला वेगाची नशा आहे. जशी ड्रगची नशा आहे तशी वेगाची नशा आहे. या वेगा बरोबर राज्य शासनाने वेग साधला नाही तर कदाचित नक्षलवाद आणखी मोठया प्रमाणावर फोफावेल आणि हे राज्य उलटून टाकण्यास त्याची मदत होईल.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

आज नक्षलवाद फक्त त्याच भाषेतील नाही. नक्षलवाद म्हणजे क्रांतीची जी बिजे आपण रोवतो ती क्रांती वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळ्या वातावरणात आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे युवा धोरण राबविताना आपण अतिशय संवेदनशील व्हावे. केवळ आपण लोकांसमोर एक नवीन धोरण टाकले आणि निवडणुकीसाठी प्रचाराचे एक साधन झाले असे करुन युवा धोरण राबवू नका. सगळयांनी राजकारण्यांचे जोडे बाहेर काढून या सभागृहामध्ये आपण युवा धोरण ठरवू या अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द सपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/ D/ ST/

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी पहिल्यांदा या प्रस्तावाचे स्वागत करतो. या प्रस्तावाचे स्वागत करीत असताना एका एका वाक्यामध्ये मी एक एक मुद्दा हायलाईट करतो. पहिला मुद्दा मला शासनाला कळकळीने सांगावयाचा आहे की, या विषयाचे सगळे गांभीर्य आपण लक्षात घेऊ या आणि या विषयाचे राजकारण करण्यापेक्षा हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने गंभीरपणे कामाला लागू या. दुसरा मुद्दा विद्यार्थी आणि त्याचे जडणघडण यासंदर्भात आहे. प्रत्येक कुटुंब हा कच्चा माल तयार करणारा उत्पादक मानले तर शाळा किंवा शिक्षण संस्था ही त्या विद्यार्थ्याला घडविणारी फॅक्टरी आहे. पक्का माल तयार होणारी ती फॅक्टरी आहे असे जर आपण मानले तर आमच्या शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडणारा प्रॉडक्ट कसा बाहेर पडतो आहे यावर सर्वस्व अवलंबून आहे. म्हणून मला असे वाटते की, युवक जो घडतो आहे त्याच्या जडणघडणीमध्ये कुटुंबाचा जर 25 टक्के भाग असेल, सामाजिक संस्था, धर्मसंस्था यांचा 25 टक्के भाग असेल तर शिक्षण संस्थांचा त्यामध्ये 50 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त भाग आहे. म्हणून ज्या शिक्षण संस्था आहेत त्याबाबतीत आपल्या शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये बालवाडीलाच 50 हजार रुपये, 1 लाख रुपये घ्यावयास लागले आहेत. इथपासून सुरुवात करुन त्याला मेडिकल इंजिनिअरींगला प्रवेश मिळणार नसेल तर त्या मुलाला शिक्षणाची व्यवस्थाच नाकारली जात आहे. आता जर 100 मुलांनी पहिलीमध्ये प्रवेश घेतला तर उच्च शिक्षणामध्ये फक्त 6 टक्के मुले जात आहेत. आणि ही जी 6 टक्के मुले बाहेर पडत आहेत त्यांचा सर्वांगीण विकास होत आहे काय याचे उत्तरही नकारात्मक आहे. म्हणजे आमच्याकडे परिपूर्ण नागरिक परिपूर्ण युवक तयार करण्याच्या दृष्टीकोनातून जी उत्तम प्रकारची राजकीय इच्छाशक्ती असावयाचा पाहिजे त्याचा दुर्दैवाने मोठा अभाव आहे याकडे मी लक्ष वेधतो.

सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत प्रमुख तीन मुद्दे मला शासनाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहेत. एक म्हणजे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाच्या दृष्टीने या शिक्षण व्यवस्थेमध्ये आम्ही काही यंत्रणा ठेवलेली आहे काय ? याचे उत्तर नगण्य आहे. आज आम्ही आय.पी.एल. क्रिकेटचा आगडोंब पाहतो परंतु सामान्य विद्यार्थ्यांचा त्यामध्ये काही संबंध नाही. हा सगळा हायफाय संस्कृतीचा खेळ आहे. त्यामध्ये सामान्य विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाचा काही संबंध



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/ D/ ST/

श्री. भगवान साळुंखे ....

नाही. दुसरा मुद्दा असा की, त्यांना आपण जे बौध्दिक शिक्षण देतो ते सुध्दा पूर्णपणे होत नाही. त्याला आम्ही माहितीच्या ढिगाऱ्याखाली ढकलून देतो आणि त्याचा बौध्दिक विकास केल्याचे खोटे समाधान आम्ही घेतो. बौध्दिक विकासाची जी मूळ संकल्पना आहे त्यापासून शिक्षण प्रक्रिया पूर्णपणे वेगळी होत चालली आहे. त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. त्याचबरोबर त्यांच्या व्यावसायिक शिक्षणाकडे लक्ष नाही. आज कॉलेजमधून बाहेर पडणारी ग्रॅज्युएट मुले असतील मग मेडिकल असो किंवा इंजिनिअरींग असो, त्यांनी स्वयंरोजगार करण्यासाठी प्रवृत्त व्हावे यादृष्टीने कोणतीही व्यवस्था आपल्या शिक्षण प्रक्रियेमध्ये नाही तसेच समाजव्यवस्थेमध्ये नाही. ज्याला आपण प्लस टू म्हणतो ते म्हणजे म्हणजे अकरावी, बारावीचे शिक्षण. व्होकेशनलायझेशन ऑफ एज्युकेशनच्या उद्देशाने 1 मे 1986 ला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. त्यामध्ये व्होकेशनलायझेशन करण्याचा निर्धार होता. पण या ठिकाणी कला, वाणिज्य, विज्ञान याच्याच खेळामध्ये आम्ही अडकून पडलो. व्होकेशनलायझ ेशनची व्याप्ती आणि सगळे बारकावे आपण माध्यमिक शिक्षणामध्ये तसेच उच्च शिक्षणामध्ये निर्माण करु शकलो नाही. मग आमची ही पिढी अतिरेकी होणे, व्यसनाधीन होणे, दिशाहीन होणे हे सर्व त्यातून निर्माण होते. नैतिक शिक्षणाचे उच्चाटन आपल्या शिक्षण व्यवस्थेतून आणि समाज व्यवस्थेतून होत आहे. मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे जाणे बाजूलाच राहिले पण मनुष्यत्वाकडून पशुत्वाकडे झुकत आहेत. त्यांनी तसे झुकू नये यादृष्टीकोनातून आपल्याला काही यंत्रणा निर्माण कराव्या लागतील. त्यासाठी ठोस पावले उचलावी लागतील. नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मागील तीन विशेष सत्रामध्ये तरुणांच्या संदर्भातील युवा धोरणाबाबत या सभागृहात नियम 260 अन्वये चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, युवा धोरण म्हणजे नेमके काय ? माझ्या मते ज्या पध्दतीने आज सांगितले गेले की, देशाची बहुसंख्य लोकसंख्या तरुण आहे, युवा आहे. 2020 साली या देशामध्ये सर्वात तरुण देश म्हणून जगामध्ये मानला जाणार आहे. म्हणून मी असे समजतो की, युवा धोरण म्हणजे युवकांना मार्ग दाखविणारे धोरण असले पाहिजे. सभापती महोदय, या चर्चेच्या वेळी अनेक विषय याठिकाणी मांडण्यात आले आहेत. परंतु मी बेसिक विषयाला हात घालणार आहे. ख-या अर्थाने ज्यावेळी मूल आईच्या गर्भात असते त्यावेळेपासून आपले मूल सुदृढ झाले पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे. मूल सुदृढ झाले, त्याचा ब्रेन विकसित झाला तर त्यातून चांगले तरुण निर्माण होऊ शकतील. युवा धोरण ज्यावेळी राबविले जाते त्यावेळी मातांचे संगोपन होणे हे युवा धोरणामध्ये असले पाहिजे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, सन्माननीय संसद सदस्या श्रीमती सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात युवा धोरणासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी वेगवेगळया समाजातील लोकांना एकत्र करुन त्यांच्या विचाराने एक मसुदा सरकारकडे सोपविला आहे. तो मसुदा सरकारने गांभीर्याने घेऊन युवा धोरण जाहीर केले आहे. सभापती महोदय, माझी सूचना आहे की, चांगले तरुण, चांगले युवक निर्माण होण्यासाठी त्यांच्यावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहेत. हे काम माता चांगल्या प्रकारे करु शकतात, वडील चांगल्या प्रकारे करु शकतात. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. मानसोपचार तज्ज्ञांच्या माध्यमातून एक चांगली फिल्म तयार करुन, चांगले लिटरेचर तयार करुन आपण आपल्या मुलांना चांगले संस्कार देऊ शकतो. त्यांची मानसिकता बदलू शकतो, त्यांच्यात चांगले गुण निर्माण करु शकू. यादृष्टीने शास्त्रशुध्द पध्दतीने अशाप्रकारची फिल्म व लिटरेचर तयार करुन महाराष्ट्रातील मातांना ते वाटले तर खऱ्या अर्थाने त्याचा पाया रचल्याचे समाधन मिळू शकते. सर्व शिक्षा अभियानातून या देशातील शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे काम सरकार करीत आहे. त्याच्यातून चांगला युवक, सुशिक्षित तरुण उभा होत

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

आहे, निर्माण होत आहे. त्याचा परिणाम काय होत आहे ? आज आपण ज्या पध्दतीने महाराष्ट्रात शिक्षण देत आहोत त्याच्यातून बेरोजगारी वाढत आहे. म्हणून तरुणांना रोजगाराभिमुख शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यावर मी अधिक बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी उदाहरण दिले की, सर्व जिल्हयात तरुण बेरोजगारांची संख्या जास्त आहे. या देशामध्ये एरोप्लेनची क्रांती आली त्यातून अनेक तरुणांना पायलटचे प्रशिक्षण मिळाले. परंतु मध्यंतरी उद्योगधंद्यांमध्ये मंदी आली त्यामुळे अनेक प्रशिक्षित पायलटना नोकऱ्या मिळाल्या नाहीत. म्हणून माझ ी सरकारला सूचना आहे की, व्यावसायभिमुख शिक्षण देण्याचा कार्यक्रम सुरु केला पाहिजे त्याचा आढावा 3 वर्षांनी घेतला पाहिजे. आज शासन इंडस्ट्री ओरिएण्टेड शिक्षण देत आहे. उद्या आपल्याला या क्षेत्रात नोकरी मिळणार असल्याने आपण हे शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांना वाटले पाहिजे. नागपूरला कार्गो हब तयार होत आहे. त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या नोक-या नजरेसमोर ठेवून मुलांना शिक्षण दिले जाणार आहे. परंतु त्याचा दर 3 वर्षांनी आढावा घेतला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश बिनसाळे ....

आपण एक कायम स्वरुपी तज्ज्ञांची कमिटी नेमून दर तीन वर्षानी इण्डट्री ओरिएण्टेड शिक्षणाचा आढाचा घेतला तर त्यातून बरेचसे काही घडण्यासारखे आहे.

सभापती महोदय, या आपण नवीन शाळांना मान्यता देतो. परंतु ही मान्यता देत असताना त्या शाळला प्लेग्राऊंड असले पाहिजे, शाळेमध्ये जिम्नॅशियम असले पाहिजे, शारीरिक शिक्षणासाठी लागणा-या सर्व सुविधा असल्या पाहिजे अशी अट ठेवावी अशी माझी सूचना आहे. म.गांधी जेव्हा आफ्रिकेतून भारतात आले त्यांनी न्या.गोखलेंनी त्यांना देश पहायला सांगितले. म. गांधी प्रथम सर्व देश फिरले आणि त्यांच्यावर देशातील परिस्थिचा परिणाम झाला. या निमित्ताने मला अशी सूचना करावयाची आहे की, शैक्षणिक, औद्योगिक अशा संस्थामध्ये काम करणा-या तरुणांना आठ दिवसाचे अनिवार्य प्रशिक्षण ठेवले पाहिजे. शहरी भागातील तरुण असेल तर त्याने ग्रामीण भागामध्ये जाऊन ग्रामीण भागातील गरिबीची, तेथील अडीअडचणींची माहिती घेतली पाहिजे. यामुळे त्याच्या मनावर परिणाम होईल आणि चांगली विचाराची दिशा मिळेल. नाही तर शहरामध्ये चांगल्या पगाराच्या नोक-या मिळून देखील तरुण आत्महत्या करताना आपल्याला दिसतात. म्हणून अशा प्रकारच्या कौन्सिलिंगची व्यवस्था विविध उद्योगातून अनिवार्य करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. या निमित्ताने मी एकच गोष्ट शासनाला सांगू इच्छितो की, ज्या प्रमाणे आदिवासी विभागासाठी वेगळे बजेट तयार केलेले आहे त्याप्रमाणे 1 दिवसाच्या मुलापासून ते 35 वर्षापर्यन्तच्या तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगळया पध्दतीचे बजेट निर्माण करावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

ॲड. वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत आणि सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आपण आपल्या राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना आपल्या देशातील 56 टक्के लोकसंख्या ही तरुणांची असणार आहे. 2020साली भारत सुपर पॉवर होण्याची स्वप्ने आपण बघत आहोत. हे सर्व पहात असताना ह्युमन डेव्हपमेण्ट इण्डेक्स कसा वाढेल यादृष्टीने आजच्या तरुणांसंबंधीचे धोरण असावे असे मला वाटते. या सुवर्ण महोत्सवी वर्षात राज्याचे युवा धोरण जाहीर झाले तर ती राज्याच्या दृष्टीने अतिशय स्तुत्य अशी बाब होईल. आपण पहातो की, आपल्या समाजामध्ये फार चटकन बदल घडत असतात. मग ते सामाजिक क्षेत्रातील असोत, शिक्षण क्षेत्रातील असोत, कुटुंब व्यवस्थेच्या संबंधातील असोत, त्यामध्ये होत असलेले बदल आपल्या दिसतात. कालची नवीन गोष्ट आज जुनी झालेली असते. काही होणारे बदल हे चांगले सुध्दा असतात तर काही बदलांमुळे अवघड परिस्थिती निर्माण होते. हे तरुणांविषयीचे धोरण ठरवित असताना मला आवर्जून सांगावयाचे आहे की, आपल्याला विविध देशांच्या युवा धोरणाचा, विविध एनजीओनी आखलेल्या युवा धोरणाचा अभ्यास करुन आपले युवा धोरण कसे असले पाहिजे हे ठरविण्याची आवश्यकता आहे. कारण सर्वव्यापी विचार करुन हे धोरण झालेले असते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून नवमहाराष्ट्र युवा अभियान कार्यक्रमाचा एक जाहीरनामा श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या पुढाकाराने शासनाला देण्यात आलेला आहे त्यामध्ये युवकांचा सर्वांगीण विकास कसा होईल हे नमूद केलेले आहे. शिक्षण, उपजीविका, सामाजिक सुरक्षा, पर्यावरण, क्रीडा, मनोरंजन, कला संस्कृती, नागरिकत्व आणि लोकांचा सहभाग या विविध विषयावर उहापोह झालेला आहे. म्हणून या विषयाचा निश्चित विचार करावा हे मला सांगावयाचे आहे. हे धोरण ठरवित असताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपला देश, समाज हा जात, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती, रीतिरिवाज आणि भौगोलिकता अशा विविधतेने नटलेला आहे. तसेच समाजामध्ये आर्थिकदृष्टया वेगवेगळे घटकही आहेत. काही युवकांना चांगले शिक्षण मिळते. हे शिक्षण मिळत असताना आपण समाजाचे काही तरी देणे लागत आहोत अशा

..3..



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

(ॲड. वंदना चव्हाण..

प्रकारचे विचार आणि सेवाभावी वृत्ती त्यांच्यामध्ये कशी निर्माण होईल अशा प्रकारची आखणी धोरणा मध्ये असली पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण.........

मला आजही आठवते की, शाळांमध्ये काहीतरी सेवाभावी काम करण्याची संधी आम्हाला मिळत होती. किंबहुना ते सक्तीचे असायचे. आज जर्मनीसारख्या देशात सेवाभावी काम करण्याच्या दृष्टीने एनएसएस असेल किंवा एनसीसी असेल, दहावीनंतर मुलींना सूट आहे परंतु मुलांसाठी एक वर्षाचे सेवाभावी शिक्षण सक्तीचे केलेले आहे. त्यासाठी आर्मी की हाऊस ऑफ सोशल सर्व्हिस असा चॉईस दिला जातो. आर्मीमध्ये जाणे मुलांना नको असते. कारण तेथील काम खूप स्ट्रेनियस असते. सोशल सर्व्हिस नको असते. त्यांना वाटते की, मुलांच्या संदर्भात दुजाभाव निर्माण केला जातो. मुलांविषयी भेदभाव केला जातो. हीच मुले ज्यावेळी सामाजिक काम करतात, अपंगांच्या संस्थांमध्ये जातात, ओल्डएज होममध्ये जातात आणि एक वर्ष काम करतात. त्यानंतर त्यांच्या मानसिकतेत बदल घडून येतो. आयुष्यभर माणसाला मानसिकदृष्टया पूर्णपणे बदलून टाकणारा हा उपक्रम आहे. आपल्या देशात हे कितपत शक्य आहे हे मला सांगता येणार नाही. परंतु एका वर्षासाठी एनएसएस, एनसीसी योजना सक्तीची झाली पाहिजे. किंबहुना सामाजिक कार्य केल्याबद्दल एक प्रमाणपत्र दिले पाहिजे. मुले किंवा मुली नववी, दहावीमध्ये गेल्यानंतर असे सामाजिक शिक्षण दिले गेले तर त्यांची मानसिकता बदलण्यास मदत होईल.

सभापती महोदय, आज एक गट असा आहे, ज्यांना शाळा पहावयास मिळत नाही. शाळेत जायची संधी मिळाली तर ती शाळा घरापासून खूप दूर असते. शाळेपर्यंतचे अंतर पायी चालत जावे लागते. या मुलांना काय सोयी देऊ शकतो याचा निश्चितपणे विचार झाला पाहिजे. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कॉलेजमध्ये जाण्याची संधी मिळत नाही. विशेषत: मुलींच्या संदर्भात असे दिसून येते की, शालेय शिक्षण पूर्ण झाले की त्यांचे पुढील शिक्षण बंद केले जाते. गावाकडे किंवा हॉस्टेलमध्ये कुठे राहणार या संदर्भात पालकांच्या मनामध्ये साशंकता असते. त्यामुळे हॉस्टेलची सोय युवकांना मिळणे गरजेचे आहे. आणखी एक गट असा आहे, ज्यांना शाळेत जाणे शक्य होत नाही. कारण घरची परिस्थिती खूप गरिबीची असते. हातावर पोट असते. त्यामुळे आजचा दिवस काम केले नाही तर जेवायला मिळणार नाही अशी त्यांची अवस्था असते. चाईल्ड ॲब्यूज आणि चाईल्ड लेबर यांच्या दृष्टीने धोरणामध्ये काय तरतूद करता येईल याचाही विचार व्हावा अशी मी विनंती करते.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण......

सभापती महोदय, व्यसनाधीन झालेल्या, अपंग आणि मानसिकदृष्टया विकलांग झालेल्या मुलांना देखील मदतीचा हात द्यावा लागेल. त्यादृष्टीने धोरणामध्ये विचार होणे गरजेचे आहे. लहान मुलांसाठी, अपंगांसाठी एनजीओंच्या माध्यमातून काही ठिकाणी केंद्रे सुरु केलेली आहेत. परंतु १८ वर्षापुढील युवकांसाठी ही सेवा उपलब्ध नाही. त्यादृष्टीने युवा धोरणामध्ये विचार झाला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, व्होकेशनल ट्रेनिंगच्या बाबतीत जो ड्रॉपआऊट आहे तो कमी करण्यावर भर देणे गरजेचे आहे. कॉलेजमध्ये काऊन्सिलिंग होणे गरजेचे आहे. काही वर्षापूर्वी काऊन्सिलिंगची पध्दत सुरु केलेली होती. आज ती पध्दत बंद झालेली आहे. शिक्षक आणि पालकांच्या दृष्टीने सुध्दा काऊन्सिलिंग करण्याची गरज आहे. ज्या पध्दतीने काही शिक्षक या युवा पिढीशी बोलतात, एकदम तोडून बोलतात, पालक सुध्दा आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये ही स्थिती हँडल करु शकत नाही. अशा प्रकारच्या शिक्षकांना आणि पालकांना इनपुट देण्याची गरज आहे. कॉलेजमध्ये, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण केले जाते. कन्झ्युमर प्रोटेक्शन, सेक्च्युअल हरॅसमेंट, डोमेस्टिक व्हायलन्स याबाबतचे शिक्षण कॉलेजमध्ये शिकविले गेले पाहिजे. त्यादृष्टीने युवकांची मानसिकता तयार केली पाहिजे. एक चांगला नागरिक कसा तयार होईल, त्यांचे पब्लिक पार्टिसिपेशन कसे वाढेल, गव्हर्न्मेंटमध्ये सहभाग कसा वाढेल यावर भर दिला पाहिजे. शासन सर्व काही करु शकत नाही. लोकांचा सहभाग महत्वाचा असतो. हे विचार त्यांच्यामध्ये रुजविले तर निश्चित चांगला इफेक्ट मिळू शकतो. या सर्व गोष्टी युवा धोरणामध्ये अंतर्भूत व्हाव्यात अशी माझी विनंती आहे. हे युवा धोरण डायनॅमिक असले पाहिजे. दर वर्ष दोन वर्षानंतर या धोरणाचा आढावा घेतला पाहिजे. सतत बदल घडत असतात. एखाद्या सेक्टरचा अनवधानाने समावेश झाला नसेल तर त्यादृष्टीने कोणती तरतूद करु शकतो याचाही विचार झाला पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

------

नंतर क्यू.१...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अतिशय चांगल्या विषयावर सभागृहात तीन दिवसांपासून चर्चा सुरु आहे. या निमित्ताने मला या ठिकाणी महत्वाचे वाटतात असे काही मुद्दे मी सांगणार आहे तसेच काही सूचना सुध्दा करणार आहे. तरुणांचे वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळे प्रश्न आहेत. त्यात ग्रामीण भागातील व शहरी भागातील तरुण असतील त्यांचे प्रश्न सुध्दा वेगवेगळे असतात. त्यांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्यासाठी तरुण नेतृत्व देशाच्या पातळीवर पुढे येत आहे. या तरुणांच्या ज्या अपेक्षा आहेत ते आमच्या पक्षाचे तरुण नेते माननीय श्री. राहुलजी गांधी हे या युवा धोरणाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या माध्यमातून निश्चितपणे तरुणांच्या अपेक्षा पूर्ण होतील असा मला विश्वास आहे. युवकांबरोबरच युवतींचे देखील काही प्रश्न फार महत्वाचे आहेत. महिलांसाठी सेवायोजन कार्यालयात स्वतंत्र कक्ष असावा आणि महिलांची त्यात स्वतंत्रपणे नोंदणी होणे फार आवश्यक आहे असे मला वाटते. महिलांसाठी कॉल लेटर पाठविताना, ज्या ठिकाणचे कॉल लेटर्स आहेत, जेथे त्यांना प्रत्यक्ष काम करावयाचे असते ते ठिकाण लांब असल्यामुळे असे कॉल पाठविलेच जात नाहीत हा अन्याय दूर व्हावा अशी माझी विनंती आहे. तो अन्याय दूर होण्यासाठी वर्किंग विमेन्सची व्याप्ती वाढविली गेली पाहिजे. तसेच वुमेन्स होस्टेल्समध्ये आरोग्य सुविधा, लायब्ररी, जिम तसेच इंटरनेट अशा सुविधा देखील उपलब्ध व्हाव्यात अशीही सूचना मी करीत आहे. महत्वाचा प्रश्न असा आहे की, ज्यावेळी या महिला काम करीत असतात त्यात काही वेळेस सर्वांना कामाच्या ठिकाणी त्रास होत असतो. त्याबाबत त्यांनी पोलिसात तक्रार केली तर त्यांना होस्टेलमधून काढले जाते हा गंभीर प्रश्न आहे. म्हणून अशा होस्टेल्सच्या अधीक्षिकांकडे अशा तक्रारी नोंदवून त्यांच्यामार्फत पोलिसात तक्रार दिली पाहिजे. कारण अधीक्षिका म्हणजे या गार्डियन्स असतात. त्यांच्या माध्यमातून पोलिसात तक्रारी गेल्या तर त्याची गंभीरपणे दखल घेण्यात यावी. त्याचबरोबर तरुण महिलांचे प्रमाण आजकाल कॉल सेंटर्सवर जास्त वाढत आहे. तसेच कॉल सेंटर्सची संख्या सुध्दा वाढत आहे. कारण या कॉल सेंटर्सवर जास्त पैसा मिळतो म्हणून तरुण मुले व मुलींचा जास्त कल तिकडे वाढतो. पण बऱ्याच वेळा त्यातून गंभीर प्रकार वाढतात. कारण कॉल सेंटर्सची डयुटी रात्रीच्या वेळेस असते आणि ती महिलांना करावी लागते त्यातून हे प्रकार वाढण्याची शक्यता असते म्हणून हा गंभीर असा सामाजिक प्रश्न निर्माण होत आहे. पुण्यात नुकतीच एक घटना घडली की, रात्रीची ड्युटी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी ......

पूर्ण करुन ड्रायव्हरने त्या महिलेला घरी सोडत असताना रस्त्यात तिच्यावर बलात्कार केला. म्हणून अशी प्रकरणे वाढू नयेत यासाठी शासनाने अशा रात्रीच्या डयुटीज महिलांना देऊ नयेत या अनुषंगाने कंपन्यांवर बंधन घालावे. एवढे बोलून वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करते.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अतिशय चांगल्या प्रकारचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त व इतर सदस्यांनी सभागृहात चर्चेला आणला आहे. या प्रस्तावावर चर्चा करताना अनेक सन्माननीय सदस्यांची आपले विचार व्यक्त केले तसेच अनेक महत्वाचे मुद्दे सुध्दा उपस्थित केले. त्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही तर फक्त चार-पाच महत्वाच्या सूचना या निमित्ताने करणार आहे. युवा कल्याणाच्या संदर्भात जो प्रस्ताव येथे आला आहे त्या निमित्ताने ज्या ज्या अपेक्षा व्यक्त केल्या त्या सर्वच्या सर्व अपेक्षा शासनाकडून पूर्ण होतील असे वाटत नाही. आपण तशी अपेक्षा सुध्दा करु शकत नाही पण किमान या प्रस्तावाच्या निमित्ताने यासंदर्भातील धोरण निश्चित केले तर त्यात कदाचित काही त्रुटी राहतील पण असे धोरण निश्चित करण्याबाबतचा निर्णय तातडीने घ्यावा अशी माझी विनंती आहे. तसेच असे धोरण घेतल्यानंतर त्याची अमलबजावणी हा विषय सर्वात महत्वाचा आहे. जे धोरण ठरेल त्याची योग्य प्रकारे अमलबजावणी होणे हे महत्वाचे असल्याने शासनाने यादृष्टीने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. महोदय, आज आपण असे म्हणतो की तरुण पिढी भरकटत चालली आहे, व्यसनाधिन तसेच गुन्हेगारीकडे वळत आहे. हे टाळावयाचे असेल तर त्यादृष्टीने आपल्याला काही उपाययोजना देखील या धोरणाबरोबर करणे आवश्यक आहे. आमची विनंती अशी आहे की, या बेरोजगारांना अथवा शिक्षण घेतलेल्या पण नोकरी नसलेल्या विद्यार्थ्यांचे नैराश्य कमी करण्यासाठी तसेच त्यांची व्यसनाकडे व गुन्हेगारीकडे वळणारी पावले थांबविण्यासाठी अथवा हे प्रमाण कमी करण्यासाठी आपण या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांचे समुपदेशन करणे या गोष्टींची सुध्दा आवश्यकता आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

समुपदेशनाचे मार्गदर्शन शाळेत आणि महाविद्यालयात मिळू शकते. समुपदेशकांना अनुभवाची आवश्यकता आहे. या समदपदेशकांना एक वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते व समुपदेशक म्हणून हे एक वर्षाचे प्रशिक्षण घेतलेले समूपदेशक शाळेत शिक्षक म्हणून घेतले जातात. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, बौद्धिक चाचणी घेऊन त्या विद्यार्थ्याने कोणत्या शाखेकडे जावे यासाठी समुपदेशक मार्गदर्शन करीत असतात. परंतु समुपदेशकाच्या कार्यालयाची अवस्था मात्र चांगली नाही. समुपदेशकाचे सर्व कामकाज ठप्प झालेले आहे. त्यामुळे चांगल्या प्रकारचे समुपदेशक मिळण्यासाठी विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, क्रीडा धोरण अत्यंत महत्वाचे आहे. विधानसभेत माननीय मंत्रीमहोदयांनी क्रीडा धोरण जाहीर केलेले आहे. त्यामुळे या क्रीडा धोरणाचा आपल्या तरुणांना फायदा होणार आहे. तरुणांवर चांगले संस्कार होणे अत्यंत महत्वाचे आहे. संस्कार हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. माणूस कमी शिकला किंवा जास्त शिकला तरी त्याच्यावर संस्कार होणे अतिशय आवश्यक आहे. माणूस कमी शिकला आणि त्याच्यावर चांगले संस्कार झाले असतील तर तो माणूस सुध्दा कोठल्याकोठे जात असतो. संस्काराचे शिक्षण शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दिले जात असते. एनसीसी आणि एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संस्कार शिकवले जातात. स्काऊट गाईड हा विषय सुध्दा शाळेतील मुलांना असतो. स्काऊट गाईड द्वारे सुध्दा चांगल्या प्रकारचे संस्कार मिळत असतात. परंतु आता एनसीसी आणि स्काऊट गाईड हे विषय बाजूला पडले आहेत. त्यामुळे एनसीसी आणि स्काऊट गाईड या विषयाला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. आपल्या शाळेतील 9 वी 10 वी च्या विद्यार्थ्यांना किंवा 11 वी 12 वी च्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण दिले जाते. परंतु आज आपल्याकडे जे काही व्यावसायिक शिक्षण दिले जाते त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. जे व्यवसाय आता उपयोगी नाही त्या ऐवजी नवीन व्यावसायिक विषय मुलांना दिले पाहिजे. रेडिओ दुरुस्ती, शाई तयार करणे, स्टोव्ह रिपेअर करणे, खडू तयार करणे असे जे व्यावसायिक शिक्षण आता दिले जाते ते कमी करुन एसएससी नंतर पुढे काय करता येईल, विद्यार्थी स्वत:च्या पायावर उभा कसा राहू शकेल यादृष्टीने व्यावसायिक शिक्षण दिले गेले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

त्यामुळे याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज आपल्याकडे मोठया प्रमाणात बेरोजगार आहेत. जे विद्यार्थी ग्रॅज्युएट झालेले आहेत त्यांना मुलाखती कशा द्याव्यात यासाठी तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे याबाबतीत विचार होण्याची आवश्यकता आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो व माझे दोन शब्द येथेच थांबवतो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ( क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये युवा आणि क्रीडा धोरणाच्या प्रस्तावावर गेल्या तीन दिवसापासून सभागृहात चर्चा होत आहे. या चर्चेवर जवळ जवळ 20 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामुळे मी सर्वात प्रथम आपले आणि या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्या सर्वांचे अभिनंदन करतो. कारण पहिल्यांदाच या सभागृहात युवा आणि क्रीडा धोरणावर चर्चा झालेली आहे. गेल्या आठवडयात विधानसभेत साडेतीन ते चार तास क्रीडा धोरणावर चर्चा झाली होती व या चर्चेमध्ये 20 ते 25 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला होता. गेल्या वर्षी नवीन सरकार माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. नव्या सरकारने शपथ घेतल्यानंतर पहिल्या प्रथम युवा आणि क्रीडा धोरणाच्या संदर्भात निर्णय घेतला होता.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

यासंबंधातील घोषणा नागपूर अधिवेशनामध्ये केली. सर्व राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधी समितीमध्ये असावेत अशा स्पष्ट मताचा मी होतो. म्हणूनच या समितीमध्ये राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्यासह एनजीओ व विद्यापीठांच्या प्रतिनिधींचा समावेश समितीमध्ये करण्यात आला. मी दोन्ही सभागृहाच्या माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांना तसेच सर्व गट नेत्यांना पत्र लिहून आपल्या पक्षातर्फे प्रतिनिधीत्त्व कोण करणार आहे, त्यांची नावे मागविली होती. नावे येण्यास थोडा उशीर झाला. तेव्हा माझ्या मनात शंका आली की, राष्ट्रीय पक्षांना युवा धोरण, क्रीडा धोरण ठरविण्यासाठी रूची आहे की नाही ? पण काही दिवसांनी नावे आली. 20 तारखेला युवा आणि क्रीडा धोरणासंबंधी जी.आर.निघाला. माझ्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. या समितीमध्ये विधिमंडळाच्या सदस्यांचा तसेच एनजीओ व विद्यापीठ प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला. सुरूवातीच्या दोन्ही बैठकांना मी उपस्थित राहू इच्छितो अशी भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली होती. मला सांगायला आनंद होतो की, युवा व क्रीडा धोरणासंबंधीची पाहिली बैठक सह्याद्री अतिथीगृहावर झाली तेव्हा माननीय मुख्यमंत्री दोन ते अडीच तास बसले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी मनापासून या दोन्ही विषयावरील चर्चेत भाग घेतला.

सभापती महोदय, युवा धोरणाला इतिहास आहे. देशात पहिले युवा धोरण सन 1987-1988 मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी जाहीर केले होते. तेव्हा मी केंद्र सरकारच्या युथ वेल्फेअर ॲडव्हायझरी कमिटीचा सदस्य होतो. त्यानंतर सन 2003 मध्ये केंद्र सरकारने दुसरे राष्ट्रीय युवा धोरण जाहीर केले. मी येथे असेही सांगू इच्छितो की, काही राज्यांनी सन 1980-1990 च्या काळात आपले स्वत:चे युवा धोरण जाहीर केले होते. सन 1995 मध्ये श्री.शरद पवार या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी मी युवक केंद्राचा उपाध्यक्ष होतो. तेव्हा माझी श्री.शरद पवार साहेबांशी दिल्ली येथे भेट झाली. मी श्री.शरद पवार साहेबांसोबत काम केले आहे. त्यांना मी युवा धोरण केले पाहिजे असे सूचविले व श्री.पवार साहेबां बरोबर अर्धा तास या विषयी चर्चा केली. श्री.पवार साहेब मला म्हणाले की, मी पुढच्या आठवड्यात आल्यानंतर मला येऊन भेट आपण युवा धोरण ठरवू या. श्री.पवार साहेब पुढच्या आठवड्यामध्ये दिल्लीला आल्यानंतर परत आमची अर्धा तास चर्चा झाली आणि त्यावेळी महाराष्ट्रासाठी नवीन युवा धोरण आणण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

परंतु घडले असे की, एक महिन्यानंतर निवडणुका जाहीर झाल्या आणि काँग्रेस पक्षाला विरोधी पक्ष म्हणून काम करावे लागले. माझ्याकडे या विभागाचा कार्यभार सोपविण्यात आल्यानंतर मी प्रथम युवा आणि क्रीडा धोरण राबविण्याचा निर्णय घेतला. युवा धोरणावर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी केलेल्या सूचना सरकारने युवा धोरणात आधीच समाविष्ट केलेल्या आहेत.

सभापती महोदय, आपल्या काळात कॉलेजमध्ये जाणारी पिढी आणि आता कॉलेजमध्ये जाणारी पिढी यामध्ये खूप अंतर आहे. आपण कॉलेजमध्ये शिकत असताना आपणास कोणत्याही क्षेत्रात फारशा संधी उपलब्ध नव्हत्या. परंतु आज तशी परिस्थिती नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, आजची पिढी कानात इअरफोन घालून समोर इंटरनेट सर्फींग करताना दिसते. आजच्या तरुणांमध्ये आपण सकारात्मक बदल पाहत आहोत. 25 वर्षापूर्वी ज्या संधी आम्हाला सहजा सहजी उपलब्ध होत नव्हत्या मग ते शिक्षण असो, सांस्कृतिक कार्यक्षेत्र असो,नोकरी असो, क्रीडा क्षेत्र असो,आज आपण ग्लोबल झाल्यामुळे आजच्या तरुणांना विविध प्रकारचे प्लॅटफॉर्म उपलब्ध आहेत. 25 वर्षापूर्वी माध्यमिक शाळेतून बाहेर पडल्यावर आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स अशा तीन फॅकल्टीज होत्या. त्यावेळी 60-70 टक्के मिळाले म्हणजे खूप काही होते. त्याकाळात 60 टक्के वा त्यापेक्षा जास्त टक्के मिळविणारे विद्यार्थी सायन्सकडे जायचे ,50 टक्के मिळविणारे विद्यार्थी कॉमर्स्‌कडे जायचे तर 35 ते 40 टक्के मिळविणारे विद्यार्थी आर्टस्‌कडे जायचे आणि हे ठरलेले असायचे. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आज 90 टक्के मिळविणारा विद्यार्थी आर्टस्‌कडे जाताना दिसतो. 80 टक्के मिळविणारा विद्यार्थी कॉलेज सोडून व्होकेशनल ट्रेनिंग प्रोग्राम करतो कारण आज तरुणांना विविध संधी उपलब्ध आहेत.

सभापती महोदय, आपण युवा धोरण ठरविताना दोन गट केले आहेत. पहिल्या गटात 13 ते 19 वयोगटातील युवकांसाठी कार्यक्रम तयार केलेला आहे तर दुसऱ्या गटात 20 ते 35 वयोगटातील युवकांसाठी कार्यक्रम तयार केलेला आहे. त्याशिवाय आम्ही दोन विषय घेतलेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

आहेत. पहिला विषय म्हणजे आजच्या युवकांचे अधिकार काय आहेत तर दुसरा विषय आजच्या युवा पिढीकडून आपल्या अपेक्षा काय आहेत. युवा पिढीकडून समाजाच्या,आईवडिलांच्या,परिवाराच्या काय अपेक्षा आहेत हा विषय घेतलेला आहे. पहिल्या टप्प्यातील युवकांना अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. आपण राईट टू एज्युकेशन ॲक्ट केलेला आहे. त्यानुसार 14 वर्षापर्यंतच्या मुलाला सक्तीचे शिक्षण दिलेले आहे. परंतु 14 वर्षानंतर काय याचा आपणास विचार करावा लागेल.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेशशेट्टी................

.विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर फॉर्मल आणि इन्फॉर्मल एम्प्लायमेन्ट मिळण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत. विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याने पुढे काय करावयाचे यासंबंधी देखील शासनाला विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय, बाल कामगारांच्या संदर्भात देखील या ठिकाणी चर्चा करण्यात आली असून बाल कामगार हा समाजातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे.या समितीमधील सदस्यांनी बाल कामगार हा वेगळा इश्यू घेऊन त्यांचा अभ्यास केला पाहिजे.13 ते 19 वयोगटातील मुलांचे आणि मुलीचे काही महत्वाचे प्रश्न असून त्याबाबतीत देखील विचार करावा लागणार आहे. खास करुन मुलीसबंधी या धोरणामध्ये काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील असे मला आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, 13 ते 19 वयोगटातील मुला मुलींचे फिजिकल, इमोशनल आणि सेक्सुअल एक्सप्लॉयटेशन केवळ मुंबईमध्येच होते अशातला भाग नाही तर राज्यातील ग्रामीण भागात देखील मुला मुलींचे तीनही बाबतीत मोठया प्रमाणावर एक्सप्लॉयटेशन होत असते.त्यामुळे या संदर्भात देखील शासनाला विचार करावा लागेल.

सभापती महोदय, मुले आणि मुली शाळेमध्ये जातात परंतु पाचवी नंतर ते शाळेमधून बाहेर पडतात. राज्यामधील विद्यार्थ्यामध्ये गळतीचे जे प्रमाण आहे त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी या चर्चेच्या निमित्ताने काही मुद्दे मांडले आहेत. जी मुले शाळेतून बाहेर पडतात त्यांनी शेतामध्ये काम करावे वा कारखान्यात काम करावे असे त्यांना सांगितले जाते.शाळेतील आणि महाविद्यालयातील जे विद्यार्थी शाळा सोडून बाहेर पडतात त्यांच्यासाठी परदेशामध्ये काही खास कार्यक्रम राबविण्यात येतात.शाळा, महाविद्यालयातून बाहेर पडलेले विद्यार्थी पुन्हा शाळा, कॉलेजमध्ये जावेत यासाठी आपल्या राज्यात मात्र खास कार्यक्रम राबविण्यात येत नसल्यामुळे तो कार्यक्रम देखील आपल्याला राबवावा लागेल.

सभापती महोदय, ड्रग्ज ॲब्युज आणि अल्कोहोलिझम संबंधी देखील या ठिकाणी चर्चा करण्यात आली होती. 1970 मध्ये ड्रग्ज ॲब्युजच्या संदर्भात केन्द्र सरकार आणि राज्य सरकारने काम केलेले आहे. अनेक स्वयंसेवी संस्था या कामामध्ये शासनाला मदत करीत असतात त्यामुळे ड्रग्ज ॲब्युजचे प्रमाण देशात आणि राज्यात आता कमी झालेले आहे.सन्माननीय सदस्यांनी हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी................

विषय या ठिकाणी उपस्थित केलेला असल्यामुळे धोरण ठरवितांना त्यासंबंधीचा शासनाला विचार करावा लागेल. ड्रग्ज ॲब्युज आणि एच.आय.व्ही.च्या अवेअरनेससंबंधी शासनाने एकत्रितपणे कार्यक्रम घेण्याचे ठरविले आहे. त्याचबरोबर सायबर क्राईमसंबधी देखील शासनाला विचार करावा लागणार आहे. 35 पेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये सायबर क्राईमचे प्रमाण वाढत चालले आहे.या प्रस्तावावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी असे सागितले की घरातून अनेक लहान मुले पळून जातात व ती मुले परत सापडत नाहीत. 30 ते 35 वयोगटापेक्षा कमी वयोगटातील मुले घरातून निघून मुंबईला पळून येतात आणि मुंबईतील सी.एस.टी., मुंबई सेन्ट्रल, आणि कल्याण या रेल्वे स्थानकावर उतरल्यानंतर पाच सात मिनिटांमध्ये लगेच गायब होतात. संपूर्ण देशातून मुंबईमध्ये मुले पळून येत असतात व त्याच्या सदर्भात ते एक कार्यक्रम राबवत आहेत असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते. ते राबवत असलेला कार्यक्रम अतिशय स्त्युत्य आहे व त्या संदर्भात देखील शासनाला लक्ष द्यावे लागेल.

सभापती महोदय,शासन कोण कोणते कार्यक्रम राबविणार आहेत याबाबतीत शासनाने काही निर्णय घेतलेले आहेत त्यानुसार 30-40 जणांची एक समिती शासनाने नेमली असून या विषयाच्या संदर्भात केवळ या समितीमधील सन्माननीय सदस्यांमध्येच चर्चा होईल असे नाही तर दोन्ही सभागृहामध्ये या विषयाची चर्चा झाली असून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी त्या चर्चेच्या अनुषंगाने आपले म्हणणे मांडले आहे. या व्यतिरिक्त त्यांना काही मुद्दे मांडावयाचे असतील तर त्या समितीसमोर जाऊन देखील त्यांना आपले मुद्दे मांडता येतील. त्यासाठी त्यांना निमंत्रण पाठविण्यात येईल.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : या सभागृहामध्ये तशाप्रकारची घोषणा झालेली नाही.

श्री.सुरेश शेट्टी : तुमच्या नेत्यांचे पत्र माझ्याजवळ आहे. तुमच्या पक्षाकडून आले आहे. त्यामध्ये तुमचे नाव आहे.

डॉ.दीपक सावंत : माझे नाव असेल, परंतु या सभागृहामध्ये जी घोषणा झाली पाहिजे ती झ ाालेली नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याकडे त्या संबंधीचा जी.आर. असून मी तो सभागृहाच्या पटलावर ठेवतो. या समितीमध्ये अमूक एक सदस्य राहिले पाहिजेत अशाप्रकारची ही स्ट्रिक्ट कमिटी नाही. या समितीपुढे आमदारांना देखील आपले विचार मांडावयाचे असतील तर त्यांना मांडता येतील. माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी मराठवाडा व विदर्भातील अनुशेषासंबंधी मुद्दा उपस्थित केला. त्याचबरोबर त्यांनी नोकरीच्या संधी व महाविद्यालयीन प्रवेशासंबंधी मुद्दे उपस्थित केले. या दोन्ही मुद्दयांच्या बाबतीत माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख सरांनी समितीच्या पुढील बैठकीमध्ये येऊन समितीला मार्गदर्शन करावे अशी मी त्यांना विनंती करतो. तसेच, या सभागृहातील सर्व माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपल्याकडे काही सूचना असतील तर त्याबाबतीत आपण समितीपुढे येऊन समितीला मार्गदर्शन करावे. त्या सूचनांचा समावेश आपण आपल्या तयार होणाऱ्या धोरणामध्ये करु. त्याहीपुढे जाऊन सांगू इच्छितो की, प्रत्येक विभागीय मुख्यालयामध्ये व जिल्हा स्तरावर यासंबंधी आपण एक शिबीर भरविणार आहोत. तरुण युवक-युवतींना त्या शिबिरामध्ये भाग घेऊन ज्या काही सूचना करावयाच्या असतील त्या त्यांनी कराव्यात. आज सुध्दा लोकांकडून मला पोस्ट कार्ड येत आहेत, मला लोक ई-मेल पाठवित आहेत. त्याचप्रमाणे अनेक लोकांचा व तरुणांचा युवा धोरण व क्रीडा धोरण ठरविण्याच्या बाबतीत खूप इंटरेस्ट आहे. आम्ही केलेल्या सूचनांचा समावेश आपल्या धोरणामध्ये करावा याकरिता लोकांकडून मला पोस्टकार्ड व ई-मेलव्दारे सूचना पाठविण्यात येत आहेत. या राज्यातील युवकांसाठी आपण एक चांगले धोरण तयार करीत असतांना त्यासाठी एक ते दोन महिन्यांचा उशीर झाला तरी काहीही फरक पडत नाही. त्याकरिता आपण पाच उप समित्या निर्माण केल्या आहेत. यामध्ये व्होकेकशनल ट्रेनिंग, स्कील डेव्हलपमेंट, रुरल डिव्हिजन आणि अंमलबजावणी यंत्रणा या उपसमितीचे चेअरमन विधानसभेचे माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. सुरेश शेट्टी....

त्याचप्रमाणे हेल्थ, एन्व्हायरनमेंट, सोशल सेक्टर या समितीच्या चेअरमन माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे या आहेत. त्याचप्रमाणे सभागृहाबाहेरील प्रोफेशनल लोकांनाही आम्ही कन्सल्ट करीत आहोत. त्यामध्ये मध्यप्रदेश व दिल्ली येथील तज्ज्ञ लोकांना आम्ही कन्सल्ट करीत आहोत. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे विद्यापीठाच्या तज्ज्ञ लोकांना आपण कन्सल्ट करीत आहोत. यामध्ये आम्ही चार गट तयार केले असून सायन्स टेक्नॉलॉजी, आर्ट कल्चर, ट्रायबल वेल्फेअर व युथ वेल्फेअर यांच्यासाठी एक स्वतंत्र समिती केली आहे. या समित्याच्या पाच-सहा बैठका झाल्या असून त्यांनी एक प्रारुप तयार केला आहे. त्यानंतर आपण पुन्हा स्थानिक पातळीवर बैठक घेऊन व सर्व तज्ज्ञ मंडळींना कन्सल्ट करणार आहोत. युवकांसाठी तयार करावयाच्या धोरणासाठी आपण या समितीला माहिती द्यावी, किंवा सूचना द्याव्यात म्हणून सर्व मंत्रिमहोदयांना आणि सर्व विभागाच्या सचिवांना देखील पत्रे पाठविण्यात आली आहेत. सभापती महोदय, आपण धोरण ठरवित असतांना हेल्थ, इंडस्ट्री, स्पोर्ट्स, ॲग्रिकल्चर अशाप्रकारच्या सात-आठ विभागांचा समावेश या युवा धोरणामध्ये करणार आहोत. या धोरणाची अंमलबजावणी कशी करावयाची यासंबंधी आम्ही एक मेकॅनिझम तयार करणार आहोत. याकरिता संबंधित खात्याच्या सन्माननीय मंत्र्यांची सुध्दा लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. त्यामुळे आपण कार्यक्रम राबवीत नाही असे नाही. आपण वेगवेगळया तऱ्हेने कार्यक्रम राबवीत आहोत. परंतु त्या कार्यक्रमामध्ये लिंकेजेस नाही, ते सुध्दा आपण करणार आहोत. आज एखादा विद्यार्थी किंवा युवक प्रत्येक विभागामध्ये जाऊन त्याच्यासाठी कोणता कार्यक्रम तयार केला आहे हे शोधत असतो. त्याकरिता या युवकांसाठी राज्य स्तरावर, जिल्हा स्तरावर सिंगल विंडो एजन्सी आपल्याला करावी लागेल. त्यामध्ये त्यांचे कौन्सिलिंग असेल, जॉब ॲपॉर्च्युनिटी असेल, व्होकेशनल ट्रेनिंग असेल, स्कील्ड डेव्हलपमेंट असेल. खासकरुन आज जे युवक रिस्क फॅक्टरमध्ये आहेत, फिजिकली डिसॅबल्ड आहेत, स्कूल ड्रॉपाऊट आहेत, सेक्स्युअली हॅरॅस्ड आहेत त्यांच्यासाठी वेगळा कार्यक्रम करावा लागेल.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

मेकॅनिझम एस्टाब्लीश करण्याचे काम या समितीने हातामध्ये घेतले आहे. त्याचे इम्प्लीमेन्टेशन कसे करणार. त्याचा रिव्हयू कसा घेणार या संबधीच्या रफ गाईडलाईन्स तयार कराव्या लागतील. शासन धोरण जाहीर करते पण त्याचे मॉनिटरिंग आणि इम्प्लीमेन्टशन होते काय? महाराष्ट्र राज्यासाठी दहा वर्षापूर्वी क्रीडा धोरण करण्यात आले. अतिशय सुंदर असे ते क्रीडा धोरण आहे. आपण आजही ते वाचले तर पुन्हा ते रीपिट करु शकतो. पण या क्रीडा धोरणाचे मॉनिटरिंग झाले नाही. इम्प्लीमेन्टेशन झाले नाही. हे इम्प्लीमेन्टेशन करणे फार महत्वाचे आहे. आता नव्याने जे युवा धोरण आणि क्रीडा धोरण तयार करण्यात येणार आहे त्याचा प्रत्येक तीन वर्षाने रिव्हयू घेण्यात येणार आहे. तो रिव्हयू घेताना यासंदर्भात या दोन्ही सभागृहात चर्चा करण्यात येईल. त्या चर्चेमध्ये या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये काही कमतरता आहेत काय? त्यामध्ये काही दुरुस्ती करावी लागेल काय?याबाबत सखोल चर्चा होईल आणि त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मातीतील खेळाच्या बाबतीत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मग तो कबड्डी असेल, कुस्ती असेल, खो-खो असेल या खेळांवर खास लक्ष देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच या समितीमध्ये काही नामवंत लोकांना घेतलेले आहे. मातीतील खेळांच्या समितीचे अध्यक्ष सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. संभाजीराव पवार यांना केलेले आहे. त्यांच्या बरोबर काही प्रोफेशनल लोक आहेत, काही ऑलिंम्पिक खेळामध्ये भाग घेतलेले खेळाडू आहेत. काही आशियायी खेळांचे खेळाडू आहेत. महाराष्ट्रातील कुस्ती, कबड्डी आणि खो-खो या तीन मूळ खेळांना कसे प्रमोट करायचे याचा विचार ही समिती करील. आपण या खेळांच्या राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करतो त्यावर लाखो रुपये खर्च करतो त्या ठिकाणी मी बऱ्याचवेळा जातो. पण या स्पर्धांमध्ये हरियाणा, पंजाब आणि कर्नाटकचे संघ जिंकतात.

सभापती महोदय, देश प्रेम आणि ती भावना कशी वृंध्दींगत करावयाची याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. तेली साहेबांनी अत्यंत महत्वपूर्ण मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. राष्ट्रगीत म्हणताना कसे उभे रहायचे हे काही लोकांना माहीत नाही आणि काही लोकांना तर राष्ट्रगीतच येत नाही. जनगणमन, वंदे मातरम् लोक विसरुन जातात ही फार गंभीर समस्या आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

याबाबतीत आपणा सर्वांना एकत्रित विचार करावा लागेल. आपण तिरंगा झेंडा लावतो तो कुठे लावयचा, कसा लावायचा हे लोकांना माहिती असले पाहिजे पण काही लोक ते विसरुन जातात. आज काही लोक महात्मा गांधी कोण आहेत असे विचारतात? म्हणून परत एकदा या देशाच्या आणि या महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधी एक मोहीम राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात घ्यावी लागणार आहे. राष्ट्रध्वजाचा इतिहास लहान मुलांना आणि युवकांना शिकवावा लागणार आहे. तो प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक कॉलेजमध्ये शिकवावा लागेल. यासाठी एक खास मोहिम घ्यावी लागेल. जोपर्यंत आपल्या देशाच्या राष्ट्रध्वजाच्या संदर्भात आपली इमोशनल ॲटॅचमेन्ट असणार नाही तोपर्यंत काही होणार नाही. या राज्यासाठी या देशासाठी जोपर्यंत काही बलिदान करणार नाही तोपर्यंत ते भावनात्मकदृष्टया इन्व्हॉल्व्ह होणार नाहीत. म्हणून इमोशनल इन्व्हॉल्व्हमेंट करण्याचे काम शासनाला करावे लागणार आहे. त्यामध्ये शासनाला पुढाकार घ्यावा लागेल. सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद.

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी एक गोष्ट माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. युवाच्या संदर्भातील आपला जी.आर. 20.2.2010 रोजी आला. त्यामध्ये एकाही विधान परिषद सदस्याचा समावेश नाही. आपण ते तपासून बघावे. सत्ताधारी पक्षाकडून श्री. चरणसिंग सप्रा आहेत आणि आमच्याकडून ॲड. अनिल परब यांची नावे आहेत. पण या युवा धोरणामध्ये एकही विधान परिषद सदस्य नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आपण या ठिकाणी ज्या समित्या केलेल्या आहेत त्याबद्दल काही आक्षेप असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ज्या भावना व्यक्त केल्या ती गोष्ट खरी आहे की, या सभागृहातील काही सदस्य सुध्दा त्यामध्ये असावेत. त्याचबरोबर आपण जो वयोगट या ठिकाणी दर्शविला आहे त्यामध्ये टिनेजर्सपासून आपण सुरुवात केली. 13 ते 19 वर्षे हा पहिला वयोगट आणि 20 पासून ते 35 वर्षे हा दुसरा वयोगट, या वयोगटातील संबंधित विद्यार्थी असतील, कॉलेजमधील तरुण असतील किंवा आणखी कोणी असतील त्याचे सदस्य कोठे तरी या समितीमध्ये असणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्यामध्ये लोकप्रतिनिधी आहेतच. आपण लोकप्रतिनिधींच्या सगळ्या समित्या केलेल्या आहेत. मी नियम 260 अन्वये हा प्रस्ताव मांडला तेव्हाच म्हटले होते की, ज्या वर्गासाठी किंवा समाजातील ज्या घटकासाठी आपण हे सगळे करीत आहोत त्याचे प्रतिनिधित्व त्या ठिकाणी असावे, त्यांना सुध्दा त्यामध्ये त्यांचे विचार कॉन्ट्रीब्युट करण्याची संधी द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये माझ्या भाषणात सांगितले की, ही समिती म्हणजे क्लोज डोअर समिती नाही. आज सुध्दा कोणालाही युवा धोरणामध्ये रस असेल क्रीडा धोरणामध्ये रस असेल आणि त्यांना कॉन्ट्रीब्युट करण्याची इच्छा असेल तर त्यांचे आम्ही स्वागत करु. त्यांना आम्ही निमंत्रण पाठवून त्यांचे स्वागत करु. आपल्याकडे काही नावे असतील, काही सजेशन असतील तर आपण नावे द्यावीत. आम्ही त्यांना या समितीच्या पुढच्या बैठकीमध्ये बोलवू आणि त्यांचे मत ऐकून घेऊ हे मी अगोदरच या सभागृहामध्ये सांगितले आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी या ठिकाणी जो प्रश्न प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी आवाहन केले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

की, ही जी समिती केलेली आहे त्यामध्ये ज्या आमदारांना काम करावयाचे असेल त्यांनी यावे. सन्माननीय सदस्यांचा जो मूलभूत प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये वयोगट 14 ते 19 आणि 20 ते 35 या वयोगटातील जो तरुणवर्ग आहे, मग ते कॉलेजमधले असतील, युनिव्हर्सिटीमधले असतील, त्यांचे निवडून आलेले जे यु.आर. असतील, त्यांना रिप्रेझेंट करणारे जे तरुण आहेत त्यांना आपण निमंत्रित करा आणि संपूर्ण कामामध्ये त्यांना सहभागी करुन ध्यावे असा उद्देश आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 45 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.28 ते 12.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ प्रथम श्री.बरवड 12:45

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नगर जिल्हयातील अकोले येथे संचारबंदी लागू झालेली आहे. शिवसेनेचे तालुका प्रमुख यांना काही कारण नसताना पोलीस अधिका-यांनी बदडले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून शिवसेनेचे तालुका प्रमुख श्री.धुमाळ यांनी अवैध धंद्यांविरुध्द मोहिम राबविली आहे. त्यामुळे अवैध धंदे बंद पडत असल्यामुळे तेथे पोलिसांमध्ये राग धुमसत होता. श्री.धुमाळ हे तहसीलदार कार्यालयात गेले होते. ते काम झाल्यानंतर एका युवकाचे पोलीस स्टेशनमध्ये पासपोर्टचे काम होते म्हणून तेथे गेले होते. परंतु अवैध धंदे बंद पाडल्याचा राग डोक्यात ठेवून तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी श्री.धुमाळ यांना एका खोलीत नेऊन इतके बदडले आहे की, त्यांच्या छातीची फासळी तुटलेली आहे. इतका अमानुष प्रकार घडल्यामुळे तेथील जनतेने व शिवसैनिकांनी पोलीस स्टेशनला घेराव घातल्यावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. परवानगी नसतानाही हवेत गोळीबार केला. एवढेच नाही तर श्री.धुमाळ यांची तक्रार सुध्दा नोंदवून घेतली नाही. त्यांची तक्रार नोंदविण्यास नकार देण्यात आला. अकोले या शहरामध्ये संचारबंदी लागू करण्यापर्यंत परिस्थिती गेलेली आहे. एका राजकीय कार्यकर्त्याला पोलिसांनी मारहाण केल्यामुळे जनता संतप्त झालेली आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. तेथील पोलीस अधिकारी हे दारु प्यायलेले होते त्यामुळे लोकांनी त्यांची तातडीने चाचणी करण्याचा आग्रह धरला होता. त्या पोलीस अधिका-यांविरुध्द तक्रार नोंदवून घ्यावी असा आग्रह धरला होता. परंतु त्यालाही नकार देण्यात आलेला आहे. अकोले शहरामध्ये संचारबंदी लागू केलेली असल्यामुळे ही गंभीर बाब असल्यामुळे या विषयावर आज चर्चा होणे आवश्यक आहे. ही गंभीर बाब आहे, हा विषय तातडीचा आहे, अधिवेशन चालू असताना कालच

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.दिवाकर रावते....

घडलेली आहे. लोकांमध्ये संताप निर्माण झाल्यामुळे संचारबंदी लागू करण्यापर्यंत वेळ गेली आहे. अवैध धंदे बंद करण्याची मोहिम राबवित असताना पोलीस अधिकारी राजकीय कार्यकर्त्यांना सतावित असतील तर ही अतिशय गंभीर बाब आहे. म्हणून आजचे कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल अधिवेशन सुरु असतानाच नगर जिल्हयातील अकोले तालुक्यामध्ये जी घटना घडली त्याची माहिती माझ्याकडे आली आहे. त्यासंबंधी मी अनेक कार्यकर्त्यांशी बोलले आहे, मी स्वतः पोलिसांशी बोलले आहे. त्यातून जे चित्र स्पष्ट होत आहे त्याचा जो पहिला भाग आहे त्यामध्ये तहसीलदार ऑफिसमध्ये श्री.धुमाळ हे त्यांच्या कामासाठी गेले होते. अकोले तालुक्याची काही सन्माननीय सदस्यांना कल्पना असेल. तेथे तहसीलदार कार्यालय व पोलीस स्टेशन शेजारीच आहेत. तहसीलदार कार्यालयात श्री.धुमाळ गेलेले असताना पोलीस स्टेशनमधून इन्स्पेक्टर आले. श्री.धुमाळ यांनी तहसीलदार कार्यालयात कोणत्याही प्रकारचा गोंधळ वा गडबड केलेली नसताना श्री.धुमाळ यांच्याबरोबर वादविवाद केला. पोलीस स्टेशनमध्ये वादविवादाची सुरुवात न होता तहसीलदार कार्यालयात त्याची सुरुवात झाली आहे. नगर जिल्हयात आपण सातत्याने पाहतो की, तेथे वेगवेगळया कारणांमुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असतात. दरोडयातील दरोडेखोर सापडत नाहीत. परंतु राजकीय कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्याचे प्रकार घडत आहेत. नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्याचे कारण महत्वाचे आहे. आमची सरकारकडून अपेक्षा आहे. या घटनेची सी.आय.डी.चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. कारण पोलीस अधिकारी श्री.तायडे हे दारुच्या नशेमध्ये होते. त्यामुळे त्यांची चाचणी संगमनेर येथे होणे आवश्यक होते. पण त्याठिकाणी अकोले येथे दबाव आणून पोलीस स्टेशनमध्ये चुकीचा रिपोर्ट दिला गेला.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

(डॉ. नीलम गो-हे.....

सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. बाळासाहेब थोरात हे त्या भागातील आहेत. सिव्हिल सर्जन, संगमनेर यांचा रिपोर्ट काय आहे हे तपासण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे श्री. पिसे नावाच्या शिवसैनिकाला आणि अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी केलेल्या मारहाणीमध्ये गंभीर जखमा झालेल्या आहेत. संध्याकाळपर्यन्त संचारबंदी होती आणि पोलिसांना हवेमध्ये गोळीबार करावा लागला इतका जनतेचा उद्रेक झालेला आहे. हे अधिवेशन दोन दिवसात संपणार आहे आणि अकोला शहरामध्ये अशी गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे त्यासंदर्भात सदनामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या परिस्थितीला जे पोलीस अधिकारी जबाबदार आहेत, जे अरेरावी करणारे अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. एका गोष्टी बाबत माझ्यापुढे प्रश्न चिन्ह निर्माण झालेले आहे. त्या गोष्टीला चांगले म्हणावे की वाईट म्हणावे हे कळत नाही. सांगलीचे पोलीस अधीक्षक श्री. कृष्ण प्रकाश यांचा पदस्पर्श नगर जिल्ह्याला झाल्याबरोबर त्यांनी सांगलीचा खाक्या दाखवायला सुरुवात केलेली आहे. दोन मंत्र्यांमधील भांडण,हिंदुत्ववादी आणि गणेशोत्सवाच्या प्रश्नावर त्यांचा तर्कदुष्टपणा येथेही दिसून येत आहे. आम्हाला असे वाटत होते की, नगरमध्ये कृष्ण प्रकाश गेल्यावर ते काय प्रताप दाखवतात, पण त्याचाच प्रत्यय त्यांनी नगरमध्ये दिलेला आहे. सांगलीच्या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा होणार आहे. अशा वेळी आमची मागणी आहे की, अकोले येथील घटनेच्या संदर्भात चर्चा होऊन वस्तुस्थिती समोर यावी आणि मुजोर अधिका-यांवर बंधन घालावे अशी आमची मागणी आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नगर जिल्ह्यातील अकोले येथील घडलेल्या घटनेच्या संदर्भात नियम 289चा प्रस्ताव दिलेला आहे. खरे म्हणजे शिवसेनेचे तालुका प्रमुख श्री. मच्छिंद्र धुमाळ हे एका कार्यकर्त्याच्या कामासाठी तेथील पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. ते गेल्यानंतर तेथील इन्स्पेक्टर श्री.तायडे यांनी त्यांना नुसती शिवीगाळ केली नाही तर त्यांना जबर मारहाण केली. त्यांचा कुठल्याही प्रकारचा गुन्हा नसताना, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे आरोप नसताना केवळ ते कार्यकर्त्याचे काम करण्यासाठी, चौकशी करण्यासाठी गेले होते. त्यांना मारहाण केल्यानंतर त्याठिकाणी मोर्चा गेला. त्या मोर्चावर देखील लाठीहल्ला करुन कार्यकर्त्यांना गंभीर जखमी केले. सामान्य माणूस हा पोलीस स्टेशनला जायला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...

घाबरतो. परंतु त्याचा प्रतिनिधी म्हणून राजकीय पक्षाचे कोणी कार्यकर्ते असतात, लोकप्रतिनिधी असतात आणि अशा लोकांना जर बेदमपणे मारहाण होत असेल तर समाजसेवक आणि पोलीस स्टेशन यांच्यामध्ये जो काही दुवा आहे तो दुवा राहाणार नाही. या विषयाची शासनाने गंभीरपणे दखल घेतली नाही तर अशा प्रकारच्या घटना पोलीस स्टेशनमध्ये घडत राहतील. अशा प्रकारचे अनेक तायडे निरनिराळया पोलीस स्टेशनमध्ये बसलेले आहेत. त्यांच्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. त्यांनी घटनेची तक्रार देखील नोंदवून घेतलेली नाही. ही गंभीर घटना आहे. म्हणून या घटनेची चर्चा झाली पाहिजे. तसेच घटनेची सी.आय.डी.चौकशी झाली पाहिजे अशी मी मागणी करतो.

**उपसभापती** : मी या विषयावर शासनाला निवेदन करायला सांगतो.

श्री. दिवाकर रावते : तेथे संचारबंदी चालू आहे. कृष्ण प्रकाश हा लोकांना घरात घुसून मारत आहे. हे चालू प्रकरण असून फार गंभीर आहे. त्यामुळे सभागृहात चर्चा व्हायला पाहिजे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : नियम 289 अन्वये ही चर्चा आता घेता येणार नाही. मी या संदर्भात शासनाला सोमवारी निवेदन करण्यास सांगतो...

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.54 ते 1.05 पर्यन्त स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आताच मिळालेल्या माहितीनुसार अकोले पोलीस स्टेशनच्या आवारात एक डेड बॉडी सापडली आहे. माननीय गृहमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. या घटनेच्या संदर्भातील माहिती सभागृहाला कळली पाहिजे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पोलीस घराघरात घुसून लोकांना मारहाण करीत आहेत. त्या परिसरात जातीय दंगा घडलेला नाही, काही विपरित घडलेले नाही. लोकांनी निदर्शने करायची नाहीत का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील सविस्तर निवेदन सोमवारी सभागृहासमोर केले जाईल. आतापर्यंत जी माहिती प्राप्त झाली ती सदनासमोर ठेवू इच्छितो. काल अकोले येथील पोलिसांनी एका ठिकाणी जुगार चालू आहे म्हणून धाड टाकली आणि काही लोकांना ताब्यात घेतले. त्याठिकाणी काही लोकांचा जमाव आला आणि ज्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते त्यांना का पकडले? त्यांना सोडून द्या अशी मागणी केली. पोलिसांच्या परवानगीशिवाय सर्व आरोपींना पोलीस स्टेशनमधून बाहेर काढून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आणि त्या आरोपींना घेऊनही गेले. जाताना संपूर्ण पोलीस स्टेशनची मोडतोड केली. पोलिसांची गाडी जाळली आहे. पोलीस स्टेशनवर, तहसील कार्यालयावर दगडफेक करण्यात आली. पाच पोलीस जखमी झाल्याची माहिती मला देण्यात आली आहे. पोलिसांनी फायरिंग केले, त्या भागात 144 कलम घोषित केले आहे. ही घटना काल घडली. 150 मीटर अंतरावर एक डेड बॉडी सापडली आहे. परंतु तो मृत्यू कशामुळे झाला याचा तपास सुरु आहे. या प्रकरणात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेली मागणी मी ऐकली आहे. कोणी चुकले असेल तर कोणालाही पाठीशी घालण्याची शासनाची भूमिका असणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलीस तक्रार नोंदवून घ्यायला तयार नाहीत. शिवसेना पक्षाचे शाखा प्रमुख श्री.धुमाळ यांना पोलिसांनी मारहाण केल्यामुळे त्यांच्या फासळीला इजा पोहोचली आहे. त्यांना सिव्हील हॉस्पिटलमधून पोलिसांनी दबावाने बाहेर काढले आणि उपचारासाठी नाशिकला पाठविले. पोलीस तक्रार नोंदवून घ्यायला तयार नाहीत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काय अपेक्षित होते आणि काय तक्रार होती याची मी आज सकाळी माहिती घेतली. जो इन्स्पेक्टर दारु प्यायला होता अशा प्रकारची तक्रार होती त्या इन्स्पेक्टरची ब्लड टेस्ट केली असून त्यासंदर्भात अहवाल निगेटिव्ह आलेला आहे. या संपूर्ण घटनेची आय.जी.स्तरावरील अधिकाऱ्याकडून सात दिवसाच्या आत चौकशी करण्यात येईल. दोष पोलिसांचा असेल तर पोलिसांवर कारवाई केली जाईल आणि गुन्हा यांनी केला असेल तर यांच्यावर कारवाई केली जाईल. नियमाप्रमाणे प्रकरण हाताळले जाईल. कोणाला पाठीशी घालण्याची भूमिका घेतली जाणार नाही. नि:पक्षपातीपणे चौकशी केली जाईल. या प्रकरणासंबंधीचे निवेदन सोमवारी केले जाईल. या प्रकरणाची चौकशी एका आठवड्यात आत केली जाईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सन 2008-2009 चे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.रमेश शेंडगे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

डॉ.नीलम गोऱ्हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा पहिला व दुसरा अहवाल (2010-2011) सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, अहवाल सभागृहाला सादर करीत असताना विशेष म्हणजे महिला बचत गटांच्या संदर्भात समितीने वेगवेगळया प्रकरणी राज्यामध्ये पाहणी केली आणि ही पाहणी करीत असताना महिला आर्थिक विकास महामंडळ तसेच ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग यांच्याकडून तपशीलवार पध्दतीने माहिती जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेतली आणि त्याबद्दलच्या शिफारशींचा या अहवालात अंतर्भाव केला आहे.

**उपसभापती** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा पहिला व दुसरा अहवाल (2010-2011) सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

नंतर 2बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, काल पुण्यामध्ये बोपोडी येथील डॉ. झाकीर हुसेन या उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आलेली खिचडी खाल्ल्याने 70 विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडलेली असल्यामुळे पालकांमध्ये तीव्र संताप निर्माण झालेला आहे. या ठिकाणच्या सर्व विद्यार्थ्यांना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून काही विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे. खिचडीची पाहणी केली असता त्या खिचडीमध्ये अळया, कोर किडे तसेच लोहचुंबकाचे तुकडे सापडले तसेच स्वयंपाक बनविण्याची भांडी अस्वच्छ असल्याचे आढळून आले. खिचडी खाऊन विषबाघा झाल्याचे प्रकार राज्यामध्ये अनेक ठिकाणी घडले आहे व घडतच आहेत. खिचडीपासून विद्यार्थ्यांना होणारी विषबाधा रोखण्यासाठी व या घटनेत जबाबदार असणा-यांवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता आहे. राज्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा हा विषय असल्याने खिचडीचा दर्जा कसा सुधारता येईल तसेच खिचडीच्या पर्यायी खाद्य काय देता येईल का याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित असल्याने त्यांनी या महत्वाच्या विषयात लक्ष घालावे अशी विनंती करतो.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शासनाने नोंद घेतली असून सन्माननीय सदस्यांची सूचना तपासून घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मला शासनाच्या असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, डोंबिवली भागातला तसेच त्या परिसरातील विषय मांडण्याची आपण मला परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. डोंबिवलीमध्ये गेल्या वर्ष भरापासून पाच अपहरणाच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणचे वातावरण भीतीचे आहे. यासंदर्भात कालपासून डोंबिवली शहरात धरणे आंदोलन सुरु आहे. डोंबिवली व डोंबिवली परिसरात रोज 4 ते 5 चो-या होतात. दरोडे, शाळेच्या आजूबाजूला अवैध धंदे सुरु आहेत. या ठिकाणच्या पोलीस कमिशनरेटने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक महिन्याचा अवधी मागितला होता. परंतु या ठिकाणच्या गुन्हयांचे प्रमाण कमी न होता ते वाढलेले आहे. गुन्हे अन्वेषण विभागातील चार लोकांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगे हाथ पकडलेले आहे. गुन्हे अन्वेषण विभागातील जाधव, गोरे, येवले,घाग अशा पाच कर्मचा-यांना रेड टाकून रंगेहाथ पकडले आहे.हे कर्मचारी लाच घेतांना निलंबित झालेले आहेत. डोंबिवलीमध्ये गुन्हे वाढत असल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झ ालेले आहे. त्यामुळे डोंबिवली येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडालेला असल्यामुळे डोंबिवलीतील जनता अस्वस्थ आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.
धन्यवाद.

----

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मी या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने असे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, शासकीय नियमा प्रमाणे महाराष्ट्र वक्फ् बोर्डामध्ये विधान परिषदेतील अल्पसंख्याक मुस्लीम सदस्यांमधून एक सदस्य अल्पसंख्याक बोर्डात पाठविणे जरुरी आहे. मागील दोन वर्षापासून डॉ. एम.ए.अजिझ यांचे विधानपरिषद सदस्यत्व गेल्यापासून हे पद रिक्त आहे. वक्फ बोर्डामध्ये अगोदर नियुक्ती केली जात होती परंतु मागील दोन वर्षाच्या नियमाप्रमाणे विधानसभा आणि विधान परिषदेमधून वक्फ बोर्डामध्ये एक सदस्य पाठविणे जरुरी आहे. वक्फ बोर्डामध्ये सदस्य नसल्यामुळे आता वक्फ बोर्डामध्ये कोणतेही काम होत नाही त्यामुळे मुस्लीम समाजाची अनेक कामे रखडलेली आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, या अधिवेशनामध्ये वक्फ बोर्डात एका सदस्यांची निवड करुन एक सदस्य विधान परिषदेतून पाठविण्यात यावा ही विनंती.

------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाच्या ही बाब निदर्शनास आणून देणार आहे की, क्लोरीन युक्त सिलेंडर सापडणे तसेच वायू गळतीच्या संदर्भात या सभागृहात दोन वेळा नियम 93 वर चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

वरळी येथे क्लोरीन वायूचे सिलेंडर सापडले. पण ते रिकामे होते. आज परत NDF च्या जवानांना हाजी बंदर येथे 80 क्लोरीन वायूने भरलेले सिलेंडर सापडले आहेत. सुरूवातीला बीपीटीच्या परिसरामध्ये 38, 42 आणि आता 80 क्लोरीन वायूने भरलेले सिलेंडर सापडले आहेत. वरळी कोळीवाडा येथे 4-5 सिलेंडर सापडले आहेत. यातील जवळ जवळ 100 सिलेंडर निकामी करणे बाकी आहे. यासाठी आम्हाला आपले संरक्षण अत्यावश्यक आहे. मी स्वत: वरळी परिसरामध्ये राहते. वरळी कोळीवाडा परिसरामध्ये लाखो लोक राहतात. दोन दिवसामध्ये अधिवेशन संपणार आहे. तेव्हा यासंबंधी आपण शासनाला योग्य ते निदेश द्यावेत अशी माझी कळकळीची विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. गंभीर परिस्थितीमुळे आजूबाजूच्या लोकांना भीती वाटत आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने निवदेन करावे अशी मी विनंती करीत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सुरूवातीचे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन आपण राखून ठेवले होते. काल पुन्हा याच विषयावर निवेदन झाले. आता 105 सिलेंडर सापडले आहेत. त्यामुळे शासनाचा अहवाल बरोबर नाही. शासन या विषयावर गंभीर नाही असे दिसते. क्लोरीन वायूने भरलेले 105 सिलेंडर्स सापडले आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका आहे. तेव्हा शासनाने चुकीचे उत्तर देऊन सभागृहाला गप्प करण्याचे काम करू नये. शासनाने वस्तुस्थितीवर आधारित उत्तर द्यावे अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

**उप सभापती** : यासंबंधी शासनाने निवेदन करावे.

.........

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस,श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी "चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात कोळशाच्या हेराफेरीचे प्रकरण 21 जुलै 2010 रोजी उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जगबुडी व नारंगी खाडीकिनारी संरक्षक भिंत बांधण्याबाबत तेथील नागरिकांनी शासनाकडे केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील वागदे या गावात मंजूर करण्यात आलेल्या साकवमध्ये होत असलेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर,रामनाथ मोते यांनी "डोंबिवली,कल्याण,अंबरनाथ,बदलापूर,वांगणी,परिसरासाठी पर्यायी वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने महावितरण कंपनीनी डोंबिवली,मानगाव भागात उभारलेल्या पर्यायी वीज प्रकल्पाच्या जागेवर झोपडपट्टीवासियांनी अतिक्रमण करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 23.7.2010 रोजी वा त्या सुमारास जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील नांदेड येथील कोळी समाजाच्या एका महिलेची गावातील काही व्यक्तींनी धिंड काढल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "मौजे जानोरी ता.इगतपुरी येथील श्रीराम स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांना श्री.राजाराम भोर,श्री..अरूण भोर,श्री.जनार्दन गोधडे,श्री.संपत येंदे यांनी दमदाटी करून बचत गटाचा ताबा घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "कोकण किनारपट्टीमध्ये दि.22 व 23 जुलै 2010 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक ठिकाणी दरडी कोसळल्याने जनजीवन विस्कळीत होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "मुंबईतील डी.एन.नगर, पंतनगर, टिळक नगर इत्यादी ठिकाणी म्हाडाच्या असलेल्या 104 वसाहतींमधील इमारतींच्या पुनर्विकासाच्या कामाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर,चंद्रकांत पाटील यांनी "वरळी,मुंबई येथील डॉ.ई.मोझेस रोड येथील भूखंड क्र.17/47 (भाग) लोअर परेल डिव्हीजन जी साऊथ वॉर्ड हा महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रियेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर अनधिकृतपणे 3500 झोपड्यांचे बेकायदेशीररित्या बांधकाम झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

......

यानंतर श्री.अजित...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांबाबत

**मु. शी**. : अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांबाबत सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात ( शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर शुक्रवारी सभागृहात चर्चा झाली. यापूर्वी देखील हा विषय सभागृहात वारंवार चर्चेला आलेला आहे. उच्च माध्यमिक पायाभूत सुविधांचा हा विषय आहे. मागील चार वर्षे हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे. निवेदनात नमूद केले आहे की, या संदर्भातील सर्व प्रक्रिया पूर्ण करुन उच्च स्तर समितीसमोर या संदर्भातील प्रस्ताव दिनांक 6 जुलै 2010 रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता." असे असताना अद्यापपर्यंत आदेश का काढण्यात आले नाही ? निवेदनात नमूद केलेले आहे की, सदरहू बैठकीचे इतिवृत्त अद्याप प्राप्त झालेले नाही. दिनांक 6 जुलै, 2010 रोजी बैठक झाली. मंत्रालयातच हा विभाग आहे. आज 24 तारीख आहे म्हणजे 18 दिवस झालेले आहेत. एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे इतिवृत्त येऊ नये याचे आश्चर्य वाटते. तेव्हा माझा पहिला प्रश्न आहे की, वाढीव पदांच्या प्रस्तावाबाबतचे इतिवृत्त ताबडतोब प्राप्त करुन या संदर्भातील आदेश आठ दिवसांत निर्गमित करणार काय ? दुसरा प्रश्न म्हणजे गणित आणि संख्या शास्त्र विषयासंदर्भात 758 पदे निर्माण झाल्याचे नमूद केलेले आहे. परंतु मला दिलेल्या माहितीच्या अधिकारामध्ये ही पदे 1337 असल्याचे सांगितलेले आहे. तेव्हा गणित आणि संख्या शास्त्र या विषयाची दोन वर्षाची पदे 758 आहेत की 1337 आहेत याबाबत मंत्रिमहोदय खुलासा करतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांच्या प्रस्तावास उच्च स्तरीय सचिवांची मान्यता मिळाल्यानंतर त्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाही केली जाणार आहे. आपणास एकूण 746 पदांची मान्यता मिळणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गणित आणि संख्या शास्त्र विषयांच्या शिक्षकांची एकूण 1337 पदे निर्माण झाली असल्याची माहिती त्यांना माहितीच्या अधिकारामध्ये प्राप्त झालेली आहे. याठिकाणी उत्तरामध्ये 746 पदे असा उल्लेख केलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, संयुक्त समितीपुढे हा प्रस्ताव गेला होता त्यावेळी समितीने काही त्रुटी काढल्या. त्या त्रुटींची पूर्तता केलेली आहे. जो आकड्यातील फरक आहे तो निश्चितपणे तपासून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या सभागृहाच्या कामकाजाचे विभागाकडून डेटीऑरिएशन सुरु आहे. त्याबद्दल मी मनापासून तीव्र दु:ख व्यक्त करतो. सभागृहात कॅबिनेट मंत्री सांगतात की, तीन वर्षापासून हे प्रकरण प्रलंबित असून उच्चस्तर सचिव समितीसमोर पुढील ॲकॅडमिक सेशनपूर्वी याचा निर्णय करु. मी याठिकाणी विचारु इच्छितो की, कॅबिनेट मंत्र्यांपेक्षा सचिव मोठे आहेत काय ? दिनांक 6 जुलै रोजी बैठक झाली परंतु त्याचे इतिवृत्त अजून मिळालेले नाही. हा लाजिरवाणा प्रकार वाटतो. अधिवेशन सुरु असताना अधिकाऱ्यांना काहीच धाक वाटत नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात असे सांगितले होते, पुढील ॲकेडमिक सेशन सुरु होण्यापूर्वी प्रशासकीय मान्यता देण्याचे आदेश निर्गमित करु. दिनांक 6 रोजी सचिवांची बैठक झ ाली आणि त्या बैठकीचे इतिवृत्त माननीय मंत्रिमहोदयांकडे आलेले नाही. हे म्हणजे शिपाई आला नाही म्हणून मंत्री सभागृहात आले नाही असे एके दिवशी ऐकले म्हणजे आम्ही धन्य झालो. ही गोष्ट अत्यंत अशोभनीय आहे. मागील तीन वर्षे हे प्रस्ताव पडून आहेत. याबाबत ठामपणाने कार्यवाही करणार आहात की नाही ? सचिवांसाठी मंत्रिमहोदयांनी थांबायचे आणि मंत्रिमहोदयांनी सभागृहाला थांबवायचे हे शोभनीय आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सदरहू इतिवृत्त मान्य करुन ताबडतोब कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सोमवारी आदेश काढण्याच्या सूचना देण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अधिकाऱ्यांना कामासाठी एक दिवस दिला पाहिजे. अधिकाऱ्यांना मंगळवारपर्यंत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकणातील आंबा, काजू,जांभूळ,करवंदे व कोकम या फळांवर प्रक्रिया करुन त्यापासून विविध उत्पादने तयार करणे

**मु. शी.** : कोकणातील आंबा, काजू,जांभूळ,करवंदे व कोकम या फळांवर प्रक्रिया करुन त्यापासून विविध उत्पादने तयार करणे यासंबंधी सर्वश्री राजन तेली, भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" दापोली (जि.रत्नागिरी) येथे दिनांक 30,31मे व 1 जून, 2010 रोजी वा त्या दरम्यान कृषी विद्यापीठांच्या झालेल्या बैठकीत आंबा, काजू, जांभूळ, करवंदे, व कोकम या कोकणातील फळांवर प्रक्रिया करुन त्यापासून विविध उत्पादने तयार करण्यासंदर्भात शासनाकडे शिफारशी करण्यात येणे, हा प्रकल्प राबविण्यात आल्यास या परिसरातील स्थानिकांना वाढणाऱ्या रोजगाराच्या संधी शासनाच्या महसुलातही होणारी वाढ, शासनाने हा प्रकल्प राबविण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

श्री. प्रकाश सोळंके ( पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणातील आर्थिक व्यवस्था पूर्णपणे बदलणारी ही लक्षवेधी सूचना आहे. कोकणातील नैसर्गिक साधन संपत्ती व फळबाग लागवड आणि त्या अनुषंगाने प्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यासाठी ही खूपच अनुकूल अशी लक्षवेधी सूचना आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 13.25

श्री.राजन तेली ..

विकसित राष्ट्रामध्ये एकूण फळाच्या उत्पादनापैकी 60 ते 75 टक्के उत्पादन प्रक्रियेसाठी वापरले जाते.अमेरिकेमध्ये 65 टक्के, फ्रान्स आणि ब्राझिलमध्ये 70 टक्के, मलेशियामध्ये 83 टक्के,फिलिपाईल्समध्ये 78 टक्के फळे प्रक्रियेसाठी वापरली जातात. आपला देश फळाच्या उत्पादनाच्या बाबतीत जगात दोन नंबरवर असतांनासुध्दा 2.20 टक्के फळे प्रक्रियेसाठी वापरली जातात. कोकणामध्ये आंबा, काजू, फणस, जांभूळ, कोकम आणि करवंदे या सर्व फळांवर प्रक्रिया करण्यासाठी शासनाने जर चांगल्या प्रकारचे धोरण राबविण्याचे ठरविले तर मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण् होऊ शकेल. कोकण कृषी विद्यापीठाने यासंबंधी अभ्यास करुन अहवाल देखील सादर केला आहे.या फळापासून वाईन तयार करता येऊ शकेल तसेच वेगवेगळी बाय प्रॉडक्टस तयार करता येऊ शकतील. कोकणात उत्पादन होणा-या फळापैकी 20 टक्के फळांवर जरी प्रक्रिया केली तरी 800 ते 900 कोटी रुपये त्या भागातील सर्वसामान्य शेतक-यांच्या घरात जातील. या रॉ मटेरिअलसाठी पैसे द्यावे लागणार नाहीत.धान्याच्या पासून वाईन तयार करण्याच्या योजनेसंबंधी या ठिकाणी बरीच चर्चा झाली होती. करवंदे आणि आंबे यासारखी जी` फुकट जाणारी फळे आहेत त्यासाठी पैसे द्यावे लागणार नाहीत. कोकणामध्ये आतापर्यंत 2 लाख 94 हजार 961 हेक्टर्स जमिनीवर फळ बागायती करण्यात आल्या आहेत तेव्हा कोकणात निर्माण होणा-या फळावर प्रक्रिया करण्यासंबंधी शासन धोरण आखणार आहे काय ? त्याचबरोबर कृषी औद्योगिक धोरण 2010 संबंधी प्रारुप आरांखडा तयार करण्यात आला आहे त्या आराखडयाला अंतिम स्वरुप केव्हा देण्यात येणार आहे ? त्यामध्ये कोण कोणत्या बाबींचा अंतर्भाव करण्यात येणार आहे ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, फलोत्पादन अभियानामध्ये जांभूळ, करवंदे कोकम,फणस इत्यादी फळांचा समावेश करण्यात आलेला नाही तेव्हा या अभियानामध्ये या फळांचा समावेश करण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येणार आहे ? त्याचबरोबर हा प्रश्न फक्त पणन विभागाशी निगडीत नाही या प्रश्नाशी कृषी, उद्योग,पणन आणि एक्साईज अशा विभागाचा सबंध येतो. द्राक्षापासून तयार करण्यात आलेल्या वाईनवर एक्साईज माफ करण्यात आले आहे आमच्या भागातील श्री भीमा दत्तात्रय धुरी या उद्योजकाने जांभळापासून वाईन तयार केली होती परंतु त्यावर एक्साईज आकारण्यात येत असल्यामुळे ही वाईन मार्केटमध्ये येऊ शकत नाही तेव्हा या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली ..

संदर्भात एक्साईज, उद्योग,कृषी आणि पणन विभागानी एकत्रित बसून धोरण तयार केले पाहिजे तेव्हा अशा प्रकारे हे सर्व विभाग एकत्रित बसून धोरण तयार करणार आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी कोकणातील फळाच्या संदर्भात अतिशय महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली आहे. या निमित्ताने त्यांनी दोन तीन प्रश्न उपस्थित केले असून त्यासबंधी मी खुलासा करु इच्छितो की, आपणा सर्वाना हे माहीत आहे की, महाराष्ट्र कृषी औद्योगिक धोरणाचे प्रारुप नेटवर उपलब्ध असून त्यासंबंधी सजेशन्स आणि ऑब्जेक्शन्स मागविण्यात आली असून त्याची मुदत 26 जुलै पर्यत आहे. शासनाकडे सजेशन्स आणि ऑब्जे्क्शन आल्यानंतर त्यासबंधी लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्राचे कृषी औद्योगिक धोरण जाहीर करण्यात येईल. सन्माननीय सदस्यानी दुसरा प्रश्न असा उपस्थित केला आहे की एनएचबीमध्ये जांभूळ,कोकम,फणस इत्यादीचा समावेश करण्यात आलेला नाही त्यामुळे या फळांचा समावेश त्यामध्ये करण्यात येणार आहे काय ? या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,या फळांचा एनएचबीमध्ये समावेश करण्यासाठी राज्य सरकार केन्द्र सरकारला निश्चितपणे शिफारस करणार आहे. त्याचबरोबर हा विषय स्टेट एक्साईज, उद्योग ,केन्द्र सरकारच्या विविध यंत्रणांशी संबंधित आहे त्यामुळे या सर्वाबरोबर एखादी बैठक घेऊन कोकणातील फळ प्रक्रियेसंबंधी शासनाच्या वतीने निश्चित प्रयत्न केले जातील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे मागच्या वेळी ही लक्षवेधी सूचना घेण्यात आली नव्हती. आता जरी ही लक्षवेधी सूचना घेण्यात आली असली तरी उत्तरे देण्यासाठी माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी सागितल्याप्रमाणे या विषयाचा संबंध एकाच विभागाशी नसून तीन विभागाचा सबंध येत आहे. त्या सर्व विभागाच्या वतीने जर माननीय राज्यमंत्री उत्तर देणार असतील तर त्या उत्तराचे आम्ही स्वागतच करु...............

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप..

या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "राज्य फलोत्पादन अभियान ही योजना सन 2005 पासून राबविण्यात येत असून जांभूळ, करवंद व कोकम या पिकांवरील प्रक्रिया व प्रकल्प या योजनेत समाविष्ट नाहीत. एप्रिल 2010 पासून सर्वसाधारण क्षेत्रासाठी भांडवली खर्चाच्या 40 टक्के जास्तीत जास्त रु.9.60 लाख तर डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी भांडवली खर्चाच्या 55 टक्के जास्तीत जास्त रु.13.20 लाख अनुदान बँक कर्जाशी निगडीत प्रकल्पांना देण्यात येते" हे आपले धोरण आहे. या धोरणानुसार कोकणातील किती लोकांना फायदा देण्यात आला? दुसरा प्रश्न असा की, सर्वसाधारणपणे एकूण फळ उत्पादनापैकी कमीत कमी 20 टक्के फळांवर प्रक्रिया केली पाहिजे ही आपली बॉटम लाईन आहे. कोकणामध्ये अशाप्रकारे 20 टक्के फळांवर प्रक्रिया होते काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सद्या कोकणामध्ये 20 टक्के फळांवर प्रक्रिया होत नाही. दुसरा प्रश्न असा की, माननीय सदस्यांनी नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनबाबत माहिती विचारली ती माहिती सद्या उपलब्ध नाही. प्रत्यक्षात किती लोकांना फायदा मिळाला याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना म्हटले की, कोकणामध्ये 20 टक्केसुध्दा फळ प्रक्रिया होत नाही. राज्यामध्ये द्राक्ष पिकावर आधारीत वायनरी निर्माण करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे ऊसाच्या मळीपासून मद्यार्क तयार करावयाच्या प्रस्तावांना अगदी सहजपणे परवानगी दिली जाते. परंतु आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत की, कोकणामध्ये बोंडूवर प्रक्रिया करणारी कारखानदारी सहकारी तत्वावर सुरु करण्यासाठी आपण परवानगी द्यावी. आज कोकणामध्ये 6 लाख टन बोंडूचे पोटेंशिअल उपलब्ध असतांना हे बोंडू गोव्यामध्ये पाठविले जात आहेत. त्याचप्रमाणे या बोंडूचे बी काढल्यानंतर ते फेकून दिले जात आहेत. अशाप्रकारची कारखानदारी उभी करण्यासाठी 1:9 भांडवल देऊ असे सांगण्यात आले होते. आज सावंतवाडी येथील आरोंदा येथे फळ प्रक्रिया प्रकल्प आहे, व दुसरा प्रकल्प दोडामार्ग येथे आहे. तुमच्या धोरणाप्रमाणे 1:9 भांडवल द्यावे म्हणून कित्येक वर्षापासून ते मागणी करीत आहेत, संघर्ष करीत आहेत. परंतु तुमच्याकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर एनसीडीसी पैसे देत नाही. तेव्हा या फळ प्रक्रिया उद्योगांसाठी राज्य सरकारचे धोरण काय आहे ते आपण समजावून सांगणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत शासनाचे धोरण अतिशय स्पष्ट आहे. 5 कोटी रुपयापर्यंतच्या प्रकल्पास पणन विभागामार्फत 1:9 भांडवल दिले जाते आणि 60 टक्के कर्ज दिले जाते...

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : आतापर्यंत आपण किती प्रस्ताव मान्य केले ते सांगा?

श्री. प्रकाश सोळंके : तसा प्रस्ताव आल्यास मान्यता देण्यात येईल. आपण प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचे उदाहरण दिल्यास त्याबाबत तातडीने कारवाई करण्यात येईल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : दोडामार्ग,आरोंदा येथील प्रस्ताव प्रलंबित आहेत...

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या योजनेंतर्गत कोकणातून जेवढया प्रकल्पांचे प्रस्ताव येतील त्यांना तातडीने मान्यता देण्याची कार्यवाही माझ्या विभागामार्फत केली जाईल.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनामध्ये करवंदापासून वाईन तयार करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला देण्यात आलेले उत्तर आणि आता या ठिकाणी देण्यात आलेले उत्तर सारखेच आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला की, या ठिकाणी जे प्रकल्प करावयाचे आहेत ते प्रकल्प येण्यासाठी वाट बघावी नाही तर या विभागाच्या अधिकाऱ्यांनी तेथील जनतेचे प्रबोधन केले पाहिजे. ते प्रबोधन किती केले? किती ठिकाणचा आढावा घेतला याची माहिती देण्यात यावी. तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि ठाणे या चार जिल्हयामध्ये 833 रोजगार निर्मिती दिलेली आहे. आणि हे प्रकल्प सुरु आहेत असे सांगितलेले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, कुठल्या जिल्हयामध्ये कुठले प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांमध्ये किती प्रक्रिया होते, तसेच त्या ठिकाणी किती रोजगार निर्मिती झालेली आहे? याची माहिती शासनाने द्यावी. सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये मी सहकारामध्ये चांगल्या प्रकारचे काम करतो. इंडस्ट्रिजमध्ये देखील काम करतो पण मला हे प्रकल्प कुठे दिसले नाहीत.म्हणून निवेदनात देण्यात आलेल्या आकडेवारीचे स्पष्टीकरण देण्यात यावे. ही आकडेवारी फक्त कागदावर न रहाता प्रत्यक्ष त्या ठिकाणी तशी अंमलबजावणी झाली पाहिजे. यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जी आकडेवारी देण्यात आलेली आहे ती उद्योग विभागामार्फत देण्यात आलेली आहे. ती सहकार क्षेत्राची माहिती नाही. उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणारी इन्सेन्टिव्हची योजना थोडी वेगळी आहे. ती सर्व महाराष्ट्रासाठी एकच योजना असून ती व्हॅटवर आधारित आहे. पहिल्या सात वर्षात जेवढा व्हॅट गोळा केला जातो तो त्या युनिटला परत दिला जातो. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये देण्यात आलेली आकडेवारी आहे ती उद्योग विभागामार्फत खाजगी क्षेत्रातील आकडेवारी देण्यात आलेली आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयामध्ये आंबा पिकावर प्रक्रिया करणारे 45 कारखाने आहेत तर काजू पिकावर प्रक्रिया करणारे 60 कारखाने आहेत. आंब्याच्या कारखानदारीमध्ये साधारणपणे 208 लाख रुपये गुंतवणूक आहे आणि काजूच्या कारखानदारीमध्ये 141 लाख आहे. ही खाजगी क्षेत्रासंबंधीची माहिती आहे. उद्योग विभागामार्फत सहकारी क्षेत्राला कुठलेही अनुदान दिले जात नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पणन विभागामार्फत आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. सन्माननीय मंत्रिमहोदय, उद्योग विभागाची माहिती देणार असतील तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी हे आधीच सांगावयास पाहिजे होते. आता लक्षेवधी सूचना पुढे गेलेली आहे

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गेले सात-आठ दिवस पेन्डिग आहे. या लक्षवेधी सूचनेला उद्योग विभागाने उत्तर द्यावे की, पणन विभागाने उत्तर द्यावे याबाबत या विभागांमध्येच समन्वय नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना सात दिवस राखून ठेवण्यात आली होती.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, जी माहिती दिलेली आहे ती सगळया विभागाकडून माहिती गोळा करुन दिलेली आहे. एकटया पणन विभागाचा हा प्रश्न नाही. पणन विभागाच्या संदर्भात जे प्रश्न विचारण्यात येतील त्याचे उत्तर देण्यास मी तयार आहे. सन्माननीय सदस्यंनी विचारलेला कुठलाही प्रश्न अनुत्तरीत राहाणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास मी तयार आहे.

यानंतर श्री. बदवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय व्यवस्थित उत्तर देत आहेत ते सन्माननीय सदस्यांनी शांतपणे ऐकावे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांकडून आतापर्यंत आलेले उत्तर आणि कोकणामध्ये आतापर्यंत प्रकल्प उभे राहू न शकणे याची जी कारणे आहेत त्यामध्ये प्रस्ताव या अधिकाऱ्याकडून त्या अधिकाऱ्याकडे पाठविणे असा प्रकार असल्यामुळे हे उद्योगधंदे उभे राहू शकले नाहीत. या सर्व योजना एका खिडकीखाली आणणार काय ? त्याच्या परवानग्या एका खिडकीखाली देणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, पणन खात्याच्या माध्यमातून कोकण विभागाच्या विकासासाठी आंबा किंवा इतर फळे असतील त्यादृष्टीने आवश्यक पणन विषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 575 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला शासनाने मान्यता दिलेली आहे आणि त्याचा सविस्तर जी. आर. उपलब्ध आहे. कोकणातील लोकांकडून त्या ठिकाणी प्रस्ताव येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोकणासाठी 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले पण त्यापैकी 100 कोटी रुपये सुध्दा आले नाहीत.

श्री. प्रकाश सोळंके : आपण पॅकेजच समजून घेतले नाही त्याबाबत काय करणार ? पॅकेज समजून घेऊन त्यांचे प्रस्ताव शासनाकडे आले नसतील तर शासनाने काय करावे अशी अपेक्षा आहे ? जे पॅकेज होते त्याप्रमाणे प्रस्ताव आले नाहीत. त्याबाबतीत प्रतिसाद कमी आहे. या संदर्भात कोकणामध्ये जिल्हावार बैठका घेऊन, सर्व एजन्सीजना एकत्रित करुन सर्वसामान्य लोकांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न करु.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याचे मी स्वागत करतो. माननीय मंत्रिमहोदय न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप .....

याबद्दल दुमत नाही. परंतु 20 टक्के फळ प्रक्रिया झाली पाहिजे ती कोकणात होत नाही हे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केले. त्यासाठी शासन विशेष कृती कार्यक्रम घेणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. यासंदर्भात शासनाच्या वतीने उपाययोजना आखली जाईल. कोकणातच नव्हे तर इतर विभागांमध्ये सुध्दा फळांवर प्रक्रिया होत नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उल्हासनगर येथे अल्पसंख्यांकाच्या दफनभूमीकरिता जमीन देण्याबाबत होत असलेली दिरंगाई

**मु. शी.** : उल्हासनगर येथे अल्पसंख्यांकाच्या दफनभूमीकरिता जमीन देण्याबाबत होत असलेली दिरंगाई यासंबंधी सर्वश्री सय्यद पाशा पटेल, धनंजय मुडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उल्हासनगर शहरातील अल्पसंख्याक संघटनांची त्यांच्या दफनभूमीकरीता सन 1996 पासून सातत्याने होत असलेली मागणी, उल्हासनगर महानगरपालिकेने धोबी घाट, म्हारल गाव, मुरबाड रोड येथील मंजूर केलेला भूखंड, त्याविरुध्द उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी सदर जागेवर पाणीसाठण्याच्या असलेल्या संभाव्य धोक्याबाबत सादर केलेले प्रतिज्ञापत्र, त्याच प्रतिज्ञापत्रात उल्हासनगर महापालिकेला या दफनभूमीकरीता पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले असूनही त्याबाबत होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी अल्पसंख्याक समाजामध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाच्या संदर्भात हा प्रश्न आहे. हा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये आमच्या मुस्लीम बांधवांना कब्रस्तानसाठी जागा मिळण्याबाबतचा हा विषय दहा ते अकरा वर्षापासून प्रलंबित आहे. स्थानिक महानगरपालिका प्रशासनाने आणि शासनाने सुध्दा या विषयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. यापूर्वी तेथील कब्रस्तानसाठी जागा देण्याच्या संदर्भात निर्णय निर्णय झाला होता आणि त्यासाठी जागा राखून ठेवण्यात आली होती. परंतु कब्रस्तानसाठी जी जागा राखून ठेवण्यात आली होती ती पूरग्रस्त भागामध्ये किंवा पूररेषेखाली येत असल्यामुळे ती जागा दफनभूमीसाठी प्रशासनाला देता आली नाही. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. यासंदर्भात न्यायालयात प्रकरण गेले होते आणि न्यायालयाने निर्देश दिलेला आहे तसेच नगरसचिवाने ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

हा प्रश्न तातडीने प्राधान्याने मार्गी लागण्यासाठी मी दोन प्रश्न विचारतो. प्रधान सचिवांनी महानगरपालिकेला भूखंड उपलब्ध करुन देण्यासंबंधी प्रतिज्ञापत्राच्या माध्यमातून निदेश दिलेले आहेत ते काय आहेत ? कब्रस्तानसाठी अद्याप जागा उपलब्ध न होण्याचे कारण काय ? मौजे म्हारळ येथील स.क्र.58 ही जागा पूर रेषच्या आत येत असल्यामुळे उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून उल्हासनगर शहराचा जो विकास आराखडा आहे त्यामध्ये मुस्लीम समाजासाठी कब्रस्तानसाठी एखादा प्लॉट आरक्षित ठेवला जाणार आहे का ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी दोन महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. सचिवांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी महानगरपालिकेला जे निदेश दिले त्यासंबंधी मी निवेदनात नमूद केलेले आहे. महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन द्यावी असे ते निदेश आहेत. उल्हासनगरच्या विकास आराखडयामध्ये स.क्र.47 हा प्लॉट कब्रस्तानसाठी राखीव ठेवला होता. परंतु तेथे मोठया प्रमाणावर अनधिकृत वस्ती वाढल्यामुळे तेथे कब्रस्तान होणे अवघड झालेले आहे. त्यानंतर दुसरा स.क्र.58 वर कब्रस्तानसाठी जागा आरक्षित करावी असे निश्चित केल्यावर ती जागा सुध्दा पूर रेषेच्या आत येते. त्यामुळे ती जागा सुध्दा उपलब्ध करुन देणे अवघड झालेले आहे. त्यामुळे पुढील काळात विकास आराखडयात कब्रस्तानसाठी भूखंड राखीव ठेवणार काय असे त्यांनी विचारले आहे. यासंबंधी प्राथमिक माहिती घेतली असता आज तरी उल्हासनगर मध्ये जागा शिल्लक नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जागा उपलब्ध होते काय हे तपासून पाहिले जाईल.

श्री.संजय केळकर : गेल्या 11 वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित राहिला आहे. हा विषय निरनिराळ्या माध्यमातून उपस्थित झाल्यावर शासनाला निदेश दिले जातात. हा प्रश्न सुटला पाहिजे. कारण कब्रस्तानचा प्रश्न आहे. या प्रश्नाला दिरंगाई झालेली आहे. यासंदर्भात कोर्टानेही शासनाला आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, आपणही यासंबंधी एक बैठक घेतली आहे. जिल्हाधिकारी, अल्पसंख्याक समाजाचे लोकप्रतिनिधी, तेथील आमदार आणि महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी यांची एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावणार काय ? त्याच्यातून कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी बैठक घेतली जाईल काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, काही दिवसापूर्वी आपण सुध्दा मला बोलविले होते. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे एक बैठक आयोजित करावी आणि हा प्रश्न कायम स्वरुपी सोडवावा अशी सूचना केली होती. त्यानंतर ही बैठक होऊ शकली नाही. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न पुन्हा सभागृहासमोर आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी तीच मागणी केली असल्यामुळे हे अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्यामध्ये संबंधित आमदार, जिल्हाधिकारी, आयुक्त व संबंधित व्यक्तींना बोलविण्यात येऊन आपल्याच दालनात बैठक आयोजित केली जाईल आणि त्यातून योग्य असा मार्ग काढला जाईल.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी के लंबे उत्तर का निष्कर्ष यही है कि वहां अल्पसंख्यक लोगों के कब्रिस्तान के लिए जगह नहीं है. यह विषय हाईकोर्ट में भी गया था. मुझे माननीय मंत्री महोदय से दो सवाल पूछने हैं. एक तो यह कि आपने कहा कि एक महीने के अंदर मीटिंग लेंगे और दूसरा यह कि वहां के लोगों ने हमें बताया कि वहां के उप विभाग के अधिकारी ने शांति नगर, उल्हासनगर में केंप नंबर तीन के सर्वे नंबर 51 और 52 की जगह के लिए शासन के पास प्रस्ताव भेजा है. आपने यहां पर बताया कि महानगर पालिका क्षेत्र में कब्रिस्तान के लिए कोई जगह नहीं है. लेकिन एसडीओ ने जो प्रस्ताव शासन के पास भेजा है, उस बारे में शासन ने क्या निर्णय लिया है और यदि निर्णय नहीं लिया तो उसका कारण क्या है ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : त्या बाबतीत निर्णय होऊ शकणार नाही याचे कारण असे आहे की तेथे हिंदू स्मशान भूमी आहे. हिंदू स्मशान भूमीत जाण्याचा मार्ग देखील याच सर्व्हे नंबर मधून जातो. भविष्याचा आणि वाढत्या लोकसंख्येचा विचार करता आज त्या ठिकाणी भूखंड देणे हे भविष्यामध्ये अडचणीचे होऊ शकते. म्हणून आपण वेगवेगळया ठिकाणी भूखंड शोधण्याचे काम करीत आहोत. परंतु उपसभापती महोदय, आपल्याकडे जी बैठक होईल त्यामध्ये यासंबंधातील अंतिम निर्णय होईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 बाबत</u>

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 आणि 4 पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

श्री. विनायक मेटे : लक्षवेधी पुढे ढकलण्यास हरकत नाही. अधिवेशनाचे दोनच दिवस शिल्लक राहिलेले आहेत. ही लक्षवेधी पुढे ढकलण्याचे कारण काय ? ही लक्षवेधी आपण पुढे केव्हा घेणार आहात ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याचे कारण असे आहे की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील माहिती राज्य शासनाला गोळा करण्यास थोडा विलंब लागत आहे. म्हणून ही लक्षवेधी सूचना सोमवारी घेण्यात येईल.

श्री. बाळासाहेब थोरात : लक्षवेधी क्रमांक 4 पुढे ढकलण्याची कारणे काय आहेत ?

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्याचे कारण असे आहे की, हा विषय महाराष्ट्रातील अनुसूचित जाती जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या जातीचे प्रमाणपत्र अधिनियम 2009 अन्वये आदिवासी विभागांतर्गत हाताळला जात असल्याने सदरहू लक्षवेधी सूचना त्या विभागाकडे पूर्वसंमतीने हस्तांतरित करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सदरहू लक्षवेधी सूचना आदिवासी विभागाच्या नावे दर्शविलेली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : खाजगी शाळांना 50टक्के फी वाढ करण्यास दिलेली मान्यता

**मु.शी.** : खाजगी शाळांना 50 टक्के फी वाढ करण्यास दिलेली मान्यता यासंबंधी श्री दिवाकर रावते, डॉ. नीलम गो-हे,सर्वश्री परशुराम उपरकर आणि किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील मराठी शाळांच्या बाबतीत शासनाची असलेली उदासीन भूमिका, त्यामुळे मराठी भाषेचे भवितव्य धोक्यात आले आहे. शासनाने मराठी शाळांच्या बाबतीत स्वीकारलेल्या उदासीनतेच्या धोरणामुळे राज्याची राज्य भाषा मराठी असूनही ती निराधार झाली आहे. शासनाचे सदर धोरण निंदाजनक आहे. यावर उपाययोजना म्हणून शासनाने ठोस भूमिका स्वीकारावी व राज्यात मराठी भाषेच्या शिक्षणासंदर्भातील नियोजन, धोरण स्पष्ट करावे अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : शासनाने विनाअनुदानित खाजगी शाळांना त्यांनी आकारलेल्या फीच्या 50 टक्के फी वाढ करण्यास परवानगी दिलेली असल्यामुळे या शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांवर आर्थिक बोजा वाढत आहे. यापूर्वी ज्या ज्या खाजगी शाळांनी फी वाढ केलेली आहे त्या शाळांची यादी मी सदनाला सादर केली होती. एका बाजूला या शाळांना मान्यता देत असताना दुसरीकडे कितीही फी आकारण्याची त्यांना परवानगी आपण देत आहात. त्यामुळे त्यांनी किती फी आकारावी याला काही मर्यादा रहात नाही. मी मागच्या वेळी सात-आठ शाळांची यादी वाचून दाखवली होती. अशा शाळांना फी वाढीची परवानगी देत असताना ती फी किती वाढवावी यावर शासन काही बंधन ठेवणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, आपले शिक्षणाधिकारी त्या शाळेमध्ये गेल्यानंतर त्यांना ते तीन-तीन चार-चार तास बाहेर बसवून ठेवतात. तसेच जे पालक कोर्टात जातात त्या पालकांना देखील अशा प्रकारची वागणूक दिली जाते. शाळेची फी परवडत नसेल तर तुम्ही शाळा बदला, तुमच्या मुलांना तुम्ही दुस-या शाळेत दाखल करा असे शाळेतर्फे सांगितले जाते. याचा अर्थ शासनाचे कंट्रोल काही ठराविक शाळावरच आहे आणि काही शाळांना फी वाढीची एवढी मुभा दिलेली आहे की, उद्या अशी स्थिती असू शकेल की एखाद्या मर्सिडिजच्या गाडीच्या किंमती एवढी पहिली किंवा दुसरीच्या मुलाची फी आकारली जाईल. एवढया अवाढव्य फी आहेत. या राज्यामध्ये 25 हजार रुपयासाठी शेतक-याच्या आत्महत्या होत आहेत. 1 लाखासाठी कुटुंब उद्ध्वस्त होत आहे आणि त्याच राज्यामध्ये आपल्या शैक्षणिक धोरणामुळे एक संस्था पहिली आणि दुसरीच्या वर्गातून करोडो रुपये उत्पन्न मिळवीत असेल तर त्यांच्यावर काही तरी निर्बंध घालण्यासाठी शासन काही नवीन धोरण ठरविणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5........

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कायम विनाअनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संस्थांमधील शुल्क निश्चितीकरणाच्या संदर्भातील जी.आर. शासनाने दिनांक 15 जुलै, 2010 रोजी निर्गमित केलेला आहे. माननीय उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या प्रोसीजरप्रमाणे हा जी.आर.काढण्यात आला आहे. माननीय हायकोर्टाने एक महिना या निर्णयाची अंमलबजावणी करु नये अशा सूचना दिलेल्या आहेत. या जी.आर.प्रमाणे कार्यवाही केल्यानंतरच फी निश्चितीकरण होईल आणि त्या पध्दतीने अंमलबजावणी केली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न फी वाढीच्या संदर्भात नाही. या सर्व शाळांवर कायद्याने नियंत्रण आणण्याचा मुद्दा आहे. एका बाजूला शिक्षकांना वेतन देण्याच्या नावाखाली भरमसाठ फी आकारली जाते. परंतु या शाळांमधील शिक्षकांना पुरेसे वेतन दिले जात नाही. शिक्षक पदांना व्यक्तिगत मान्यता दिली जात नाही, तसा प्रस्ताव पाठविला जात नाही. शिक्षकांचा दर्जा आणि अर्हता, त्यांचे वेतनेतर कायदेशीर हक्क संरक्षित करण्यासाठी सर्व माहिती घेऊन या शिक्षक पदांना मान्यता देण्याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी यापूर्वी आश्वासन दिले होते. त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही. या संदर्भातील कार्यवाही केव्हा केली जाणार आहे? फी वाढीपासून शाळांचा दर्जा, शिक्षकांची मान्यता आणि हक्कापर्यंतच्या सर्व बाबींवर नियंत्रण आणण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी कायद्याचा प्रश्न उपस्थित केला होता. कायद्याने या बाबींवर नियंत्रण आणण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे? शासनाने विभागीय स्तरावर उप संचालकांची समिती स्थापन केली आहे. शिधावाटप यंत्रणेबाबत सभागृहाच्या सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली आहे. त्या पध्दतीने स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग असणारी राज्यस्तरावर आणि विभागीय स्तरावर शिक्षक प्रतिनिधींचा सहभाग असलेली समिती स्थापन केली जाणार आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, खाजगी शाळातील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सेवाशर्ती अधिनियम, 1977 आणि कर्मचारी सेवेच्या शर्ती नियम, 1981 याची अंमलबजावणी शासन करीत आहे. त्यानुसार शाळांना शिक्षकांच्या वेतनाबाबतची कार्यवाही करावी लागते. याबाबत तक्रार आल्यास शासनाकडून कारवाई केली जाते. सन्माननीय सदस्यांनी लोकप्रतिनिधींचा सहभाग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात........

असलेली समिती स्थापन करणार का असा प्रश्न विचारला आहे. शासनाने जो जी.आर.काढला आहे त्यामध्ये नमूद केले आहे की, स्थानिक पालक आणि शिक्षक यांची समिती आहे. त्यांच्यापुढे जावे लागेल आणि फी निश्चितीकरण करावे लागेल. तसे केल्यानंतर अपील करण्याची सुध्दा संधी देण्यात आली आहे. अवाजवी फी घेणे, अवाजवी नफा मिळविणे शक्य होऊ नये याबाबत शासन पूर्णपणे लक्ष ठेवणार आहे.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, ज्या खाजगी शाळा आहेत त्यांना 50 टक्के फी वाढ करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. मध्यंतरी एसएससी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर अकरावी प्रवेशाबाबतचा घोळ आपण सर्वांनी अनुभवला आहे. एसएससी, सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे अकरावीमध्ये प्रवेश देताना फार मोठा गोंधळ निर्माण झाला. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्ड स्वतंत्रपणे अभ्यासक्रम घेतात आणि फी देखील स्वतंत्रपणे घेतली जाते. परंतु अकरावी प्रवेशासाठी एसएससी बोर्डाकडून दिले जाणारे फायदे त्यांना हवे असतात. आता इंटरनॅशनल स्कूलची यामध्ये भर पडली आहे. रिलायन्स ग्रूपची इंटरनॅशनल स्कूल आहे. केवळ कॉलेज, मेडिकल कॉलेज किंवा इंजिनिअरिंग कॉलेज काढण्यापुरता हा विषय नसून ज्युनिअर केजी, सिनियर केजी, केजी, प्रायमरी, सेकंडरी शिक्षण देण्यासाठी अशा इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याकडून वर्षाला 16 ते 20 लाख रुपये फी वसूल केली जाते. शासन त्यांच्या फी घेण्यावर बंधन आणण्याचा प्रयत्न करणार आहे का?

नंतर 2एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ज्या शाळांनी शासनाची एनओसी घेतलेली आहे अशा सर्व शाळांना 15 जुलैचा जीआर बंधनकारक असून त्यांना त्या प्रमाणे अंमलबजावणी करावी लागेल. ज्या शाळा 15 जुलैच्या जीआरची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांना संस्थेने सहाव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन द्यावयाचे, या शाळांनी 50 टक्क्यापेक्षा जास्त फी वाढ करावयाची नाही, प्रत्येक विद्यार्थ्याच्या मागे 50 रुपयांपेक्षा जास्त फी घेतली जाणार नाही हे लक्षात घेण्याची जरुरी आहे. पूर्वप्राथमिकच्या वर्गामध्ये शिकणा-या प्रत्येक मुलांमागे लाखो रुपये फी घेतली जाते. त्यामुळे हे गणित इतर शाळा कसे काय जमवतात ते माननीय मंत्रीमहोदयांनी आम्हाला समजावून सांगावे. 50 टक्क्यापेक्षा जास्त फी वाढ होणार नाही तसेच प्रत्येक विद्यार्थ्याकडून 50 रुपयांपेक्षा जास्त फी घेतली जाणार नाही असा नियम आहे. शाळेतील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन द्यावयाचे, शाळा कशी चालवावयाची आणि फी कशी घ्यावयाची याचे गणित मंत्रीमहोदयांनी समजावून सांगावे.

श्री. बाळसाहेब थोरात : सभापती महोदय, पाचवा वेतन आयोग लागू केला होता तेव्हा 1999 मध्ये यासंदर्भातील जीआर काढण्यात आला होता. त्यामुळे यावेळेसही शाळांनी शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार द्यावा लागणार आहे. परंतु शाळेला सहाव्या वेतन आयोग लागू करण्यासाठी जो खर्च येणार आहे त्यासाठी 50 रुपयांचा फरक देण्याकरिता 50 रुपयांपेक्षा जास्त वाढ फी मध्ये करु नये असे सांगण्यात आलेले आहे. एका बाजूला शिक्षकांना सामावून घेतले जात असतांना शाळेने पालकांना सुध्दा मदत करण्याचा प्रयत्न करावा एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचा रोख इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित शाळेमध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या अनुषंगाने माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. शासनाने संस्था चालकांना फी वाढ करण्याची परवानगी दिलेली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आहे. संस्था चालक शिक्षकांना समान कामासाठी समान वेतन देतात म्हणून संस्था चालक शिक्षकांवर काही मेहरबानी करीत नाही. आमचे शिक्षक काम करतात म्हणून त्या संस्थांना अनुदानित संस्थांप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे व तो त्यांचा हक्कही आहे. कायदा आणि नियम सर्वांना सारखेच लागू असल्यामुळे शासनाने शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन द्यावे असा कायदा केला व त्या प्रमाणे संस्था चालकांना बंधनकारक केले. वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाने संस्थांना फी वाढ करण्याची परवानगी दिलेली असतांना सुध्दा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचा-यांना पूर्ण वेतन दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाने फी वाढ केली परंतु त्या संस्था शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन दिले किंवा नाही यासंदर्भात शासनाच्या माध्यमातून पडताळणी होणार आहे काय ?

तसेच या शाळेत काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची मान्यता घेतली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे हे सर्व पाहण्याचे काम शिक्षण विभागाचे आहे. या शाळेतील विद्यार्थी एसएससी बोर्डाच्या परीक्षेला बसतात, त्यामुळे या शाळांनी संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता घेतलेली आहे की, नाही हे पडताळून पाहिले जाणार आहे का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संस्थेने विद्यार्थ्यांची फी वाढवली परंतु त्या प्रमाणे शिक्षकांना पगार दिला नसेल तर यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रार केली तर त्याची चौकशी करुन कारवाई केली जाईल. संच मान्यता, शिक्षक मान्यता हे विषय देखील आहेत व त्यासंदर्भात पडताळणी केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी 50 टक्क्याचे सिलिंग असले पाहिजे असा मुद्दा मांडला होता. त्यामुळे आपण प्रत्येक शाळेची छाननी केली पाहिजे. सहावा वेतन आयोग दिल्यानंतर शिक्षकांना एकूण पगारवाढ किती होते त्याच्या अनुसरुन 50 टक्के सिलिंग असले पाहिजे. यासाठी आपल्याला काही शाळांना 10 टक्के, 15, 20 टक्के वाढवावे लागणार आहे. आपण सरसकट 50 टक्के वाढ केली तर शाळेकडे लाखो रुपये सरप्लस असतात. अनुदानित, विनाअनुदानितच्या शाळांसाठी पैसे शासनाच्या तिजोरीतून जात असतात. जनतेचा पैसा यासाठी खर्च होत असतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आमचा असा अनुभव आहे की, त्यांना पूर्ण पगार दिला जात नाही. नोकरी टिकण्यासाठी ते तेथे काम करीत असतात. त्या शाळेमध्ये शिक्षक नोकरीला लागले आहेत. ते आपल्या पटावर आले पाहिजेत व त्यांचा चेक शासनाकडून गेला पाहिजे. तरच त्या शिक्षकांना पूर्ण पगार मिळेल. अशी मागणी मी वारंवार करीत आहे. पण त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहात. आज सगळे संस्था चालक गब्बर झाले आहेत. ते राजकारणामध्ये आपल्याला खेळवत आहेत. शिक्षकांना 6 वा वेतन आयोग लागू केला आहे. ते पैसे सरकारच्या माध्यमातून त्यांच्या अकौंटमध्ये जमा झाले पाहिजे. संस्था चालक एकेका शिक्षकांकडून 5 लाख रूपये नोकरीसाठी घेतात आणि नंतर त्यांना हकलवून देतात. हा प्रकार सगळीकडे सर्रास सुरू आहे. त्यामुळे आपण जर त्यांच्या नावाने पगार दिला तर हा प्रकार बंद होईल. त्यामुळे शिक्षक प्रामाणिकपणे, सक्षमतेने विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करतील. हकालपट्टीमुळे शिक्षक टिकत नाही. शिक्षकांना अर्ध्या पगारावर रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा त्यांचा पगार थेट बँकेमध्ये जमा करावा असा माझा विषय आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, सुधारित वेतन श्रेणीमुळे आकारावयाची फी वाढ 50 टक्के पेक्षा जास्त असणार नाही हे स्पष्टपणे सांगितले आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधी मी कालच सांगितले आहे. शिक्षकांचा पगार त्यांच्या अकौंटवर ऑन लाईन सिस्टीमद्वारे जमा करण्यासंबंधी आम्ही विचार करीत आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सर्वप्रकारच्या शाळांना 15 जुलैचा आदेश मानावा लागेल असे मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे. अल्पसंख्यांक असलेल्या ख्रिस्ती मिशनरीच्या शाळेत फी आणि प्रवेशासंबंधीचा आदेश लागू होईल काय ? या शाळांना हा आदेश लागू आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्यांना हे सर्व लागू आहे.

............................

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्या अंतर्गत
संरक्षण अधिकारी नेमणे

**मु. शी.** : कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्या अंतर्गत
संरक्षण अधिकारी नेमणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे
वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, आपल्या समाजाचे आणि शासनाचे संवेदनहिनतेचे सातत्याने प्रदर्शन होत असते. शासनाने कायदे केले आहेत. पण काही कायद्यांसंबंधी अन्यायकारक निर्णय घेतले आहेत. कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा आपण 2005 मध्ये केला. या कायद्यानुसार संरक्षण अधिकारी नेमण्याची जबाबदारी सरकारवर होती. परंतु, दिनांक 8जून 2010 रोजी सरकारने असे जाहीर केले आहे की, हे काम आऊट सोर्स केले जाणार आहे. मी या विशेष उल्लेखाद्वारे प्रश्न उपस्थित करू इच्छिते की, सरकार पुढच्या काळामध्ये पोलीस स्टेशनचे पण आऊटसोर्सिंग करणार आहे काय ? महिलांची स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती आहे. त्यांनी आणि इतर अनेक संघटनांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, संरक्षण अधिकारी नेमण्याची जबाबदारी महिला व बालकल्याण विभागावर असताना गेले 4 वर्षे अधिकारी का नेमले नाहीत ? उलट आता हे काम आऊटसोर्सिंग करणार असे शासन म्हणत आहे. सरकारकडे कामाचे आऊटसोर्सिंग करण्यासाठी पैसे आहेत तर मग संरक्षण अधिकारी नेमण्यासाठी पैसा का नाही ? याकडे शासनाने लक्ष देऊन योग्य ते पाऊल उचलावे. अन्यथा महिला आंदोलनाला आणि निषेधाला सरकारला सामोरे जावे लागेल. एवढेच मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रेठरे,ता.इस्लामपूर,जि.सांगली या गावात चिकनगुनिया तापाची पसरलेली साथ

**मु. शी.** : रेठरे,ता.इस्लामपूर,जि.सांगली या गावात चिकनगुनिया तापाची पसरलेली साथ याबाबत श्रीमती दीप्ती चवधरी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमत दीप्ती चवधरी यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

रेठरे धरण (ता.इस्लामपूर,जि.सांगली) या गावात माहे जुलै 2010 रोजी मोठ्या प्रमाणात चिकनगुनिया तापाच्या साथीने ग्रामस्थ अतिशय हैराण झाले आहेत. सुमारे 500 हून अधिक लोकांना या साथीची लागण झाल्यामुळे याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

......

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्याच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त मागील 50 वर्षातील साहित्यिक,कलावंत व सामाजिक कार्यकर्ते यांचे समग्र दर्शन घडविणारा ग्रंथ निर्माण करणे

**मु. शी.** : राज्याच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त मागील 50 वर्षातील साहित्यिक,कलावंत व सामाजिक कार्यकर्ते यांचे समग्र दर्शन घडविणारा ग्रंथ निर्माण करणे याबाबत श्री. हेमंत टकले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्य स्थापनेचे यंदाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष. गत 50 वर्षातील प्रत्येक दशकातील महत्वाचे साहित्यिक व कलावंत तसेच सामाजिक कार्यकर्ते यांच्या योगदानाचे समग्र दर्शन घडविणारा एक दर्जेदार ग्रंथ निर्माण करावा. दिनांक 1 मे 2011 रोजी या ग्रंथाचे प्रकाशन करावे. याबाबत शासनाच्या नव्याने निर्माण झालेल्या मराठी विभागाने हे काम हाती घ्यावे, यासाठी शासनाने घ्यावयाचा निर्णय व कार्यवाही.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लष्करी अधिकाऱ्याने लहान मुलांचे अश्लील चित्र करुन ते इंटरनेटवर टाकणे

**मु. शी.** : लष्करी अधिकाऱ्याने लहान मुलांचे अश्लील चित्र करुन ते इंटरनेटवर टाकणे याबाबत श्री.मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.मोहन जोशी यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

मुंबईतील कुलाबा येथील लष्काराच्या आपत्ती व परिवहन विभागात काम करणाऱ्या कर्नल यांनी लहान मुलांचे अश्लील चित्रण करुन ते इंटरनेटवर टाकण्यात आल्याची धक्कादायक घटना मंबईत घडली. उद्या अशाप्रकारच्या घटना राज्यात सर्वत्र घडण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा घटनांना संपूर्ण राज्यभर पसरण्यापूर्वी तसेच या घटनांमध्ये वाढ होण्यापूर्वी त्या रोखण्यासाठी प्रोहिबिटेड सॉफ्टवेअर पोलीस खात्याकडे नसल्याने अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यास पोलीस यंत्रणेस अपयश येत आहे. त्याकरिता राज्य शासन सायबर गुन्हे रोखण्याकरिता प्रोहिबिटेड सॉफ्टवेअर पोलीस यंत्रणेस उपलब्ध करुन देण्याबाबत उपाय योजना करावी त्याचप्रमाणे राज्यात पोलीस भरती करते वेळी दोन टक्के आय.टी.प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्याची खबरदारी घ्यावी व पोलीस अधिकारी हे सुध्दा आय.टी.प्रशिक्षित किंवा पदवीधर असावेत. म्हणजे या घटना वेळीच रोखता येतील अशा या अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी व हुसेन दलवाई उपस्थित नाहीत. तेव्हा मी पुढील विशेष उल्ल्रेखाची सूचना घेत आहे.

..3..

**पृ. शी**. : बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यात खतांचा कृत्रिम तुटवडा भासवून खतांची चढ्या भावाने होत असलेली विक्री

**मु. शी**. : बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यात खतांचा कृत्रिम तुटवडा भासवून खतांची चढ्या भावाने होत असलेली विक्री याबाबत ॲड.उषा दराडे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यात एकूण 65 तर शिरुर कासार शहरात 14 खताची दुकाने असून सदर दुकानदार खतांचा कृत्रिम तुटवडा भासवून चढ्याभावाने खत विक्री करणे. तसेच गतवर्षाचे उत्पन्न पाहता कनक (7351) या कापसाच्या वाणाची मोठी मागणी असल्याने 7383 बियाणावर डॉक्टर बॅण्डची खरेदी करण्यास सक्ती करणे, चालू हंगामात मान्सून पूर्व पावसाचे विहित हंगामात आगमन झाल्याने शेतकरी खत खरेदीसाठी घाई करीत असणे, शेतक-यांना खतेबियाणे सुरळीत योग्य भावात मिळण्यासाठी प्रत्येक दुकानात कृषी सहाय्यकाची नियुक्ती करण्याची घोषणा करुनही दुकानात कृषी सहाय्यकाची नियुक्ती न केल्याने शेतकऱ्यांची होत असलेली लूट, सदर लूट थांबविण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

------

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात राष्ट्रीय अभियान योजनेंतर्गत जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येत असलेल्या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची करण्यात आलेली नियुक्ती

**मु. शी.** : राज्यात राष्ट्रीय अभियान योजनेंतर्गत जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येत असलेल्या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची करण्यात आलेली नियुक्ती. याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यात सर्व जिल्हयांमध्ये केंद्र शासनाच्या अनुदानातून राष्ट्रीय ग्रामीण अभियान योजनेंतर्गत जिल्हा प्रजनन व बाल आरोग्याच्या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनेसाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा स्तरावर डाटा एन्ट्री ऑपरेटर व लिपिक, अकाऊटंट इत्यादी संवर्गातील पदांची निर्मिती करण्यात आली असून अशा स्वरुपाची तालुका स्तरावर देखील पदे भरण्यात आली आहेत. सदरहू पदांवर कार्यरत असलेले उमेदवार हे गेल्या अनेक वर्षापासून कंत्राटी अधिकारी / कर्मचारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांना कोणत्याही स्वरुपाची वेतनश्रेणी निश्चित केलेली नाही. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या सोयीसुविधा मिळतात त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. सदरहू कर्मचारी गेल्या पाच वर्षापासून कंत्राटी पध्दतीनेच काम करीत असून त्यांच्यापैकी अनेक कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा उलटून गेली आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी केल्यास त्यांच्या समोर जीवन मरणाचा प्रश्न निर्माण होणार आहे. संपूर्ण राज्यात अशाप्रकारची जवळ जवळ 800 ते 900 पदे आहेत. या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे भवितव्य नसल्याने त्यांच्या मनात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी या कर्मचाऱ्यांना सदरहू योजनेंतर्गत कायम स्वरुपी घेऊन त्यांना देय असलेली वेतनश्रेणी देण्याची

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

नितांत आवश्यकता आहे. तरी याबाबतीत मी शासनाचे लक्ष वेधून या संदर्भात शासनाने निश्चित स्वरुपाचा निर्णय घेऊन त्यानुसार कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करतो.

-----

..6..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील शिरंगे उंडील येथील सुमारे 2600 हेक्टर जमिनीवरील लाखो झाडे परप्रांतियांनी तोडणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील शिरंगे उंडील येथील सुमारे 2600 हेक्टर जमिनीवरील लाखो झाडे परप्रांतीयांनी तोडणे याबाबत श्री.परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील शिरंगे उंडील येथील सुमारे 2600 हेक्टर जमीन परप्रांतीय केरळीयन लोकांनी वन जमिनीचे नीस (खुणा) काढून त्यातील विनापरवाना लाखो झाडे तोडून गुन्हा केल्याप्रकरणी तसेच शेतकरी बोगस असल्याचे दाखले वापरलेले आहेत. उप वनसंरक्षक सावंतवाडी यांनी जमिनी शासनाच्या ताब्यात घेण्याकरिता सेक्शन 3 अंतर्गत नोटीसा बजावलेल्या आहेत. ज्या नोटीसीच्या आधारे एक महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करावयाचे असताना अद्याप अपील न केल्याने सदर जागा शासनाच्या वन विभागाकडे संपादित करुन सातबारावर वन विभागाचे नाव लावण्याची प्रक्रिया तातडीने करण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

--------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विशेष उल्लेखाच्या सूचना संपल्या आहेत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मला विशेष उल्लेखाची सूचना मांडावयाची आहे.

**उपसभापती** : आपण सभागृहात वेळेवर उपस्थित राहत नाहीत .सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याची संधी देत असतो . सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाची सूचना अगोदर दिलेली नसतांना ती सभागृहात मांडण्यासाठी सन्माननीय सदस्य माझ्याकडे आग्रह धरतात व चुकीच्या प्रथा पाडतात. एखाद दुसरी विशेष उल्लेखाची सूचना सोडल्यास मी शक्य तेवढया सगळया विशेष उल्लेखाच्या सूचना घेत असतो. परंतु दररोज जास्त विशेष उल्लेखाच्या सूचना यावयास लागल्या तर त्या सर्वच घेता येणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये मराठी भाषेच्या संदर्भात नियम 97 अन्वयेचा प्रस्ताव दाखविण्यात आला आहे परंतु तो प्रस्ताव सोमवारी घेण्याचे ठरले आहे मिरज आणि मालेगाव येथील घटनांच्या संदर्भात सोमवारी चर्चा घेण्यात येणार आहे . आज युवा धोरणाच्या संदर्भातील नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा झाली आणि त्या प्रस्तावाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे ही चर्चा आता संपली आहे माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्याला अशी विनंती केलेली आहे की, मराठी भाषेसंबंधी चर्चा आज न घेता सोमवारी घेण्यात यावी. त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना आज बोलू द्यावे आणि या चर्चेच्या नोटस घेण्यासाठी संबंधित विभागाच्या राज्यमंत्र्यांना सभागृहात हजर राहण्यास सांगण्यात यावे. आपल्याकडे कामकाज जास्त आणि दिवस कमी असल्यामुळे मराठी भाषेच्या प्रस्तावावर आज सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे.सोमवार आणि मंगळवार असे दोनच दिवस आता कामकाज होणार आहे. मंगळवारी अंतिम आठवडा प्रस्ताव घ्यावयाचा आहे. प्रत्येक वेळी आमचा अंतिम आठवडयाचा प्रस्ताव पुढे ढकलला जात असतो तसे यावेळी आम्ही होऊ देणार नाही. काहीही झाले तरी मंगळवारी आम्ही अंतिम आठवडा प्रस्ताव घेणारच आहोत. कामकाज जास्त आणि वेळ कमी अशी स्थिती असल्यामुळे मराठी भाषेच्या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल त्यांना बोलू द्यावे आणि संबंधित विभागाच्या राज्यमंत्र्यांना नोटस घेण्याकरता बोलविण्यात यावे.अशी मी आपल्याला विनंती करतो.

24-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल त्यानंतर जेव्हा सभागृहाची बैठक सुरु होईल त्यावेळी ज्या सन्माननीय सदस्यांना मराठी भाषेच्या प्रस्तावावर बोलावयाचे आहे ते सन्माननीय सदस्य बोलतील या प्रस्तावावरील चर्चेला प्रथम .सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम सुरुवात करतील. त्यांनतर अशासकीय कामकाज घेण्यात येईल

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पाईट ऑफ प्रोसिजर आहे.दोन चार दिवसापूर्वी कळवणी, ता.खेड, जि.रत्नागिरी येथील हॉस्पिटल संबंधीची लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती त्यावेळी एक तासाची चर्चा ठेवण्यात यावी असे आपण शासनाला निदेश दिले होते अधिवेशन संपायला दोन दिवस राहिले आहे तेव्हा ही चर्चा केव्हा घेण्यात येणार आहे

**उपसभापती** : त्याबाबतीत मी नंतर सांगतो.आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन्हा भरेल.

( 2.17 ते 2.45 मध्यंतर )

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापती स्थानी माननीय तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)**

**पृ.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय

**मु.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय या विषयावर श्री दिवाकर रावते,डॉ.नीलम गोऱ्हे,डॉ.दीपक सावंत श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यानी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे चालू...)

**तालिका सभापती** : मराठीच्या विषयावर अपूर्ण राहिलेली अल्पकालीन चर्चा आता पुढे सुरु करण्यात येईल. या चर्चेकरिता एक तासाचा अवधी देण्यात आला असून एकूण 13 माननीय सदस्य बोलणार आहेत. त्यामध्ये सर्वश्री विनोद तावडे, अरुण गुजराथी, सय्यद जमा, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे, डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सर्वश्री परशुराम उपरकर, रामदास कदम, किरण पावसकर, संजय केळकर, शोभा फडणवीस व रामदास मोते या सदस्यांनी नावे दिलेली आहेत. या एक तासाच्या अवधीमध्ये ज्या माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळणार नाही त्यांना माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणाच्या दिवशी संधी देण्यात येईल. याठिकाणी माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांचे अपूर्ण राहिलेले भाषण ते पुढे सुरु करणार होते, परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी चर्चेला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये नियम 93 अन्वये मराठी भाषेचा विकास करण्यासाठी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे, या चचेमध्ये माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मला प्रथमत: याठिकाणी एक गोष्ट आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणावयाची आहे की, या विधीमंडळामध्ये मराठी भाषेसाठी आतापर्यंत 23 वेळा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री.रामदास कदम...

आश्वासने देण्यात आली आहेत. मागील अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी माझ्याकडे लेखी पत्र दिले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रामध्ये, मुंबई महानगरपालिकेमध्ये जेवढया पाटया मराठीमध्ये नसतील त्यामध्ये सर्व दुकानदारांच्या, सर्व व्यावसायिकांच्या पाटया तीन महिन्याच्या आत मराठीमध्ये करण्यात येतील. तसेच, न्यायालयीन कामकाजाचे मराठीकरण करण्यासाठी शासनाकडे टंकलेखक नाहीत. त्याठिकाणी सहा महिन्याच्या आत मराठी टंकलेखक घेऊ, आणि सहा महिन्यामध्ये न्यायालयीन कामकाज मराठीमध्ये करण्यात येईल" असे लेखी पत्र त्यांनी मला दिले होते. ते माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी खेदाने सांगावेसे वाटते की, अशाप्रकारे या विधीमंडळामध्ये या सरकारने महाराष्ट्रातील जनतेला आश्वासन दिले असतांना त्याची अजूनपर्यंत अंमलबजावणी झाली नाही. खरे तर या विषयावर हक्कभंग दाखल होऊ शकतो, याची मला कल्पना आहे. परंतु या सरकारची मानसिकता नाही. फक्त या सभागृहामध्ये चर्चेला उत्तर द्यायचे आणि ती वेळ मारुन न्यायचे आणि नंतर जैसे थे परिस्थिती असते. या राज्यामध्ये नवीन मुख्यमंत्री आल्यानंतर त्यांनी मराठी भाषेसाठी एक वेगळे खाते निर्माण करुन त्यासाठी 10 कोटींची तरतूद केल्याचे सांगितले. सभापती महोदय, मी याठिकाणी शासनाला सांगू इच्छितो की, मराठीच्या खात्यासाठी जोपर्यंत मराठी सचिव नेमला जात नाही तोपर्यंत याची अंमलबजावणी कधीच होणार नाही. त्या खात्यासाठी अमराठी सचिव नेमण्यात आले तर त्यांना त्याची चिंता नाही. याठिकाणी फक्त भाषणे होतात, त्यावर आश्वासने मिळतात, परंतु त्यानंतर पुढे काहीही कार्यवाही होत नाही. हा सर्व सचिवांचा खेळ आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, ग्रामपंचायतीपासून मंत्रालयापर्यंतचे सगळे कामकाज इंग्रजीमध्ये आहे. सगळया सुनावण्या इंग्रजीमध्ये होतात. निकाल देखील इंग्रजीमध्ये लावण्यात येतात.आदिवासींसाठी मोठ-मोठी भाषणे ठोकण्यात येतात या आदिवासींना इंग्रजी काय कळते? ते काय अपिल करणार आहेत? सभापती महोदय, दहा कोटी रुपयात काय होणार आहे? या दहा कोटी रुपयात नेमके काय करणार? जोपर्यंत मराठी सचिव नसेल तोपर्यंत यासाठी दहा कोटी रुपयेच नाही तर आणखी दहा करोड रुपये बजेटमध्ये तरतूद करुन ठेवली तरी त्याचा उपयोग शून्य होणार आहे.

सभापती महोदय, भाषावार प्रांतरचनेची मागणी पहिल्यांदा 1905-1906 मध्ये लोकमान्य टिळकांनी गोलमेज परिषदेमध्ये केलेली आहे. मी यासंबंधात अधिक अभ्यास तेला तेव्हा लोकमान्य टिळकांनी पहिल्यांदा मागणी केली हे माझ्या लक्षात आले. केली. त्यानंतर संविधान सभेने या विषयाचे अध्ययन केले आणि धर आयोग निर्माण झाला. भाषावार प्रांतरचनेला येथून सुरुवात झाली. धर आयोगाने जो अहवाल दिला तो दिनांक 10-12-1948 साली दिला आणि त्यानंतर दिनांक 1 मे, 1960 साली भाषावार प्रांतरचने नुसार महाराष्ट्राची निर्मिती झाली. खरे तर भाषा ही सर्वसामान्य माणसाच्या व्यवहाराचे माध्यम असते. महाराष्ट्रात मराठी माध्यम असावे असे म्हटले तर त्यामध्ये आम्ही चूक कुठे केली?भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर प्रत्येक राज्यामध्ये त्या त्या भाषेमध्ये सर्व व्यवहार होत असतील तर महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा हे व्यवहाराचे माध्यम असले पाहिजे असे म्हटले तर त्यामध्ये आमची चूक काय? आणि त्यासाठी आम्हाला 50 वर्षे सतत झगडावे लागत आहे. भाषा ही सर्वसामान्यांच्या व्यवहाराचे माध्यम असते. ती मूठभर विद्वानांसाठी नसते. सभापती महोदय, भाषेमध्ये राजकारण असता कामा नये असे मी निश्तिपणे म्हणेन पण मी माझ्या भाषणाच्या शेवटी थोडेसे राजकीय बोलणार आहे. भाषा मूठभर विद्वानांसाठी नसते. ती व्यवहाराचे माध्यम म्हणून असली पाहिजे. त्या त्या राज्यातील जी भाषा आहे ती व्यापाराचे मध्यम असणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून आम्ही मराठी भाषेसाठी सातत्याने आग्रह धरतो. माननीय शिवसेना प्रमुख यासाठी सातत्याने आग्रह धरीत आहेत. सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुखांनी मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी झगडणारी शिवसेना या घोष वाक्यानेच शिवसेनेला जन्म दिलेला आहे आणि म्हणून सतत गेली 42 वर्षे मराठी माणसाचे हित जोपासण्याचे काम हा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/

श्री. रामदास कदम....

पक्ष करीत आहे याचा मला निश्चितपणे अभिमान आहे आणि माननीय शिवसेना प्रमुखांना देखील अभिमान आहे. मराठी भाषे बाबत, मराठीतून पाटया लिहिण्याबाबत आणि मराठी नावाबाबत आम्ही ज्या ज्या वेळी बोलतो त्या त्या वेळी आमच्यावर संकुचित म्हणून शिक्का मारण्याचा प्रयत्न झाला. पण बाकीच्या राज्यामध्ये काय चालले आहे याचे थोडेसे अवलोकन करणे देखील अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. म्हणून या बाबतीत शिवसेना जो सतत लढा देत आहे तो या मायबोलीसाठी देत आहे, मराठीसाठी देत आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे म्हटले असे होत नाही. या राज्याच्या राजधानीमध्ये आणि मुंबई ही या आशिया खंडातील महानगरपालिका असली तरी देखील या राजधानीमध्ये ज्यावेळी मराठी डावलली जाते त्यावेळी निश्चितपणे दुःख होते. वेदना होतात. सभापती महोदय, या मुंबई बाबत मी कालच माझ्या भाषणामध्ये उल्लेख केला आहे. दादर, नायगाव, लालबाग हा एक वेळचा मराठी माणसांचा बालेकिल्ल आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथींना मी सांगू इच्छितो की, या भागामध्ये फक्त वीस टक्के मराठी माणूस टिकला आहे. 40-40 मजल्याच्या गगनचुंबी इमारती होत आहेत. या इमारतींमधील एका फ्लॅटची किंमत 60 ते 70 कोटी रुपये आहे. मराठी माणूस हे फ्लॅट घेऊ शकत नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी हे नॉनव्हेज खातात की नाही हे मला माहीत नाही. ते सांगत आहेत की, नॉनव्हेज खात नाहीत. मी सुध्दा नॉनव्हेज खात नाही. परंतु मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये अनेक इमारतींमध्ये नॉनव्हेज खाणाऱ्यांना फ्लॅट मिळत नाही. तसे बोर्ड त्या ठिकाणी लावलेले आहेत. ही मुंबई कोणाची आहे ? ही वेळ आमच्यावर कोणी आणली ? आज या ठिकाण्ी अतिशय चांगल्या विषयावर चर्चा होत आहे. या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित असते तर अधिक सोयीचे झाले असते. निदान अधिवेशन काळात तरी माननीय मुख्यमत्र्यांनी दिल्लीच्या वाऱ्या करता कामा नये.

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये फक्त 20 टक्के मराठी माणूस टिकला आहे. काही विशिष्ट समाजाचे लोंढेच्या लोंढे मुंबईमध्ये येत आहेत. या राज्याच्या राजधानीमध्ये 58 टक्के परप्रांतीय आहेत. ही अवस्था महाराष्ट्रामध्ये मराठी माणसांची आहे. मराठीची काय अवस्था आहे त्यासंदर्भात कवी कुसुमाग्रज म्हणाले होते की, डोक्यावर सोन्याचा मुकुट घेऊन फाटक्या वस्त्रानिशी मराठी मंत्रालयाच्या दारात उभी आहे. अशी आज मराठीची अवस्था आहे. ही मराठी माणसांची आणि मराठी भाषेची शोकांतिका आहे. राज्य सरकारचे मराठीचे संकेतस्थळ किंवा वेबसाईट पाहिली तर असे दिसेल की, ही वेबसाईट 2006 पासून बंद आहे. एका बाजूला माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, आम्ही मराठीसाठी स्वतंत्र खाते काढत आहोत. दुसऱ्या बाजूला मी अधिक खोलात जाऊन माहिती घेतली त्यावरुन असे दिसते की, 2006 पासून मराठीची वेबसाईट बंद आहे. गेल्या चार वर्षात त्याबाबत काहीही झालेले नाही. अशी मराठीची अवस्था आहे. म्हणून मी मघाशी म्हणालो की, मराठीसाठी या जातीचा, या मातीचा, या नात्याचा, या रक्ताचा सचिव असेल तरच मराठीला पुढे काही तरी स्थान मिळणार आहे. नाही तर आमचे आजचे भाषण सुध्दा वांझोटेच राहणार आहे. मराठीच्या बाबतीत यापूर्वी तेवीस वेळा चर्चा झाली आणि आजची ही चोवीसावी चर्चा होईल. हे शासन वेळ मारुन नेते. त्यांना माहीत आहे की, आपण निवडून येऊ शकतो. ते कसे निवडून येतात याची आम्हाला कल्पना आहे. शेतकऱ्यांच्या कितीही आत्महत्या होऊ द्या, दिवसाला दहा दहा शेतकऱ्यांचे मढे स्मशानात गेले तरी जाऊ द्या. लोकांना 500 ची नोट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

श्री. रामदास कदम ....

दिसली की, त्यांची मते तिकडे पडतात. त्याला इलाज नाही. लोकांना पोटाची खळगी भरावयाची असते.

सभापती महोदय, शासनाला जेव्हा जाग येते तेव्हा मराठीचे घोडे गंगेत न्हाते असे म्हटले तर ते चुकीचे होईल असे मला वाटत नाही. आता शासनाला जाग आली आहे. आज शासनाला जाग आली असली तरी मराठीचे घोडे गंगेत न्हाईल असे मला तरी वाटत नाही. कारण झोपलेल्याला जागे करु शकतो पण झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करु शकत नाही. अशी या शासनाची अवस्था आहे. झोपेचे सोंग घेतलेले हे शासन आहे. या सभागृहामध्ये आम्ही बेंबीच्या देठापासून कितीही ओरडलो तरी ही सगळी चर्चा वांझोटीच राहणार आहे याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. कारण त्यांना शेवटी मते हवी असतात. निवडणुका जिंकावयाच्या असतात. मुख्यमंत्रीपद मिळवावयाचे असते. लालदिव्याची गाडी हवी असते. मग मराठीचे नाव घेतले तर बाकीची मते कशी मिळतील ? मतांच्या लाचारीसाठी, आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी या महाराष्ट्रातील मराठी माणसाला संपविण्याचे काम या शासनकर्त्यांनी केले आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, समाजाचा विकास हा भाषेतून होत असतो. जोपर्यंत आमची मराठी भाषा, आमची मराठी मायबोली शासनाच्या नसानसात येत नाही तोपर्यंत माझ्या महाराष्ट्राचा, या मराठी भाषेचा, मराठी माणसाचा विकास होईल असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांना विचारु इच्छितो की, आपण नॉन-व्हेज खाता काय ? आपण खात नाही हे मला माहीत आहे. परंतु मी मुद्दाम विचारतो. राम गणेश गडकरी हे मराठी नव्हते. सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजरार्थी यांच्याबद्दल मला फार आदर वाटतो. आपण विधानसभेचे अध्यक्ष असताना मी तुमचे काम पाहिले आहे. आपल्या मराठीतील ओव्या ऐकल्या आहेत, कविता ऐकल्या आहेत. मराठी भाषा ही केवळ मराठी माणसांची नाही. राम गणेश गडकरी हे मराठी नव्हते, तरीही त्यांनी मराठी भाषेवर प्रभूत्व गाजविले. मराठी भाषा ही एका व्यक्तीची, एका समाजाची, एका जातीची होऊ शकत नाही. महाराष्ट्रात राहणा-या प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे या भावनेतून याठिकाणी काम करीत असू तर त्यात चूक काय आहे ? भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर प्रत्येक राज्यामध्ये त्याची अंमलबजावणी झाली. कर्नाटक राज्यामध्ये गेल्यावर तेथे मराठी भाषेतून सोडा हिंदीतून बोलून दाखववे. तेथे एका तरी रेल्वे स्टेशनवर हिंदीतून पाटी लावल्याचे उदाहरण दाखववे. एकही उदाहरण दिसणार नाही. फक्त महाराष्ट्रामध्ये केवळ मतांच्या लाचारीसाठी हे लाड करण्याचे काम व पाप हे महाराष्ट्र शासन करीत आहे. राम गणेश गडकरी यांचे मुद्दाम उदाहरण दिले त्याचे कारण असे की, मराठी भाषेचे ते सम्राट झाले. मराठी नसलेला माणूस देखील मराठी भाषेचा सम्राट होऊ शकतो हे या महाराष्ट्रामध्ये राम गणेश गडकरी यांच्या माध्यमातून आपणा सगळयांना पहावयास मिळते. म्हणून मी मघाशी म्हटले की, मराठी भाषा कोणाच्या वंशाची नाही, कोणत्या जातीची नाही वा धर्माची नाही असे न वाटता ती भाषा आपली आहे असे महाराष्ट्रात राहणा-या प्रत्येकाला वाटले पाहिजे अशी भूमिका घेतली तर ती चुकीची आहे असे मला वाटत नाही. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मराठी भाषा बंधनकारक केली पाहिजे, परंतु शासनाने तसे केलेले नाही, त्याऐवजी इंग्रजी ही भाषा बंधनकारक केली आहे. हे महाराष्ट्रात घडत आहे. कोणत्याही जातीचा, धर्माचा, वंशाचा माणूस असला तरी त्याला मराठी ही माझी आहे, अशी आस्था, आदर वाटला पाहिजे. त्याप्रमाणे कामगिरी करण्याची जबाबदारी शासनाची असते आणि ती कामगिरी पार पाडण्यामध्ये शासनाने कसूर केलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, आता केंद्र सरकारने फेरीवाल्याबाबत धोरण आणलेले आहे. केंद्र शासनाने राज्य शासनाला फेरीवाल्यांसंबंधी धोरण निश्चित करण्यासाठी एक महिन्याचा अवधी दिलेला आहे. माझी शासनाला विनंती नाही तर मी हक्काने सांगतो की, या मुंबई नगरीमध्येच नाही तर या राज्यात जेवढया नगरपालिका व महानगरपालिका आहेत. त्या सर्व नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये ज्या ज्याठिकाणी फेरीवाल्यांसाठी धोरण निश्चित करावयाचे असेल तर त्यामध्ये 80 टक्के मराठी माणसांचे हित लक्षात घेऊन धोरण निश्चित करावे. या मुंबई शहराची कोणी वाट लावली आहे ? एका विशिष्ट समाजाचे लोक मुंबईत येतात आणि दुस-या दिवशी धंदा करण्यासाठी फूटपाथवर बसतात. फूटपाथ त्यांच्या बापाची झाली आहे. त्यांच्याच मालकीची फूटपाथ झाली आहे. मुंबईतील सर्व फूटपाथ या लोकांनी व्यापून टाकली आहे. मग फूटपाथ कशासाठी असते ? मुंबईतील एक तरी फूटपाथ दाखवावी ज्याठिकाणी या विशिष्ट समाजातील लोक बसलेले नाहीत. काल आलेला उत्तर भारतीय या फूटपाथवर आलेला दिसतो. मी मुंबईत लहानाचा मोठा झालो आहे. हे लोक संपूर्ण वर्षभर मुंबईत पैसा कमवितात आणि काही दिवसांसाठी दुस-या उत्तर भारतीयाला ती जागा भाडयाने देऊन कमविलेले पैसे देण्यासाठी गावाला जातात. त्यासाठी त्याच्याकडून दोन महिन्याचे भाडे घेतले जाते. ती जागा मात्र महानगरपालिकेच्या मालकीची आहे. ही मुंबईची आजची अवस्था आहे. जर त्यांना हटविले तर एका विशिष्ट समाजाचे नेते माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी जातात आणि आमच्यावर अन्याय झाला, आमच्या समाजावर अन्याय झाला अशी ओरड करतात. या मुंबईत काय चालले आहे ? फूटपाथ लोकांना चालण्यासाठी बनविली आहे की तुमच्यासाठी बनविली आहे ?

सभापती महोदय, मी काल देखील सांगितले होते की, खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये 5 लाख सुरक्षा रक्षक आहेत, त्यापैकी 2 लाख सुरक्षा रक्षक परप्रांतीय आहेत. या सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यासाठी काही अटी व शर्थी घातलेल्या आहेत. त्यामध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, 15 वर्षे महाराष्ट्रात अधिवास असल्याचा दाखला द्यावा लागेल. तुम्ही नॉन क्रिमिलेअर आहात त्याचा दाखला द्यावा लागेल. या अटी न पाळता काल आलेला एखादा उत्तर भारतीय दोन हजार रुपयांची नोकरी सुरु करतो आणि डोक्यावर टोपी घालून हातामध्ये दांडा घेऊन गेटवर उभा राहतो.

यानंतर श्री.शिगम.....

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

सुरक्षा रक्षकाला किमान वेतन दिले जाते. कुठून तरी आलेल्या माणसाला 2 हजार रुपयावर नोकरी मिळते. मग मराठी माणसाला नोकरी कशी मिळणार ? म्हणून माझी मागणी आहे की, खाजगी सुरक्षा मंडळामध्ये 2 लाख परप्रांतीय आहेत. त्यांची हे शासन चौकशी करणार आहे काय ? हे सुरक्षा रक्षक कोठून आलेले आहेत, ते कोठले गुंड आहेत, त्यांनी किती मर्डर केलेल्या आहेत, याची चौकशी हे शासन करणार आहे की नाही ? आज अनेक ठिकाणी चो-या होत आहेत. हे जे दोन लाख परप्रांतीय सुरक्षा रक्षक म्हणून ठेवलेले आहेत ते नियमाप्रमाणे ठेवलेले आहेत काय ? त्यांना बाजूला काढून तेथे मराठी तरुणांना नोकरी द्यावी अशी माझी मागणी आहे. महाराष्ट्र शासनाने सुरक्षा रक्षक मंडळ काढले. आज मुंबईमध्ये 45 हजार सुरक्षा रक्षकांची मागणी आहे आणि मराठी मुले नोकरीसाठी धडपडत आहेत. महाराष्ट्र शासनाने काढलेल्या सुरक्षा रक्षक मंडळामध्येही भ्रष्टाचार होत आहे. मोठ्या ए.सी. कार्यालयामध्ये आणि घराजवळ सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळण्यासाठी तीन-तीन हजार रुपये घेतले जात आहेत. भ्रष्टाचार करणा-यांची नावे देखील मी शासनाला दिलेली आहेत.

सभापती महोदय, ही मुंबई महाराष्ट्राला सहज मिळालेली नाही. त्यासाठी महाराष्ट्राला 106 हुतात्म्यांचे बलिदान द्यावे लागले. पण आज परिस्थिती अशी आहे की मुंबई आज परप्रांतीयाकडे गेलेली आहे आणि मराठी माणूस हा मुंबई बाहेर फेकलेला आहे. तरी देखील आम्ही शांत बसायचे काय ? माननीय शिवसेना प्रमुख सांगत होते की लोकांचे लोंढे थांबवा, मराठीला आणि मराठी माणसाला न्याय द्या. आज राज्याचे ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील हे देखील सांगत आहेत की, लोंढे थांवा नाही तर उद्या कृपाश्ंकर सिंह सारखा माणूस मुख्यमंत्री होईल.

श्री.सय्यद जमा : अगर कृपाशंकर सिंह मुख्यमंत्री बनते है तो उसमें खराबी क्या है ?

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हमारे नेता का नाम ले रहे है. श्री. कृपाशंकर सिंह मुख्यमंत्री बनते है तो उसमें गलत क्या है. वे मराठी है. जो महाराष्ट्र में रहता है वह मराठी है. इसलिये श्री.कृपाशंकर सिंह का नाम कार्यवाही से निकाल दिया जाए.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्या बोलण्याचा अर्थ समजून घ्यावा. कोणी तरी कृपाशंकर सिह येईल आणि येथे मुख्यमंत्री होईल असे राज्याचे ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील यांनी म्हटलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी : मैं भी मराठी हूं. श्री.कृपाशंकर सिंह महाराष्ट्र के नेता है. हमारे नेता है. माननीय श्रीमती सोनिया गांधी उन्हें मुख्यमंत्री बनाएगी तो वे मुख्यमंत्री बनेंगे. किसकी हिम्मत है उन्हें मुख्यमंत्री बनने से रोकने की ?

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना भाषणाच्या माध्यमातून बोलता येईल. सन्माननीय सदस्य मराठीतून बोलण्याऐवजी हिंदी भाषेतून का बोलत आहेत?

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : माझी मातृभाषा मराठी आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना कृपया खाली बसावे. वारंवार उठून बोलण्याचा ते प्रयत्न करीत आहेत हे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद ज़मा यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला असल्यामुळे मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपला हरकतीचा मुद्दा मांडावा.

श्री.सय्यद ज़मा :सभापति महोदय, मराठी भाषा के विकास के लिए राज्य शासन ने स्वतंत्र विभाग की स्थापना की है और 10 करोड़ रुपये की तरतूद की है. इसी विषय से संबंधी यह प्रस्ताव है और इस पर चर्चा हो रही है. हम यह सुनना चाहते हैं कि मराठी भाषा को कैसे आगे बढ़ाना चाहिए. सम्माननीय सदस्य बोल रहे हैं. हम सुन रहे हैं. यह प्रस्ताव मराठी भाषा की प्रगति के बारे में है. सम्माननीय सदस्य रोजगार पर बोल रहे हैं, सुरक्षा रक्षकों के बारे में बोल रहे हैं. मराठी भाषिक इतनी संख्या में है, गैर मराठी इतनी संख्या में है. मैं यह कहना चाहता हूं कि अभी इस विषय पर चर्चा नहीं हो रही है. आप मराठी भाषा के विकास के बारे में कहिए. दूसरी बात यह है कि माननीय मुख्यमंत्री ने यह स्पष्ट कर दिया है कि इस देश का नागरिक कहीं भी जा सकता है. इस बात पर चर्चा करनी है तो अलग से बोलिए. लेकिन इस प्रस्ताव के संबंध में उसके बारे में मत बोलिए क्योंकि यह मराठी भाषा के विकास का विषय है.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सभापती महोदय, आपल्या माध्यमातून एक गोष्ट मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी भाषण करीत असताना आमदार श्री.कृपाशंकर सिंह यांचे नाव घेतलेले नाही. सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी 'कोणीतरी एखादा कृपाशंकर येईल आणि या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होईल' असे स्टेटमेंट केलेले आहे. हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे. आमदार श्री.कृपाशंकर सिंह हे माझे मित्र आहेत, आपल्या सर्वांचे मित्र आहेत. परंतु मी ज्या स्टेटमेंटचा उल्लेख केला ते माझे शब्द नसून माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी केलेले स्टेटमेंट आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी सांगितले ते खरे आहे. घटनेच्या कलम 19(1) मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, कोणताही माणूस महाराष्ट्रात कुठेही येऊन राहू शकतो. परंतु घटनेच्या कलम 19(2) मध्ये काय म्हटले आहे? कलम 19(2) मध्ये असे म्हटले आहे की, कोणताही माणूस देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात गेला तरी तेथील स्थानिकांवर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी त्याने घेतली पाहिजे. घटनेच्या कलम 19(1) चा वारंवार दाखला दिला जातो. परंतु कलम 19(2) मध्ये जे म्हटले आहे त्याचा संदर्भ दिला जात नाही. त्याठिकाणी जाऊन स्थानिकांवर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे असे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. आज महाराष्ट्रातील स्थानिक नागरिकांवर अतिक्रमण झालेले आहे. या शहरामध्ये परप्रांतीयांचे प्रमाण 58 टक्के इतके झालेले आहे. मला घटनेची माहिती आहे. घटनेबाबतचा मी अभ्यास केलेला आहे.

सभापती महोदय, 50 वर्षापूर्वी मुंबई मिळविली ती सहजपणे मिळालेली नाही. मराठी माणसांनी, माननीय शिवसेनाप्रमुखांनी, शिवसेनेने प्रचंड लढा दिला, संघर्ष केला, 105 हुतात्मे दिले तेव्हा ही मुंबई या राज्याला मिळाली.

सभापती महोदय, राज्य शासनाने मराठी भाषेचा विकास व्हावा म्हणून स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली त्यामुळे आम्हाला समाधान वाटले. माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यावेळी मुंबई शहरामध्ये 50 हजार नवीन टॅक्सी परवाने देण्याचा निर्णय घेतला.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 2 यू.1...

श्री. रामदास कदम .......

तेव्हा टॅक्सी परवाने देण्यासंबंधीचा जो कायदा आहे, जो नियम आहे त्यातील कलम 4 (2) आणि कलम 24 (1) नुसार मराठी भाषा येणे आवश्यक आहे असे असेल तरच परवाना दिला पाहिजे. परंतु हा नियम बाजूला ठेवून असे परवाने देण्यात आले. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी पत्रकार परिषद घेऊन ज्यांना मराठी भाषा येते त्यानाच असे परवाने देण्यात येतील असे सांगितले होते. पण दुसऱ्याच दिवशी दिल्लीहून फतवा आला तेव्हा मात्र मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट बदलले आणि ज्याला गुजराथी आणि हिंदी भाषा येईल त्यांना परवाना देण्यात येईल असे स्टेटमेंट केले, याचा अर्थ काय आहे ? एका बाजूला शासनच सांगते की मराठीचा विकास करण्यासाठी स्वतंत्र खाते आपण तयार करीत आहोत आणि दुसऱ्या बाजूला मात्र 50 हजार टॅक्सीधारकांना परवाने देण्याची वेळ येते तेव्हा मात्र भूमिकेत बदल होतो. कुठे छत्रपती शिवाजी महाराज आणि कुठे हे सरकार ? "महाराष्ट्र मेले तर राष्ट्र मेले, मराठ्याविना हा गाडा न चाले, कर हा अधिन पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा" असे शिवाजी महाराज म्हणाले होते. पण आज या शासनाची भूमिका काय आहे हे आपल्याला दिसून येत आहे. शिवाजी महाराज दिल्लीश्वराला घाबरले नाहीत, त्यांच्यासमोर वाकले नाहीत आणि आम्ही मात्र दिल्लीसमोर नुसतेच वाकत नाही तर वाकून आमच्या पायाची सालं जाऊ लागली, अशी अवस्था आहे. अशा प्रकारे क्षणाक्षणाला जर शासन निर्णय बदलत असेल तर ते योग्य नाही. जाता जाता एवढेच सांगणार आहे की, "मराठी ज्ञानेश्वरीची कवच कुंडले आहेत, पण मराठीसोबत शिवसेनेची तलवार देखील आहे" हे विसरता कामा नये. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये ही चर्चा सभागृहात उपस्थित केली आहे. त्यात सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे की राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांत तसेच राज्याच्या एकंदरित सर्वच कार्यालयांमध्ये मराठीचा 100 टक्के वापर करण्याची बाब राज्य शासनाने प्रस्तावित मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता आहे. आणि पुढे त्यांनी दोन मागण्या केल्या आहेत की शासनाच्या सर्व स्तरावरील कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणे आणि दुसरी बाब सांगितली आहे की, त्यांच्या सेवा पुस्तिकेत त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. उशिरा का होईना पण शासनाने यासंबंधीचा निर्णय घेतला. मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासाठी स्वतंत्र व वेगळा विभाग स्थापन करण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल शासनाने उचलले आहे. त्यानंतर देखील आपल्या अपेक्षा भरपूर आहेत. केवळ आपण यासाठी स्वतंत्र विभाग केला आणि तयासाठी 10 कोटी रुपये दिले म्हणजे काम संपले अशातला भाग नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, कर्नाटक राज्याने या कामासाठी 550 कोटी रुपये दिले, केरळ राज्याने 300 कोटी रुपये दिले. मला वाटते हा प्रश्न केवळ निधीशी निगडित नाही तर मराठीचा विकास व संवर्धन कशा पध्दतीने करता येईल याचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण मराठी भाषा ही एक समृध्द, संपन्न, सुलभ, सोपी भाषा, साहित्याची भाषा, रंग भूमीची भाषा आहे. हिंदुस्थानमध्ये बंगाली आणि मराठी या दोन भाषा रंग भूमीच्या भाषा असल्याचे बोलले जाते. समृध्द, संपन्न अशी रंग भूमी या दोन भाषांमधूनच आहे. म्हणून शौर्याची तसेच धैर्याची भाषा म्हणून मराठी भाषा समजली जाते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

पूर्ण विकसित अशी ही भाषा आहे. त्यामुळे या भाषेच्या संदर्भातील शासनाची आणि समाजाची जबाबदारी अत्यंत महत्वाची आहे. संत ज्ञानेश्वर माऊलीने मराठी भाषेच्या संदर्भात म्हटले आहे की,

**"माझा मराठाची बोल कौतुकें ।**

**परी अमृतातेंही पैजा जिंके ।**

**ऐसी अक्षरे रसिले । मेळवीन ॥**

**मेळवीन**

मी आपल्याला सांगू इच्छितो की, भाषा म्हणजे केवळ शब्दांची देवाणघेवाण नाही तर भाषा म्हटल्यानंतर भावना, संस्कार,संस्कृती या बाबी अत्यंत महत्वाच्या असतात. जर भाषा नष्ट झाली तर महाराष्ट्राची संस्कृती नष्ट होऊ शकते. भाषेचा केवळ शब्दांशी संबंध नाही. शब्द म्हणजे भाषा नाही.

शब्दांना नसते दु:ख, शब्दांना सुखही नसते,

ते वाहतात ओझे ते, तुमचे-माझे असते.

शब्दाच्या पाठीमागचा विचार, शब्दाच्या पाठीमागची भावना, शब्दाच्या पाठीमागचा संस्कार आणि शब्दाच्या पाठीमागची संस्कृती ही फार महत्वाची असते. मराठी संस्कृती या देशात निर्माण करण्याचा प्रयत्न मागच्या काळात झाला परंतु तो अजून वाढला पाहिजे यादृष्टिकोनातून आजची ही चर्चा आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, मराठी भाषेच्या संदर्भात पहिली जबाबदारी शासनाची आहे, त्यानंतर समाजाची व त्यानंतर आपल्या सारख्यांची जबाबदारी आहे. मला या निमित्ताने माधव ज्युलियंनांच्या दोन ओळी आठवतात. त्यावेळी आपण पारतंत्र्यांत होतो. त्यांनी म्हटले होते की,

"मराठी असे आमुची मायबोली, जरी ती आज राज भाषा नसे".

परंतु मागच्या काही दिवसापूर्वी मला एक कविता वाचावयास मिळाली त्यामध्ये असे म्हटले होते की,

"मराठी नसे आमुची मायबोली जरी ती आज राज भाषा असे".

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

मराठी ही राजभाषा आहे. पण आज ती आमची मायबोली नाही. याचा विचार करण्याच्या संदर्भातील ही कविता आहे. आपल्या राज्याला 60 वर्षे झालेली आहेत. त्यामुळे मराठीच्या संदर्भात शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मी पूर्वी सामान्य प्रशासन विभागाचा राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. आज प्रा.फौजिया खान या खात्याच्या राज्यमंत्री आहेत.

सभापती महोदय, शासन निर्णयाला आपण जीआर म्हणतो. लोकांना शासन निर्णय शब्द कळत नाही परंतु जीआर शब्द अधिक कळतो. ज्या भागाचे मी प्रतिनिधीत्व करतो त्या ठिकाणी आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहेत. आमचा आदिवासी म्हणतो, "आम्हाला जीआर प्राप्त झ ाालेला आहे, जमीन आमच्या मालकीची होणार आहे". आपला शासन निर्णय कसा निघतो ? आपला शासन निर्णय क्लिष्ट आणि कठीण भाषेत निघत असतो. हा जीआर ज्याने लिहिलेला असतो त्याशिवाय दुस-या कोणाला त्याचा अर्थ समजत नाही. तुम्ही एखाद्या वकिलाकडे गेला आणि त्याला विचारले की, "या शासन निर्णयाचा अर्थ असा असा निघतो का"? तर वकील सांगतो होय तसाच निघतो". आपण दुस-या वकिलाकडे गेलो आणि त्याला विचारले की, "या शासन निर्णयाचा अर्थ असा निघत नाही ना" ? तर तो वकील म्हणतो "अजिबात तसा अर्थ निघत नाही." आपल्या जीआरमध्ये "ज्या अथी असे असे असे आहे त्या अर्थी तसे तसे तसे आहे" असे म्हटलेले असते. आपल्या शासन निर्णयाची भाषा आपण सुधरवणार आहेत की, नाही ? शासन निर्णयाची भाषा आपण सोपी करणार आहोत की, नाही ? शासन निर्णयाची भाषा जनतेला समजेल या दृष्टिकोनातून पुढील शासन निर्णय निघतील की, नाही ? याला मी महत्वाचा भाग मानतो. आपण मराठी भाषेतून विधेयक मंजूर करतो परंतु कोणताही वकील मराठी भाषेचे विधेयक हातात घेऊन सल्ला देत नाही. वकिलाच्या हातात इंग्लिश बीलच असते. मला वाटते हा आपला पराभव आहे. मराठी विधेयक हातात घेऊन बोलणारा वकील आणि मराठी विधेयक आपल्या टेबलासमोर ठेवून निर्णय देणारा न्यायाधीश अशी आजची परिस्थिती आहे. मराठी भाषेला न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून कार्य करणे हा महत्वाचा भाग आहे. शासकीय पातळीवर मराठीला पूर्ण पाठिंबा, मराठीचे रक्षण, संरक्षण, संवर्धनाची जबाबदारी निश्चितपणे आपण पार पाडली पाहिजे.

आज मराठीवर इंग्रजीचे अतिक्रमण झालेले आहे. इंग्रज गेले परंतु ते इंग्रजी सोडून गेले. एकमेकांशी बोलतांना आपण 100 शब्द वापरले तर त्यामध्ये किमान 10 ते 15 शब्द इंग्रजीचे येतात.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी....

हे अतिक्रमण आपण थांबविणार आहात की नाही ? यात शासनाचा काहीही संबंध नाही. मराठी भाषेवरील अतिक्रमण थांबविणे ही शासनाची जबाबदारी नाही. मराठीमध्ये बोलताना किमान एखाद-दुसरा इंग्रजी शब्द चुकून आला तर ते समजू शकतो. आताच सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी पुण्यातील मराठी संबंधीचे उदाहरण दिले. ते म्हणाले की, "फ्रेश होऊन वॉश घेऊन येते" अशा प्रकारे मराठी भाषा बोलली जाते. ही काय मराठी भाषा आहे ? आज आपण इंग्रजी भाषेला एवढी प्रतिष्ठा का देत आहोत ? माझे तर ठाम मत आहे की, महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेला इंग्रजीपेक्षा जास्त प्रतिष्ठा दिली पाहिजे. नव्हे ती काळाची गरज आहे. नुकतेच आता कोणी तरी सांगितले की, इंग्रजी-मराठी, इंग्रजी-हिंदी या भाषेमुळे इंग्रजी भाषा आता इंग्रजी राहिली नसून हिंग्लीश भाषा झाली आहे. ही भेसळ भाषा आहे. आपण सर्वांनी मिळून ही शब्दाची भेसळ थाबवू या. शब्दांची भेसळ झाली की, विचारांची भेसळ होते. ज्याची भाषा शुद्ध, त्याचा विवेक देखील शुद्ध असतो. शुद्ध मराठी भाषेत बोलण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. इंग्रजी भाषेच्या शाळांना आपण अनुदान देत नाही. पण आज एकेका तालुक्यात 10 ते 15 इंग्रजी माध्यमाच्या शाळा झालेल्या आहेत. पाच हजारची वस्ती असेल तेथे देखील आज इंग्रजी माध्यमाच्या शाळा होत आहेत. या शाळांना अनुदान दिले जात नाही, याचा विचार करावा. अनुदान न देता इंग्रजी शाळांची संख्या वाढत आहे. याच्या उलट मराठी शाळा बंद पडत आहेत. मराठी माध्यमांच्या शाळा अनुदानावर चालतात. आज जिल्हा परिषदेच्या शाळांची अशी अवस्था आहे की, त्या शाळेत विद्यार्थीच नाही. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थी शोधून आणावे लागत आहेत. ग्रामीण भागातील शेवटच्या भागापर्यंत इंग्रजी भाषा गेली आहे. ती थांबविण्याची जबाबदारी आपली आहे. घरात काम करणारा माणूस म्हणतो माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातो. टॅक्सी ड्रायव्हर म्हणतो माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आहे. कोणीही येते आणि आम्हाला इंग्रजीमध्ये शिवी देऊन जाते म्हणून मी मुलाला इंग्रजी शाळेमध्ये टाकले असे त्याने सांगितले. कुठल्या भाषेमध्ये शिवी नाही ते सांगा. प्रत्येक भाषेमध्ये शिवी आहे. शिवी ही एक संस्कृती आहे. मारल्यानंतर माणूस सुधारत नाही. पण शिवी दिल्यानंतर माणसामध्ये ऊर्जा निर्माण होते. आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी....

ग्रामीण भागातील मुले सुद्धा इंग्रजी भाषेच्या शाळेमध्ये जात आहेत. ही फार मोठी चिंतेची बाब आहे. हिंदू, इस्लाम, जैनसह अनेक धर्मियांची मातृभाषा आता इंग्रजी होत आहे. त्यामुळे आता भाषे बाबत वेळीच जागृत होणे ही काळाची गरज आहे. असे जरी असले तरी शासनाने आता चांगला निर्णय घेतला आहे. पण त्याच्या अंमलबजावणीकडे निश्चितपणे लक्ष दिले पाहिजे. संपूर्ण शिक्षण इंग्रजीमध्ये झाले तर त्याला संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम महाराज कळणार नाही. एवढेच नव्हे तर त्याला संस्कृती देखील कळणार नाही.

ऊस डोंगा परी
रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया रंगा

या दोन ओळीमध्ये आपल्याला सर्व काही कळेल.

तहाने तहानेची प्यावी
भुकेल्या भुकेची खावी
अहोरात्र व्हावी मवा मवाळा....

हे समजले नाही तर मराठी संस्कृती कशी टिकेल. मराठी माणूस टिकणे ही वेगळी बाब आहे आणि संस्कृती टिकणे ही वेगळी बाब आहे. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी, विकासासाठी प्रयत्न केला पाहिजे. जो कधीही पूर्ण होत नाही त्याला विकास म्हणतात. त्या संबंधातील पाऊल उचलले पाहिजे.

यानंतर श्री.अजित...

अध्यापन प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

मराठी भाषा ही व्यापार उद्योगाची भाषा झाली पाहिजे. मराठी भाषा ही माहिती तंत्रज्ञान विज्ञानाची भाषा झाली पाहिजे. मराठी भाषा ही संगणकाची भाषा झाली पाहिजे आणि ही जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही. यासाठी कितीही निधी लागला तरी तो दिला पाहिजे. संगणक मराठीमध्ये नाही, माहिती तंत्रज्ञानाची भाषा मराठी नाही.

सभापती महोदय, आता एक वेगळी भाषा निर्माण झाली आहे. जी मराठी भाषा नाही आणि इंग्रजी भाषाही नाही, अशी एक वेगळी भाषा निर्माण झालेली आहे. मी माझ्या ठाणे येथील मित्राकडे गेलो होतो. तो सी.ए.आहे. त्यांचा छोटा मुलगा 7-8 वर्षाचा असेल, त्याने मला विचारले आपल्याला आय.टी.वगैरे कळते काय ? मी त्याला सांगितले, इतके काही कळत नाही,पण अमुक मला कळत नाही हे मला कळते. त्या मुलाने मला विचारले की, मला संडासला त्वरेने जायचे आहे हे आय.टी.भाषेत कसे सांगाल ? मी त्याला सांगितले मला सांगता येणार नाही. तर तो मुलगा मला म्हणाला www immediate toilet.com. ही कोणती भाषा झाली ? ही जर तंत्रज्ञानाची भाषा असेल तर मराठीत सुध्दा याच पध्दतीची तंत्रज्ञानाची भाषा निर्माण करणे ही आजची गरज आहे. त्यादृष्टीने आपण सामुदायिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी पाच-सहा सूचना करणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठात मराठी विकास आणि संशोधन केंद्राची स्थापना झाली पाहिजे. त्यासाठी कितीही निधी लागला तरी हरकत नाही. महाराष्ट्रात असे एकही विद्यापीठ असता कामा नये की ज्याठिकाणी मराठी विकास आणि संशोधन केंद्र नाही. माझी दुसरी सूचना आहे की, जागतिक दर्जाची मराठी उच्च श्रेणीची माध्यमिक शाळा किमान प्रत्येक जिल्ह्यात पुढील वर्षापासून सुरु केली पाहिजे. तिसरी सूचना, मराठी चित्रपट निर्मितीसाठी अनुदान वाढवून देण्यात यावे. आता किती अनुदान देण्यात येते याची मला माहिती नाही. मी जेव्हा सांस्कृतिक कार्य विभागाचा मंत्री होतो त्यावेळी 40-50 हजार रुपये दिले जात होते. आपण अशातऱ्हेचे मराठी चित्रपट निर्माण केले पाहिजे की त्याचे इतर भाषेमध्ये भाषांतर झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांची अशी सूचना आहे की, मराठी चित्रपटांची भाषा मराठी असली पाहिजे. मराठी चित्रपटाचे नाव मराठी असले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

चौथी सूचना -प्रत्येक महाविद्यालयामध्ये मराठी वाड.मय मंडळ असले पाहिजे. सरकारने या मराठी वाड.मय मंडळाला थेट निधी दिला पाहिजे. आपण मराठी वाड.मय सुरु केले नाही तर भाषेची समृध्दी वाढणार कशी ? तेव्हा यासाठी शासनाने सढळ हाताने निधी दिला पाहिजे. पैशाशिवाय काही होत नाही. निधीची पूर्तता ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. मराठी पुस्तकांचे भाषांतर इतर भाषेत होण्यासाठी अनुदान दिले पाहिजे. मराठी भाषेचे साहित्य श्रीमंत आहे. हे साहित्य बंगाली, हिंदी आणि इतर भाषेत भाषांतरीत झाले पाहिजे. ही भाषांतरे परदेशात जात असतील तर चांगलेच आहे. मराठी ही विश्व भाषा आहे. हिथ्रो विमानतळावर देखील आपणास मराठी भाषिक दिसतात. आपण अमेरिका किंवा न्यूयॉर्कला गेल्यास त्याठिकाणी मराठी भाषिक दिसतात. आपणास असे वाटते की, आपण महाराष्ट्रात आहोत. मराठी ही विश्व भाषा आहे. तेव्हा ही विश्व भाषा निर्माण करण्याकडे आपण कर्तव्य म्हणून त्याकडे पाहू या.

सभापती महोदय, त्रि भाषेचे सूत्र राबवित असताना मराठी भाषेची कुठेही गळचेपी होणार नाही हे पाहणे आपली जबाबदारी आहे. आपल्या मातृभाषेला तितकेच महत्व दिले पाहिजे. एक समज वा गैरसमज आहे. आपले इंग्रजी उत्तम नसेल तर आपणास नोकरी मिळत नाही. कदाचित मंत्रालयात नोकरी मिळेल, परंतु खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही हा एक समज झालेला आहे म्हणून प्रत्येक जण इंग्रजी भाषेच्या पाठीमागे लागलेला आहे. सर्वांना असे वाटते की, आम्हाला इंग्रजी आले तर नोकरी मिळेल. खलील जिब्रानने असे म्हटले आहे की," माझ्या आईने मला मातृभाषेत शिक्षण दिले म्हणून मी मोठा झालो." विनोबा भावे यांनी म्हटले आहे की, " मुलांना मातृभाषेत शिक्षण द्या". महात्मा गांधीनी म्हटले आहे की, "अंकगणित,भूमिती,बीजगणित, रसायन हे विषय इंग्रजीमध्ये शिकावे लागले म्हणून माझा शैक्षणिक कालावधी वाढला." इंग्रजी भाषेमध्ये शिक्षण घेतले म्हणजे गुणवत्ता येते असे नाही. उलट आपण मातृभाषेत शिक्षण घेतले तर गुणवत्ता वाढते. कारण पोटात असल्यापासून त्या भाषेचे संस्कार आपल्यावर असतात.

यानंतर श्री.गायकवाड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ..

सहकार क्षेत्रामध्ये 100 टक्के मराठीचा वापर केला जातो असे असतांना शासनाच्या कारभारामध्ये 100 टक्के मराठीचा वापर का केला जात नाही ? सहकार क्षेत्रात मराठी व्यतिरिक्त इंग्रजीचा वापर केला जातो असे मला वाटत नाही. एखादी जागतिक पातळीवरील बाब असेल वा निविदा प्रसिध्द करावयाची असेल तर तेवढया पुरताच इंग्रजीचा वापर केला जातो त्या व्यतिरिक्त मराठीचाच वापर होत असतो.

सभापती महोदय, दुकानदार कोणाची भाषा बोलत असतो ? दुकानदार ग्राहकाची भाषा बोलत असतो म्हणून त्याचे दुकान चालत असते. जर दुकानदार ग्राहाकाची भाषा बोलत असेल तर सरकारने सुध्दा जनतेचीच भाषा बोलली पाहिजे. ज्या भाषेमध्ये जनता बोलते त्याच भाषेमध्ये सरकारनेसुध्दा बोलले पाहिजे. मग ती भाषा वैदर्भीय आहे, व-हाडी आहे, खानदेशी आहे अहिराणी आहे , कोकणी आहे याचा विचार होता कामा नये मराठी भाषेचेच हे लहान लहान भाग आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी दोन तीन दिवसापूर्वी असे सागितले होते की, दर पंधरा किलोमिटरवर भाषा बदलत असते. परंतु असे असले तरी त्या भाषेचा आत्मा मराठीचाच असला पाहिजे व त्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असतांना मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास एक बाब आणून देणार आहे . केवळ इंग्रजीचे आपल्यावर अतिक्रमण झ्ालेले आहे अशातला भाग नाही तर इंग्रजीबरोबर हिंदी भाषेचेसुध्दा अतिक्रमण झालेले आहे. त्याचबरोबर पंजाबी भाषेचे अतिक्रमण देखील झालेले आहे. काही वर्षापूर्वी आपल्याला "ढाबा" हा शब्द माहीत नव्हता . परंतु "ढाबा" हा पंजाबी शब्द आपल्यामध्ये आला आहे. पजांब मधील पदार्थाबरोबरच हा शब्द आपल्याकडे आला आहे अगोदर पंजाबची खाद्यसंस्कृती आपल्याकडे आली होती आणि त्या नंतर ढाबा हा शब्द आला आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी मघाशी संगणकाच्या बाबतीत जो मुद्दा मांडला आहे त्यानुसार मराठी संगणकाच्या दृष्टीकोनातून काम केले गेले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, एका विधेयकामध्ये "बॉम्बे" हा शब्द लिहिण्यात आला होता त्या ऐवजी "मुंबई" हा शब्द असावा म्हणून आपण अर्धा ते एक तास बोलला होता त्यानंतर ही बाब शासनाने मान्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी

केली होती. त्यामुळे ज्या ठिकाणी "बॉम्बे" हा शब्द लिहिला असेल त्या ठिकाणी "मुंबई "हा शब्द लिहिला गेला पाहिजे व ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी "महाराष्ट्र" हाच शब्द लिहिला गेला पाहिजे तसेच विक्रीकर विभाग, सेवा कर विभाग आणि न्यायालय इत्यादी ठिकाणी मराठीतूनच कारभार झाला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, देवनागरी लिपीचा आपल्याला एक फायदा आहे . मराठी आणि हिंदी या दोन भाषा सोडल्यास हिंदुस्थानातील इतर भाषांची लिपी मात्र वेगळी आहे. हिंदी आणि मराठीची एकच लिपी असून ती देवनागरी आहे. देवनागरी लिपीचा सुध्दा आपल्याला चांगल्या प्रकारचा फायदा मिळत असतो.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी सागितल्याप्रमाणे एखाद्या धर्माची ही भाषा असू शकत नाही. एखाद्या व्यक्तीचा धर्म हिंदू असला म्हणजे त्याची भाषा मराठी असली पाहिजे असे नाही. काही ख्रिस्ती बांधवसुध्दा चांगले मराठी बोलतात.कोकणातील मुस्लिम बांधव देखील चांगल्या प्रकारे मराठी बोलतात इतकेच नव्हे तर प्राचार्य पठाण उत्कृष्टपणे ज्ञानेश्वरी म्हणतात त्यामुळे एखाद्या धर्माशी भाषेचा विषंय जोडण्यात येऊ नये. राज्यामध्ये एक प्रकारची मानसिकता निर्माण झाली पाहिजे, राज्य शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यासाठी जादा निधी देण्याचे ठरविले आहे त्याप्रमाणे लवकरात लवकर या निर्णयाची अंमजबजावणी होण्यासाठी शासनाने जागरुकता ठेवली तर पुन्हा एकदा मराठीला चांगले दिवस येतील अशा प्रकारचा आशावाद आजच्या प्रसंगी व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---------

**( सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील(मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या विकासाच्या आणि सवर्धनाच्या संबंधीचा प्रस्ताव या ठिकाणी आणल्याबद्‌ल मी प्रथमत: त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांचे आभारही मानतो. मराठी भाषेच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते सतत मुद्दा मांडत असतात आणि वेगवेगळया संसदीय आयुधांच्या माध्यमातून मराठी भाषेचा आग्रह धरत असतात.

. सभापती महोदय, या विषयावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी या विषयाचे नेमके विश्लेषण केले आहे. या चर्चेच्या अनुषांगाने त्यांनी जे काही निष्कर्ष काढलेले आहेत त्याबाबतीत मतभेद असू शकतात परंतु मराठी भाषेच्या आजच्या -हासाला किंवा महाराष्ट्राच्या आजचा -हासाला शासनकर्ते जितके जबाबदार आहेत तितकेच मराठीचे राजकारण करणारेसुध्दा जबाबदार आहेत हे मला अत्यत नम्रतापूर्वक येथे सांगावयाचे आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नेमका मुद्दा मांडला होता की, तुम्ही मांसाहारी आहात म्हणून तुम्हाला आमच्या सोसायटीमध्ये जागा मिळणार नाही. परळ, लालबाग सारख्या मुंबईतील सर्व भागांमध्ये जी स्काय स्क्रॅपर उभी राहिली आहेत, ज्या गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या आहेत, त्याठिकाणी या पाटया लागल्या आहेत. येथील जमिनीवर, येथील माणसांवर आणि येथील भाषेवर जर कुणाचे आक्रमण असेल तर ते धनाढयांचे आहे. परंतु भाषेचे राजकारण करणारी मंडळी धनाढयांच्या विरोधात कधीच लढत नाहीत, त्यांचा हल्ला गरिबांवर असतो. आणि गरिबांमध्ये जेव्हा फूट पडते तेव्हा भाषेचे अंतिमत: नुकसान होत असते. कारण त्यांचे टारगेट चुकलेले असते. भाषेचे राजकारण करणाऱ्यांनी आपल्याच भाषेला अनेक कुंपणे घातली, त्याचा उल्लेख माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि श्री. अरुणभाई गुजराथी यांनी केला. आम्ही धर्माचे कुंपण घातले, आम्ही जातीचे कुंपण घातले. आपण याठिकाणी सहजपणे उल्लेख केला की, डॉ. यु. म. पठाण सुध्दा चांगल्याप्रकारे ज्ञानेश्वरी सांगतात. हे वाक्यच मुळात अतिशय वेदनाजनक आणि अपमानास्पद आहे. अरुणभाई हे मी आपल्याबद्दल बोलत नाही, आपण अत्यंत आत्मियतेने बोलता. म्हणजे माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे गुजराथी असले तरी मराठी चांगले बोलतात हा अरुणभाईंचा अपमान आहे. त्यांची मूळ भाषा जरी गुजराथी असली तरी त्यांची बोली भाषा मराठी आहे. शिवरायांनी रायगडावर राजधानी स्थापन केल्यानंतर अनेक गुजराथी कुटुंबे व्यापार उदिमांसाठी त्याठिकाणी आणली आणि वसविली. आणि म्हणून कै. अरुण मेहतांपासून ते माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथीपर्यंत सर्वांची बोली भाषा, रोजच्या व्यवहाराची भाषा, घरची आणि दारची भाषा मराठी आहे. अशाप्रकारची अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. महाराष्ट्रामध्ये पांडे नावाची अनेक कुटुंबे आहेत, त्यांची रोजची घरातील व्यावहारिक भाषा सुध्दा मराठी आहे. तीन-चारशे वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी जी माणसे बोलाविली, त्यांच्याबरोबर ही मंडळी आली असतील. परंतु आज ही मंडळी इथे रमली असून त्यांनी येथील मराठी भाषा आपली भाषा म्हणून स्वीकारली.

महाराष्ट्राचे वैशिष्टय असे आहे की, महाराष्ट्राने अनेक भाषांची निर्मिती केली आहे. चार प्रमुख भाषांची निर्मिती या महाराष्ट्राने केली आहे. मराठीची मातृभूमी जशी महाराष्ट्र आहे, त्याप्रमाणे दखनी बाज असलेल्या उर्दू भाषेची मातृभूमी सुध्दा महाराष्ट्रच आहे. कोकणीची मातृभूमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सुध्दा महाराष्ट्रच आहे आणि ज्या आदिवासींच्या गोंडी-माडीयासारख्या मूळ भाषा आहेत, त्यांची मातृभूमी सुध्दा महाराष्ट्र आहे. या आपल्या भाषा भगिनींशी आपले जे नाते आहे ते आम्ही भाषेच्या राजकारणामुळे तोडले. आणि म्हणून मराठीचे नुकसान झाले. ज्यावेळी भाषा धनाढयांच्या, सत्ताधाऱ्यांच्या शोषणाचे यंत्र बनते त्यावेळी ती आपोआप लोकांपासून, गरीबांपासून दूर जाते. मराठीला शोषणाचे यंत्र बनविण्यामध्ये येथील राज्यकर्त्यांना आणि येथील धनाढय वर्गाला यश मिळाले म्हणून मराठी भाषा ऱ्हासाला गेली. आणि गरीब मराठी माणूस हा आपल्याच भाषेपासून वंचित झाला. आज तो इंग्रजी शाळेकडे जायला मागत आहे, यामध्ये त्याचा दोष काय? जी भाषा दुसऱ्याला जगवीते, तीच भाषा जगते. मला जर इंग्रजी जगवीत असेल तर मी इंग्रजी कां स्वीकारणार नाही. मला जर उद्या मराठी जगवायला लागली तर आपोआप माझा ओढा मराठी शाळेकडे वाढेल. परंतु जाणीवपूर्वक आम्ही मराठीला संस्कृतच्या पिंजऱ्यामध्ये कोंडले. आणि आपोआप मराठीचा मूळ रस आम्ही हरविला. त्याचा उल्लेख माननीय श्री. अरुणभाईंनी वेगळया शब्दामध्ये केला. मराठीची स्वत:ची अंगभूत गुणवैशिष्टये होती ती सर्व आम्ही हरवून बसलो. आणि म्हणून सरकारी मराठी दुर्बोध बनली. ती सर्वसामान्यांना अजिबात समजत नाही. आमचे जी.आर. आमचे शासकीय निर्णय निर्गमित होतात. म्हणजे त्यांचे निर्वाण होते. "आदेश दिले" हा साधा मराठी शब्द आम्ही वापरत नाही तर "आदेश निर्गमित" केल्याशिवाय आमचे शब्द चालत नाही. म्हणून प्रत्येक मराठी शब्द समजण्यासाठी व्यवहाराची भाषा मराठी बनली, राजभाषा मराठी बनली परंतु ती लोकभाषा बनली नाही. जी सर्वसामान्य माणसे मराठी बोलतात, त्या मराठीमध्ये आमचे आदेश निघत नाहीत. ते आदेश निर्गमित होत असतात. म्हणजेच आजही संस्कृतमधून आदेश निघतात. म्हणून तुमच्या मराठीपेक्षा आम्हाला इंग्रजी जवळची वाटते. हा जो भेद आहे तो जाणीवपूर्वक पोसला आहे,तो राज्यकर्त्यांची पोसला आहे. राज्यशकट चालविणाऱ्या नोकरशहांनी तो जाणीवपूर्वक पोसला आहे. बहुजन वर्ग इथे येऊ नये त्याचे उन्नयन होऊ नये, विकासाच्या प्रवाहामध्ये तो येऊ नये असा ज्यांनी जाणीवपूर्वक कट आणि डाव त्या काळात रचला, त्यामुळे मराठी भाषा हद्दपार झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी लोकमान्य टिळकांचा उल्लेख केला. लोकमान्यांनी 80 वर्षापूर्वी साहित्य संमेलनामध्ये उद्‌घाटनाचे भाषण केले, त्यावेळी त्यांनी तुमची जी काही मराठी आहे ती कामाची नाही, ती टिकणार नाही, ती जगणार नाही असा इशारा दिला होता.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील

लोकमान्य टिळक असे म्हणाले होते की, ही भाषा व्यापार उदिमाची भाषा बनली पाहिजे ज्याचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी केला. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. लोकमान्य टिळकांनी सांगितले होते की, भाषा ही व्यापार उदिमाची बनली पाहिजे. हिंदी नंतर सगळयात जास्त गुजराथी भाषा बोलली जाते.जगभर व्यापाराची भाषा म्हणून इंग्रजी, त्यानंतर हिंदी आणि त्यानंतर गुजराथी भाषा पोहचलेली आहे. तेवढी मराठी भाषा पोहचू शकलेली नाही. व्यापार उदिमाची भाषा मराठी बनू शकली नाही याचे कारण शासन व्यवहारात सुध्दा व्यापार उदिमासाठी इंग्रजी भाषेचा आधार घेतला जातो, हिंदी भाषेचा आधार घेतला जातो. पण मराठी भाषेचा आधार घेतला नाही. त्यामुळे इतर भाषिकांना जर याठिकाणी त्यांच्या भाषेत बोलता येत असेल तर ते कशाला मराठीच्या वाटेला जातील म्हणून इतर लोक सुध्दा मराठी भाषा स्वीकारीत नाहीत.

सभापती महोदय, मराठीचे किती नुकसान झालेले आहे? 80 वर्षा पूर्वीचा श्री. वा. गो. आपटेंचा 'शब्दरत्नाकर' नावाचा शब्दकोष आहे. या शब्दकोषासाठी आपटेंनी प्रस्तावना लिहिलेली आहे. आपटे हे स्वत: गांधीवादी होते. टिळकांचे एक अनुयायी होते. त्यांनी त्या प्रस्तावनेमध्ये आग्रहाने जे सांगितलेले आहे तोच इशारा आजही कायम आहे. आम्ही शासन व्यवहारामध्ये मराठी संकुचित केली ती किती संकुचित केली? 'शब्दरत्नाकर' ज्यावेळी त्यांनी साकार केला त्यावेळी या शब्दकोषाच्या प्रस्तावनेमध्ये असे म्हटले होते की, इंग्रजी मध्ये पाच लाख शब्द आहेत. म्हणजे त्यावेळेला 80 ते 100 वर्षापूर्वी इंग्रजी भाषेमध्ये पाच लाख शब्द होते. मराठीत किती शब्द आहेत तर फक्त दीड लाख शब्द आहेत. जर दीड लाख शब्द असतील तर ती भाषा जगाची, नव्या युगाची भाषा बनू शकत नाही. म्हणून मराठी शब्द वाढवायचे असतील तर काय केले पाहिजे? सर्व प्रकारच्या व्यवहारातील शब्द, जगभरातील सर्व भाषांमधील शब्द जे आवश्यक आहेत ते स्वीकारले पाहिजेत. मूळ इंग्रजीमध्ये फार कमी शब्द होते. वा.गो. आपटे यांनी 'शब्दरत्नाकर' हा शब्दकोष साकारला तेव्हा पाच लाख शब्द होते. आता ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये दहा लाखापेक्षा जास्त शब्दांचा टप्पा इंग्रजी शब्दांनी ओलांडलेला आहे.या दहा लाख शब्दांच्या शेवटच्या टप्प्यातील जे अनेक शब्द आहेत ते मराठी आणि हिंदी आहेत. हे शब्द इंग्रजीने स्वीकारले आहेत. ते वेगवेगळया भाषेतून स्वीकारले आहेत म्हणून इंग्रजी मोठी झाली. कधी काळी इंग्लडची राजभाषा फ्रेंच होती.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2..

श्री. कपिल पाटील....

इंग्रजी ही तेथील बोली भाषा होती पण त्यांनी आपली राजभाषा ठरवत असताना, ती व्यापार उदिमाची आणि जगाची भाषा बनेल या निर्धाराने इंग्रजी भाषेला मोठे केले. जेथे जेथे इंग्रज गेले त्या त्या भागातील भाषेचे वळण, त्या त्या प्रदेशातील भाषेचे वळण त्यांनी आपल्या भाषेत स्वीकारले. म्हणून इंग्रजी ही एकमेव भाषा अशी आहे की, ती बोलणारांची भाषा आहे. जसे बोलतो तशी ती भाषा वळते त्याच्या पाठोपाठ तसे वळण फक्त हिंदी भाषेला मिळालेले आहे आणि त्याचे श्रेय हिंदी चित्रपटाला जाते. पण या पध्दतीने आम्ही मराठी भाषेच्या बाबतीत विचार करीत नाही. पुस्तकी मराठी भाषा बोलायला शिकवितो. त्यामुळे विदर्भातील माणूस वेगळे बोलला तर पुण्याचा माणूस नाक मुरडतो की ही कुठली मराठी भाषा? म्हणजे विदर्भातील "करुन राहिले आहेत, येऊन राहिले आहेत" ही जी चित्रदर्शी भाषा आहे तिला आम्ही हसणार. किंवा मराठवाडयात 'यायलेत' असे म्हणतो. मुंबईत 'येत आहेत' असे म्हणतात किंवा कोकणात 'येत'असे म्हणतात. भाषा प्रदेशानुसार बदलत असते पण आम्ही ती स्वीकारत नाही. ही सगळी गुणवैशिष्ट स्वीकारली गेली पाहिजेत. ती न स्वीकारता आम्ही फक्त पुण्याच्या भाषेपुरती ही मराठी भाषा मर्यादित केल्यामुळे वैदर्भीय भाषेत 'येऊन राहिले' असे लिहिले तर त्या विद्यार्थ्याला मार्क्स कमी मिळतात. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मार्क्स कसे कापले जातात या संदर्भात मागच्यावेळी उल्लेख केला होता. मराठी समीक्षकांना आणि मराठी परीक्षकांना पेपर तपासतांना आपण सांगून ठेवले आहे की, मराठी ही अमुक अमुक एवढीच आहे. त्याच्या पलीकडचे मराठी आले तर मार्क्स कापायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मराठीमध्ये मार्क्स कमी पडतात. मराठीत मार्क्स कमी पडत असतील तर मुले मराठी कशासाठी घेतील? ते मराठी हा विषय घेत नाहीत. ते फ्रेंच भाषा घेतात. जर्मन भाषा घेतात. मराठी भाषेचे राजकारण करणाऱ्या नेत्यांची मुले सुध्दा मराठी भाषा सोडून फ्रेंच आणि जर्मन भाषा घेतात. या बाबतीत त्या मुलांना मी दोष देत नाही. त्यांच्या पालकांनाही दोष देत नाही. कारण आम्ही मराठीची इतकी भीती घातलेली आहे की, त्या भीती पोटी मराठी भाषेपासून लोक दूर जातात. म्हणून मराठी पुढे दोन आव्हाने आहेत. एका बाजूला मराठी सुलभ आणि लोकभाषा बनविणे आणि दुसऱ्या बाजूला ती ज्ञानसंपन्न, सर्वसमावेशक, वैभव संपन्न आणि ग्लोबल बनविणे.

सभापती महोदय, मराठी ही भाषा ग्लोबलच बनली पाहिजे. मी जागतिक हा शब्द वापरत नाही. ग्लोबल या शब्दात सगळे येते. आम्ही संगणक हा शब्द शोधला संगणकाचा अर्थ कॅलक्युलेटर असा आहे. पण आम्ही तो शब्द कॉम्प्युटरसाठी वापरतो. कारण कॉम्प्युटरसाठी दुसरा मराठी शब्द सापडला नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

संगणक याचा अर्थ गणना करणारे. कॉम्प्युटर गणना करीत नाही तर ते कॅल्क्युलेशनचे काम करतात. म्हणून मी कॉम्प्युटरला कॅल्क्युलेटर शब्द वापरतो. आपण कॉम्प्युटर म्हणा. एवढी सर्वसमावेशक भाषा जेव्हा बनेल तेव्हा मराठी आपोआप जगेल.

सभापती महोदय, शासनाने परवा मराठीसाठी स्वतंत्र खाते निर्माण केले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो, स्वागत करतो. भले शासनाने त्यासाठी 300 कोटी रुपये, 400 कोटी रुपये, 500 कोटी रुपये दिले नसतील पण 10 कोटी रुपये देऊन सुरुवात केली. उशिरा का होईना पण सुरुवात केली त्याचे स्वागत करतो. पुढच्या काळात तुमच्यातील हा करंटेपणाही दूर होईल कदाचित आपण 10 कोटीचे 100 कोटी कराल. माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख उत्तर देणार आहेत त्यामुळे ते घोषणाही करतील. पण इतक्या कमी तरतुदीमध्ये मराठीचा विकास कसा काय होईल ? मराठी साहित्य सम्मेलनाला आपण पैसे देतो. पण मराठी भाषा विकास संस्थेला मात्र आपण पैसे देत नाही. भाषा विकास आणि साहित्य यामध्ये अंतर आहे. साहित्याने भाषा समृध्द होते पण केवळ साहित्याने होत नाही. ती ज्ञानविज्ञानाने समृध्द व्हावयास पाहिजे. परवा आपण न्यायमूर्ती चपळगावकर यांची समिती नेमली. ती फक्त साहित्यिक कमिटी नेमली. साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषा मंडळ आहे आणि आणखी आपण आता एक कमिटी नेमली. त्या समितीमध्ये एक न्यायमूर्ती सोडले तर बाकीचे सर्व साहित्यिक घेतलेले आहेत. त्यामध्ये ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रातील, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील माणसे का नकोत ? न्याय क्षेत्रातील माणूस त्यामध्ये आला. श्री. जयंत नारळीकरांनी मराठी साहित्य आणि मराठी भाषा सुध्दा समृध्द केली. मग श्री. जयंत नारळीकर यांच्या क्षेत्रातील एखादा माणूस त्यामध्ये का नको ? जागतिक दर्जाचे आणि देशाचा नावलौकिक वाढविणारे शास्त्रज्ञ आपण या महाराष्ट्रामध्ये निर्माण केलेले आहेत मग त्यांच्यातील माणूस यामध्ये का नको ? टेक्नॉलॉजीतील माणूस यामध्ये का नको ? व्यापार उद्योग क्षेत्रात आपण श्री. तिरोडकर यांचे नाव घेतो. त्यांनी रेयॉनची कंपनी विकत घेतली. मग व्यापार उद्योग क्षेत्रातील माणूस यामध्ये का नको ? आपली भाषा जर समृध्द करावयाची असेल तर या सर्व क्षेत्रातील भाषा त्यामध्ये यावयास पाहिजे. आपण न्यायमूर्ती चपळगावकर यांची समिती सुध्दा कशी केली ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी उल्लेख केला की, आम्ही धर्माची आणि जातीची कुंपणे घातली. तुम्ही सुध्दा त्या समितीला धर्माची आणि जातीची कुंपणे घातलेली आहेत. त्यामध्ये मराठी मातृभाषा असलेला ख्रिश्चन नाही. त्यामध्ये मराठी मातृभाषा असलेला मुस्लीम नाही. त्यामध्ये मराठी मातृभाषा असलेला आदिवासी नाही. त्या समितीमध्ये या तीनही घटकांचा एकही प्रतिनिधी नाही. राज्यात 9 टक्के आदिवासी आहेत. आदिवासींमधील मोठा भाग मराठी भाषिक आहे. अर्धाअधिक भाग गोंडी, माडिया किंवा भिल्ल भाषा, कोकणी भाषा बोलणारा आहे. त्यांचा प्रतिनिधी जर त्यामध्ये घेतला नसेल तर आदिवासींच्या मूळ भाषेकडून त्यांना मराठी प्रमाण भाषेकडे आणण्याचा जो प्रवास आहे तो जिकिरीचा आहे आणि तो जिकिरीचा प्रवास पूर्ण करावयाचा असेल तर त्यांचा माणूस त्या कमिटीवर असावयास पाहिजे. कारण मराठीचे व्यवहार राजकारण ठरविणारी ती कमिटी असेल. त्या ठिकाणी त्यांचा माणूस नेमणार नसाल आणि 9 टक्के आदिवासींना आपण सांगणार की आमची मराठी भाषा शिका तर त्यांनी ती काय म्हणून शिकावयाची ? त्यांचा माणूस त्यामध्ये का घ्यावयाचा नाही ? त्यांचा माणूस त्यामध्ये असावयास पाहिजे. या ठिकाणी फादर दिब्रेटोंचे उदाहरण देण्यात आले. बिशप बाबरे यांचे उदाहरण आहे. अशी अनेक मंडळी आहेत. कोकणातील सबंध मुस्लीम समाजाची मूळ मातृभाषा मराठीच आहे. खानदेशातील मुस्लीम समाजाची मूळ मातृभाषा मराठीच आहे. मग त्यांचा प्रतिनिधी का असू नये. त्यांचा कोणताही प्रतिनिधी न घेता आपण एका विशिष्ट जातीची, धर्माची माणसे जर घेत असाल तर कृपा करुन मराठीला असली कुंपणे घालू नका. मराठी जर सेक्युलर बनली नाही तर मराठी जगणार नाही. जी भाषा सेक्युलर असते तीच भाषा जगते कारण हा जगाचा टिकण्याचा नियम आहे. जी भाषा संकुचित होते ती जगत नाही, ती मरते आणि आपण मराठी भाषेला मरायला घालावयाचे की जगवावयाचे याचा निर्णय कृपा करुन घ्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, इंग्रजीचा आग्रह हा अटळ असतो. त्यामध्ये पालकांना दोष देऊन चालणार नाही. मराठी खरोखर जगवावयाची असेल तर महापालिकेने अलिकडच्या काळात जो

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. कपिल पाटील .....

निर्णय घेतला त्याप्रमाणे सगळ्या शाळा सेमीइंग्रजी करा. पहिलीपासून इंग्रजी शिकू द्या. त्यामध्ये काय बिघडते ? दुसऱ्या बाजूला इंग्रजी माध्यमाच्या, इतर बोर्डाच्या तसेच परदेशी बोर्डाच्या ज्या शाळा या ठिकाणी निघतील त्यांना पहिलीपासून मराठी सक्तीची करावी. हे दोन्ही करावे. एकाच वेळी दोन्ही केले तर मराठी मुलांचे इंग्रजी चांगले होईल आणि इंग्रजी शाळेत जाणाऱ्या सर्वभाषिक मुलांचे मराठी सुध्दा चांगले होईल. या दोघांना एकाच पातळीवर आणावयाचे असेल तर हे दोन्ही निर्णय एकाच वेळी व्हावयास हवेत. पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय आपण घेतला परंतु तेवढे पुरेसे नाही. पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय घेतला पण आम्ही इंग्रजी शिक्षक दिले नाहीत. 60 ते 70 हजार शाळा आहेत. इंग्रजी चांगले शिकवावयाचे असेल तर आपण पहिलीपासून 70 हजार इंग्रजी शिक्षक दिले पाहिजेत. तसे केले तर अजिबात इंग्रजी मिडियमकडे लोक जाणार नाहीत. पहिलीपासून माझे, माझ्या मुलाचे इंग्रजी चांगले होते आणि मला अडचणी येत नाहीत. माझी शाळा सेमी इंग्रजी झाली तरी काही अडचण आली नाही. प्रश्न 70 हजार इंग्रजी शिक्षक देण्याचा आहे. त्यासाठी काही तरतूद लागेल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

ते शिक्षक तुम्ही पुरवावे. म्हणजे आपोआप इंग्रजी वाढेल, केवळ इंग्रजी सक्तीचे करुन चालणार नाही. दुस-या बाजूला त्यांना शिक्षक देण्याची गरज नाही, त्यांनी ते शिक्षक नेमावेत. पैसे घेऊन चालणा-या ज्या मोठया शाळा आहेत. त्यांना सक्तीचे मराठी करावे म्हणजे तेथे आपोआप मराठी होऊ शकेल.

सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. शिवरायांचा येथे वारंवार उल्लेख होतो. मराठी शब्दकोशाच्या निर्मितीमध्ये शिवरायांचे राज्यकर्ते म्हणून मोठे योगदान आहे. त्यापूर्वी महानुभवांनी हा प्रयत्न केला होता. चक्रधर स्वामींच्या अनुयायांनी शब्दकोश निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मराठी महाशब्दकोश तयार करण्याचे श्रेय शिवरायांना राज्यकर्ते म्हणून जाते. त्यानंतर शासनाने केले आहे आणि त्याचे काम चालूच आहे. अत्रे यांनी शब्दकोशाचे वर्णन केले होते. शासनाने मराठीचा शब्दकोश तयार केला त्यातून मराठीचे वाटोळे केले आहे. त्यामुळे नव्या मराठी शब्दकोशाची निर्मिती करावी लागेल. ग्लोबल करावी लागेल, सर्वसमावेशक करावी लागेल. इंग्रजी ऑक्सफर्ड डिक्शनरी सर्व शब्द स्वीकारते त्याप्रमाणे हा शब्दकोश करावा लागेल. हे एक मोठे काम आहे. वाई येथे श्रीमती विजया वाड यांच्या नेतृत्वाखाली मंडळ काम करीत आहे. त्या मंडळाकडे हे काम द्यावे. त्या मंडळामार्फत हा महाशब्दकोश निर्माण केला पाहिजे. मराठी भाषा विकास संस्था साहित्य संस्कृती मंडळाचे काम करीत आहे, साहित्य संस्कृती मंडळ यांचे काम करीत आहे. कोणाचा पायपोस कोणात नाही. आपल्यावर काय जबाबदा-या दिल्या आहेत ते त्यांना माहीत नाही. या मंडळामध्ये भलतीच साहित्यिक मंडळी घेतल्यामुळे गडबड झाली आहे. साहित्यामुळे भाषा वाढते हे मला मान्य आहे. परंतु साहित्य व भाषा यांच्यामध्ये अंतर आहे. त्यामुळे मराठी साहित्य निर्माण झाले म्हणजे मराठी भाषेचे भले केले असे लोकांना वाटते. परंतु तसे नाही. मूळ भाषा संचालनालयाची जबाबदारी आहे, ते भाषा संचालनालय सशक्त करावे आणि त्यांच्याकडे शब्दकोश निर्मितीचे काम द्यावे आणि त्यासाठी सर्व क्षेत्रातील लोकांना घ्यावे लागेल. ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या निकषाप्रमाणे शब्दकोश निर्माण केला तर आपण एक चांगला शब्दकोश निर्माण केला असे होईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, यंदाचे वर्ष महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षात जसे शिवरायांनी राज्याभिषेक झाल्यावर, मराठी हिंदवी राज्याची निमिर्ती केल्यानंतर शब्दकोश निर्मितीचे पहिले काम हाती घेतले. त्यांनी या कामासाठी जेवढा खर्च केला तेवढा सुध्दा शासन खर्च करीत नाही. किमान त्या प्रमाणात जरी शासनाने खर्च केला तरी हे फार मोठे काम होऊ शकेल. ते काम यानिमित्ताने व्हावे असे मला वाटते.

सभापती महोदय, यानिमित्ताने मी शेवटची एकच मागणी करतो, ज्याचा आग्रह सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मूळ प्रस्तावामध्ये केलेला आहे की, शासनाचा सर्व व्यवहार मराठीतून झाला पाहिजे. सर्व व्यवहार मराठीतून सुरु झाला की, रिलायन्स कंपनी सुध्दा मराठीतून बोलू लागेल. आज मुंबई महानगरपालिकेचा 50 टक्के कारभार सुध्दा इंग्रजीतून चालतो. त्याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काम केलेले आहे. आजही त्यांच्याकडील पत्रव्यवहार इंग्रजीतून होतो. ग्रामपंचायतींना सांगण्याचे कारण नाही, कारण ग्रामपंचायतीचे कामकाज मराठीतूनच चालते. पण मुंबई व पुणे महानगरपालिकेच्या कारभाराची, एमएमआरडीएच्या कारभाराची भाषा मराठी बनली पाहिजे. जेवढया शासकीय संस्था आहेत, जेथे ग्लोबल निविदा उघडावयाची असेल तेथे इंग्रजीतून बोलावे. परंतु तुम्हाला येथे येऊन टेंडर भरावयाचे असेल तर ते मराठीतून भरले पाहिजे अशी अट घातली पाहिजे. ही एकदा अट घातली तर मराठीचा टक्का आपोआप वाढेल आणि मराठीचे भांडण सुध्दा कमी होईल. हे करण्याची आवश्यकता आहे. आपण ते कराल अशी यानिमित्ताने आशा व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

-----

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सभागृहात सध्या चालू असलेल्या प्रस्तावावर आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे आपले भाषण सुरु करतील. त्यांचे दोन-तीन मिनिटे भाषण झ ाले की, ही चर्चा थांबवू या. ही चर्चा पुन्हा सोमवारी घेऊ या. आता अशासकीय कामकाज सुरु करु या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय सभापती महोदयांकडे गेलो होतो. सोमवारी इतर प्रस्ताव घेतले जाणार आहेत. त्यामुळे तेथे असे ठरविण्यात आले की, आज ज्या सदस्यांना या विषयावर बोलावयाचे आहे त्यांना बोलू द्यावे. मराठीचा विषय राज्याच्या जिव्हाळयाचा विषय आहे. हा विषय आणल्याबद्दल अभिनंदन केले जात आहे त्यांची मला कीव येते. मला त्यांची दया येते. सोमवारी कोकणासंबंधीचा ठराव होणार आहे. दंगलीसंबंधी एका तासाची चर्चा आहे, त्याशिवाय आणखी एक चर्चा होणार आहे, अशा अनेक चर्चा होणार आहेत. यावेळी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या बाबतीत आम्ही सॅक्रीफाईज करणार नाही. त्यामुळे अंतिम आठवडा प्रस्ताव सोमवारी नसेल, तो मंगळवारी असेल. सभागृहासमोर आलेली विधेयके मंजूर झालेली आहेत. उद्या खालच्या सभागृहातून आलेली विधेयके मंजूर करण्यासाठी हे सरकार आमच्या उरावर बसणार. हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरत आहे. सभागृहासमोर आलेल्या विधेयकांवर आम्ही चर्चा करावयाची नाही का ? यानंतर जी विधेयके सभागृहात येतील त्यावर चर्चा होईल. मराठीच्या विषयावर बोलू इच्छिणारे जे सन्माननीय सदस्य हजर आहेत. त्यांची भाषणे होऊ द्यावीत. फार तर आमचे जे अशासकीय ठराव आहेत ते पुढे ढकलण्यात यावेत.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेले अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मराठी भाषेच्या विकासाच्या संदर्भातील प्रस्तावावर बोलण्यासाठी आपण सन्माननीय सदस्यांना वेळ दिला त्याबद्दल मी आपले आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे आभार मानते.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या विकासाच्या प्रश्नावर हा प्रस्ताव येथे मांडण्यात आलेला आहे. या प्रस्तावावर खूप दिवस रखडत, रखडत चर्चा चालू आहे. या ठिकाणी मराठी भाषेच्या संदर्भात अनेक मुद्दे मांडले गेले. आपले जे मराठी भाषा संचालनालय झालेले आहे त्याचा मी सुरुवातीलाच उल्लेख करु इच्छिते. या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य तसेच पुणे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कविवर्य ना.धों.महानोर यांची आणि माझी पुणे येथील मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी भेट झाली. त्यांनी मला असे सांगितले की, त्यांनी 1990मध्ये विधान परिषदेमध्ये या विषयासंबंधी अशासकीय ठराव मांडला होता आणि त्यावेळी राज्य शासनाकडून असे सांगितले गेले होते की मराठी भाषेच्या संदर्भात ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. खास करुन रवींद्र नाट्य मंदिर येथे जी पु.ल. अकादमी चालविली जात आहे त्याबद्दलही श्री. ना.धों.महानोर यांनी सूचना केल्या होत्या. त्यासूचनांची अंमलबजावणी सरकारने केली नाही. या वस्तुस्थितीकडे मी सभागृहाचे आणि शासनाचे लक्ष वेधते. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने श्री. ना.धों. महानोर यांनी जी खंत व्यक्त केली त्याची कोणीही दखल घेतली नाही आणि राज्य शासनाने देखील अधिकृतपणे त्यांचे म्हणणे समजून घेतले नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले तसेच सन्माननीय तालिका सभापती महोदय आपण देखील पुण्याचे आहात. कदाचित आपली देखील या विषयावर श्री. ना.धों.महानोर यांच्याशी चर्चा झालेली असेल.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक वेळा अनेक कमिटयांचा उल्लेख करण्यात आला. आधी भाषा सल्लागार समिती नेमली, त्यानंतर चपळगावकर समिती नेमली. भाषा सल्लागार समितीच्या बैठका झाल्या असतील. त्या बैठकामध्ये समितीने ज्या ज्या काही सूचना केलेल्या असतील त्या सूचनांची अंमलबजावणी शासनाने केलेली आहे काय ? राज्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग हा अतिशय महत्वाचा विभाग मानला जातो. राज्यामध्ये कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी करावयाची असेल तर त्याबाबतचे जास्तीत जास्त अधिकार सामान्य प्रशासन विभागाला दिलेले आहेत. अशा या विभागाच्या उतरंडीमध्ये हा विभाग असताना सुध्दा गेल्या 7 वर्षामध्ये 14 व्यक्ती

..2..

(डॉ. नीलम गो-हे...

भाषा संचालकाच्या पदावर येऊन गेलेल्या आहेत. छोट्या छोट्या गोष्टीच्या बाबतीत शासन निर्णय घेत नाही. वान्द्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये भाषा संचालनालयाचे कार्यालय हलविण्यात आलेले आहे. अधिवेशनापुरते हे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये हलविण्यात येते. अनुवादकांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. मुख्यालयात 24 ते 30 अनुवादक आहेत. मुंबई, नागपूर या विभागीय कार्यालयामध्ये एक आणि पुणे व संभाजीनगर येथे दोन-दोन अनुवादक आहेत. सभापती महोदय, या 30-35 वर्षात पुलाखालून आणि पुलावरुन खूप पाणी वाहून गेलेले आहे. विद्रोही साहित्य, स्त्री साहित्य, ग्रामीण शेतक-यांचे साहित्य असे विविध साहित्य प्रवाह निर्माण झालेले आहेत.

श्रीमती फौजीया खान : सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलणा-या सन्माननीय सदस्यांचे मुद्दे मी लिहून घेत होते. मला अत्यंत महत्वाचे काम असल्यामुळे हे मुद्दे अन्य मंत्री महोदयांनी लिहून घेतले तर चालतील काय ?

**तालिका सभापती** : ठीक आहे.

डॉ. नीलम गो-हे : सामान्य प्रशासन विभागाकडून या प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. सभापती महोदय, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा उल्लेख केल्या शिवाय मराठी विषयाच्या चर्चेला सुरुवातच होऊ शकत नाही हे मला येथे मुद्दाम नमूद करावयाचे आहे. मघाशी असे बोलले गेले की, भाषेच्या नावाने राजकारण केले जाते.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)**

...श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे............

ज्यावेळेला मराठी भाषेला डावलण्याचे राजकारण होते त्यावेळेला मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळावी, सर्वमान्यता मिळावी, राजमान्यता मिळावी यादृष्टीने सातत्याने भूमिका बजावण्याची ऐतिहासिक कामगिरी करणे गरजेचे होते. मला आठवते, माननीय शिवसेनाप्रमुखांनी 2009 च्या निवडणुकीनंतर निवडून आलेल्या आमदारांची शिवसेना भवनात बैठक बोलावली होती. त्या बैठकीला स्वत: शिवसेनाप्रमुखांनी उपस्थित राहून सांगितले की, मी शिवसेना भवनाकडे येत असताना दुकानांवरील पाट्या पहात होतो. वांद्रे ते माहीमपर्यंत जी दुकाने दिसतात त्यापैकी अनेक पाट्या अशा आहेत, त्यावर मी स्वत: डांबर फासले आहे आणि त्या दुकानांवर मराठी भाषेतील पाट्या दिसत आहेत. आज विधानभवनापासून वरळीपर्यंत जाताना ज्या ज्या इमारती दिसून येतात, मग आयनॉक्स थिएटरच्या इमारतीपासून सुरुवात केली तर आयनॉक्सपासून मरीनड्राईव्ह, बाबुलनाथ, महालक्ष्मी, वरळीपर्यंतच्या प्रत्येक इमारतींची नावे इंग्रजी भाषेत लिहिलेली दृष्टीस पडतात ही वस्तुस्थिती आहे. मराठी भाषेचे राजकारण म्हणत असताना मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो की, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हा अहवाल सभागृहासमोर मांडला गेला. मागील दोन वर्षापासून आर्थिक पाहणी अहवालामधून दोन प्रकारची आकडेवारी गायब झालेली आहे. पहिली आकडेवारी म्हणजे मराठी भाषेच्या संदर्भातील आकडेवारी आहे. मराठी लोकांची किती टक्केवारी आहे याचा तपशील दिला जात नाही. त्यासोबत धार्मिक अल्पसंख्यांकाची आकडेवारी या पुस्तिकेतून गायब झालेली आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाचे तीन भाग आहेत. मराठी भाषेच्या संदर्भातील निर्णय घेणे गरजेचे आहे. पहिला भाग प्रशासकीय निर्णयाच्या संदर्भातील आहे. मुंबईतील टॅक्सी चालविणाऱ्या चालकांना कोणती भाषा अवगत असावी याबद्दल वाद निर्माण झाला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे संपूर्ण अधिवेशनात तो विषय बाजूला पडला. मराठी भाषा येत असल्याशिवाय वाहन चालविण्याचा परवाना मिळणार नाही अशा प्रकारची भूमिका समोर आली. नंतर स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, हिंदी भाषा सुध्दा चालेल. जो माणूस मराठी भाषा शिकलेला आहे त्याबद्दल कोणतीही अडचण नाही. इतर ठिकाणी टॅक्सी परवान्यासाठी मराठी भाषा आली नाही तरी चालेल असे म्हटले तर कशा पध्दतीने भाषेचा व्यवहार चालणार याबद्दल अटी किंवा नियम बदलण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती का दाखवू शकत नाही?

..2..

SGB/ D/ KTG/ 16:05

डॉ.नीलम गोऱ्हे...........

सभापती महोदय, 8 संरक्षित क्षेत्रे आहेत. त्या क्षेत्रामध्ये कोणत्या माध्यमातून काय काम होते याचा निर्णय होतो. कायदा, शिक्षण, संस्कृती, धर्म, परिवार, शासन, प्रशासन आणि समाज अशी ही आठ क्षेत्रे आहेत. न्यायालयामध्ये मराठी भाषेतून निकाल दिले जात नाहीत. आम्ही माहिती घेतली तेव्हा असे कळले की, पुरेसे मराठी टंकलेखक उपलब्ध नाहीत म्हणून वेगाने निकाल देता येत नाही. त्यामुळे बरेचसे निकाल इंग्रजीमधून दिले जातात आणि नंतर त्या निकालांचे मराठी भाषेत रुपांतर केले जाते. निकालाच्या मराठी प्रती मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे. सोप्या मराठी भाषेबद्दल चर्चा करीत असताना कायद्याच्या भाषेत बसते का? काय भाषा निवडायची? माननीय शिवसेनाप्रमुखांनी काय सांगितले? मी 2005 च्या वचननामा तयार करण्यामध्ये सहभाग घेतला होता. त्यावेळी रोजच माननीय शिवसेनाप्रमुखांकडे जाऊन मी चर्चा करीत असे. अवघड मराठी भाषा वापरण्यापेक्षा एखादा इंग्रजी शब्द आला तरी चालेल. चार वाक्यांमध्ये तीन इंग्रजी शब्द असा अर्थ अभिप्रेत नाही. म्हणजे केवळ संस्कृतीप्रचूर मराठी असा दावा करणे योग्य नाही. ज्या शब्दांना सोयीचे शब्द आहेत असे मराठी शब्द वापरले जातील हे पाहिले पाहिजे. विधानभवनातील उद्वाहनामध्ये संगिताची ट्यून वाजविली जाते. ती ट्यून 'मुंबई मेरी जान' या हिंदी संगितावर आधारित आहे. आम्ही अरसिक नाही. परंतु याठिकाणाहून सुरुवात होते. एफएम रेडिओवरुन मराठी गाणी वाजविली जावीत असा माननीय शिवसेनाप्रमखांनी आग्रह धरला तो संगीतद्वेष्ट्या माणसाला हिंदी गाण्यांना विरोध आहे म्हणून नाही. ज्या ज्या एफएम वाहिन्या आहेत त्यावर मराठी वाजविली पाहिजेत.

नंतर 3जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

ज्यावेळी आंतरराष्ट्रीय प्रवासाला जातो तेव्हा कोणकोणत्या गाण्यांचे संगीत उपलब्ध आहे ते संगीत उदा. दक्षिण अमेरिकेत स्पॅनिश भाषेत ते ऐकू येईल. तेथे मात्र केवळ इंग्रजीच नव्हे तर हिंदीबरोबर तामिळ भाषेतील गीतेही उपलब्ध आहेत. अशा प्रकारे अनेक भाषांमधील गीते उपलब्ध आहेत. याचा अर्थ तामिळ लोकांनी देशद्रोह केला असे होत नाही. त्यामुळे मराठी गीते ऐकता आली पाहिजेत अशी कोणत्या तरी ग्राहकाने, श्रोत्यांनी अथवा रसिकाने तक्रार नोंदविल्याशिवाय त्याची दखल घेतली जात नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. मी मुद्दाम येथे कायद्याच्या बरोबर संस्कृतीचा उल्लेख करणार आहे. सांस्कृतिक क्षेत्रात सुध्दा असे चित्र दिसत आहे की आज मराठीची ओळख म्हणून लावण्या, गीते वगैरे ठीक आहे पण मराठीची ओळख म्हणजे केवळ लावण्या नव्हे. कारण लावणी हा एक कलेचा प्रकार आहे. कोणत्या प्रकाराने महाराष्ट्राचे चित्र आपण दाखविता ? प्रत्येक ठिकाणी प्रथम गणेशाची पूजा होते व त्यानंतर लावणीचा कार्यक्रम होतो, हे काय चालले आहे ? आपले कल्पनादारिद्र्य आहे की, सांस्कृतिक विश्वाचे दारिद्र्य आहे की, मराठीची ओळख करुन देण्यात संकोच वाटतो की, आपली दृष्टीच संकुचित झाली, हेच समजत नाही. मराठीची ओळख म्हणजे लावणी परंतु ती एकमेव अशी ओळख म्हणता येणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आदिवासींच्या वारली नृत्याचा उल्लेख केला. अशा प्रकारे मराठीची व्याप्ती व्यापक अशी ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या सूचना केल्या आहेत. परंतु त्याच्या तपशीलात जास्त न जाता सांगितले पाहिजे की महानगरपालिकेच्या अनेक मराठी शाळा बंद पडत चालल्या आहेत, त्याचाही शासनाला विचार करावा लागणार आहे. या शाळा शासनाला चालू रहाव्यात असे वाटत असेल तर त्यातील मुलांना जे शिक्षण दिले जाते त्या शिक्षणाचा दर्जा कसा वाढविता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मध्यंतरी टॅक्सी चालकांच्या संदर्भात राज्यात परवाने देण्याबाबतचा विषय उपस्थित झाला त्यांना परवाने देताना मराठी भाषेचे इ ान अनिवार्य असले पाहिजे याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. आमच्याकडे मराठी भाषेचा एकंदरीत जो आग्रह होतो त्याची व्याप्ती वाढली पाहिजे. त्यासाठी फॉन्ट एकच असावा. तो म्हणजे युनिकोड ही अशी एक मराठी लिपी आहे की, जी सर्वच ठिकाणी सूट होते. सध्या आपण वेगवेगळ्या फॉन्टमध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

टाईप करतो. त्यात "श्री" लिपी तसेच "आकृती " लिपीचा उपयोग होतो परंतु हे फॉन्ट सर्वच ठिकाणी सूट होत नाहीत तर त्यासाठी आपल्याला एक स्वतंत्र सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते, त्याशिवाय मराठीतून दिसत नाही म्हणून एकच सर्वंकष अशा युनिकोड फॉन्टचा वापर कसा करता येईल याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्याला कल्पना असेलच की काही महिन्यापूर्वी माझे सासरे स्व. विं.दा.करंदीकर यांचे निधन झाले. त्यानंतर काही तासातच मी असा विचार केला की त्यांच्या संदर्भात इंटरनेटवर कोणी काय लिहिले हे पहावे. त्यासाठी मी "विकिपिडीया" या वेबसाईटवर जाऊन पाहिले असता त्यांच्या कविता तसेच पुस्तकांची यादी भराभर समोर आली. त्याचबरोबर एका तरुण मुलाने असेही लिहिले होते की, स्व.वि.वा.शिरवाडकर तसेच स्व. सुरेश भट यांच्याबद्दल कोणाला असे काम करावयाचे असेल तर अमुक ठिकाणी आपण करु शकता. आपण म्हणतो की तरुणांना मराठीचे वावडे आहे परंतु तसे नाही तर याच मुलांनी विकिपिडीयावर हे काम केल्याचे दिसून आले. तसेच अशा वेबसाईटच्या माध्यमातून सुध्दा मराठी भाषा समृध्द करण्याचे काम होत असल्याचे आपल्याला दिसून येईल. तसेच तेथे पुस्तके पाहिजे असतील तर अमुक ठिकाणी जावे अशी सूचना दिली होती. तेव्हा मात्र मी ताबडतोब त्या वेबसाईटवर गेले असता ती वेबसाईट भारतीय भाषातील कविता व प्रकाशकांची वेबसाईट असल्याचे मला दिसले. तीन चार वेळा मी सतत त्या साईटवर गेले तेव्हा त्या वेबसाईटवरच फॉर्म भरुन घेण्याची व्यवस्था होती आणि अमुक इतके डॉलर्स भरा त्यानंतर आपल्याला पुस्तके मिळू शकतील, अशी व्यवस्था आहे. तेव्हा असा प्रश्न निर्माण होतो की, मराठी पुस्तके विकत घेण्यासाठी अशा माध्यमांचा उपयोग सुध्दा राज्यशासनाने करायला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

शासनाशी संबंधित किती लोक विकीपिडीयावर जातात व वाचन करतात याची मला माहिती नाही. संपूर्ण जगातील साहित्याचा खजिना या विकीपिडीयावर उपलब्ध आहे. विकीपिडयावर चुकीची माहिती जाऊ नये यासाठी तांत्रिक अभ्यास करुन, स्वत:चा तर्क द्रदष्टेपणा प्रतिबिंबित न करता लिखाण करणे आवश्यक आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आयुष्यभर काम केलेले तसे काम करण्यास आज शेकडो साहित्यिक, विचारवंत तयार आहेत. खरे म्हणजे "देणा-याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी" त्या प्रमाणे सरकारची झोळी दुबळी आहे असे मला वाटते. जे जे लोक यामध्ये काम करु इच्छितात त्यांची प्रतिष्ठा आणि सन्मान ठेवणे हे केवळ नोकरशाहीचे काम नाही तर ते राज्यशासनातील राजकारणाचे नेतृत्व करणा-या नेते मंडळीचे काम आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मंत्रालयातील सचिवांचे पीए बहुतेक अमराठी आहेत. सचिव आणि त्यांचे पीए यांचा सर्व व्यवहार इंग्रजीमधूनच चाललेला असतो. इतकेच नव्हे तर आपण दिल्लीतील महाराष्ट्र सदनला फोन केला तर कोणत्या भाषेत फोन उचलला जाईल याचा विचार आपण करु शकता. महाराष्ट्र सदनामध्ये फोन केला आणि त्यावर मराठीतून बोललो तर तो फोन पासऑन केला जातो. महाराष्ट्र सदनात गेल्यानंतर जेवणापासून ते आतपर्यंत मराठी भाषेला कोणत्याही प्रकारचा तेथे दर्जा मिळत नाही हे दिसून येते. हायमाऊंट सारखी जी गेस्ट हाऊस आहेत त्या ठिकाणी तुम्ही मराठीतून बोलला तर काय प्रतिसाद मिळतो ते पहा. व्होडाफोनची मदत सेवा मराठीतून उपलब्ध नव्हती त्यामुळे स्थानीय लोकाधिकारी समितीने मोठे आंदोलन केले होते. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, "न्यूयॉर्क आणि इतर भागात खूप मराठी लोक आहेत". मी 16-17 वर्षापूर्वी लंडनला गेले होते त्या ठिकाणी एअर इंडियातील सर्व कर्मचारी हे स्थानीय लोकाधिकार समितीचे कर्मचारी होते ते सर्व कर्मचारी मराठीतून बोलत असल्यामुळे मला खूप कौतुक वाटले होते. हे कर्मचारी वेगवेगळया विमानतळावर जाणीवपूर्वक मराठीतूनच बोलत होते त्याचे कारण असे आहे की, जर्मन लोक जर्मन भाषेतूनच बोलतात, स्पॅनिश लोक स्पॅनिश भाषेतूनच बोलतात, फिलिपाईन्स लोक ताबडतोब फिलिपाईन्स लोकांचा ग्रुप करतात. आपण ग्रुप केला नाही तरी मराठीतून एकमेकांशी बोलतांना लाज वाटू नये हा हिंदू ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचा संदेश आहे. मराठी बोलत असतांना आपण तिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

स्वीकारले पाहिजे, आत्मसात केले पाहिजे अशी भूमिका किती लोकांचा आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आपण जर थायलंडच्या विमानतळावर गेला, तर आपल्याला त्या ठिकाणच्या उद्‌घोषणा थाई भाषेतून ऐकू येतील परंतु मुंबई विमानतळावरुन मराठीतून उद्‌घोषणा होतांना दिसत नाही. मराठी अनाऊन्समेंट कळो वा ना कळो एक अनाऊन्समेंट इंग्रजीतून झाली, दुसरी हिंदीतून झाली तर तिसरी अनाऊन्समेंट मराठीतूनच व्हावयास पाहिजे. जगातील युरोप किंवा कोणत्याही देशात जा, चेन्नईमध्ये जा किंवा आपल्या देशातील इतर राज्यात जा त्या ठिकाणी स्थानिक भाषेतून घोषणा होतच असते. त्यामुळे आपल्या विमानतळावर मराठीतून घोषणा करण्यास भाग पाडण्याचे काम सामान्य प्रशासन विभागाचे आहे. यासंदर्भात आपल्या सामान्य प्रशासन विभागाने केंद्रसरकारकडे याबाबत पाठपुरावा केला पाहिजे.

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मराठी नाटय संमेलनाचा उल्लेख केला होता. परंतु अमेरिकन कौन्सिलेटचे जे नियम आहेत ते चुकीचे आहे की, बरोबर आहेत याबाबत चर्चा होऊ शकते परंतु या सर्व कलाकाराचा पत्ता अमेरिकेतील एकाच माणसाच्या नावाने दिला आणि 100 लोक तेथेच राहणार आहे असे दाखवले तर व्हीसाच्या बाबत तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतील. मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना अमेरिकन व्हीसाच्या बाबतीत काही तरी प्रकाश टाकावयाचा दिसतो त्यामुळे त्यांनी या विषयावर मत मांडल्यानंतर मी माझे भाषण पुढे सुरु ठेवेन.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या कलाकारांना अमेरिकेत जाऊन सादरीकरण करावयाचे असते त्यांच्यासाठी पी-3 व्हीसा काढावा लागतो. तेथे जाणा-या प्रत्येक कलाकाराचा पत्ता नव्हे तर सर्व कलाकारांची माहिती एकत्र करुन अमेरिकन वकिलातीला पूर्ण माहिती द्यावी लागते. या माहितीची खातरजमा करुन घेतल्यानंतर कलाकांराना तो पी-3 व्हीसा मिळतो. पी-3 व्हीसा न काढता अमेरिकेत प्रयोग केला तर त्या कार्यक्रमावर बंदी आणली जाते व त्या कलाकारांना आपल्या देशात परत पाठवले जाते. हे होऊ नये म्हणून संमेलनसाठी जाणारे जे कलाकार होते त्यांच्यासाठी पी-3 व्हीसा मिळवण्याचे प्रयत्न होते त्यामध्ये त्यांच्या राहण्याच्या पत्त्याचा संबंध नव्हता एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. भारवि...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, आपण नाट्य संमेलन घेतो, साहित्य संमेलन घेतो त्याची तांत्रिक तयारी आधी पासून करायला पाहिजे. ती तांत्रिक तयारी आपण केलेली नाही. यामध्ये आपण ठरवू शकतो की, यात शासनाची कोणतीही भूमिका असणार नाही. नाटय संमेलनाला जाणारे सल्लगार, त्यांची प्रवासाची व्यवस्था करणारे लोक यांच्याशी आमचा काही संबंध नाही अशी शासन भूमिका घेऊ शेकते. दुसरी मदत करण्याची देखील शासन भूमिका घेऊ शकते. मला सर्वात आश्चर्य असे वाटते की, नाट्यसंमेलन तोंडावर आल्यावर मग धावपळ सुरू होते. म्हणजे यात नियोजनाचा अभाव दिसतो. यातून कलाकारांना मनस्ताप होतो. अशा वेळी शासन काहीच करू शकत नाही. नाट्यसंमेलनाला कोणीच जाणार नव्हते अशातला काही भाग नव्हता. तेथे मान्यवर जाणार होते. त्यामुळे तेथे शासनाने मार्गदर्शन केंद्र स्थापन केले असते तर बहुंतेकांना त्याचा लाभ घेता आला असता. नाट्य संमेलना बरोबर दुबईला साहित्य संमेलन होत आहे हा देखील प्रश्न आला होता. त्यामुळे प्रत्येक साहित्य संमलेनासंबंधी काय भूमिका घ्यायची हा देखील प्रश्न निर्माण झाला होता. साहित्य संमेलनात जे मनोगत मांडतात किंवा जे मुद्दे चर्चेला येतात त्याचे प्रतिबिंब शासनाच्या धोरणात कुठे ना कुठे तरी पडले पाहिजे. साहित्य प्रेमींना अपेक्षा असेल, नसेल ती त्यांच्या पाशी. मी साहित्यिक म्हणून बोलताना असे म्हणेन की, आम्ही शासनापासून स्वतंत्र आहोत. त्यांच्या मनातील जी काही स्पंदने आहेत, मुद्दे आहेत त्याचा शासनाने विचार केला पाहिजे. साहित्य संमेलन कुठे तरी होते आहे, त्याचा आमच्याशी काहीही संबंध नाही असा विचार करणे योग्य नाही. शासनाच्या सांस्कृतिक विभागाची देखील जबाबदारी आहे. त्याकडे देखील मला आपले लक्ष वेधायचे आहे.

मला शेवटचा मुद्दा सुचवायचा आहे. सर्व विद्यापीठातील मराठी भाषा विभागांचे राज्यस्तरिय महामंडळ स्थापन करण्यात यावे. हे महामंडळ त्यांच्याकडे असलेल्या साहित्याचे संवर्धन करण्यासंबंधी प्रयत्न करील. मराठीत उत्तम साहित्य आहे. त्याचा इतर भाषांमध्ये अनुवाद झाला पाहिजे. कारण ज्यावेळी ज्ञानपीठ किंवा अन्य पुरस्काराचा विचार होतो त्यावेळी अनुवादित साहित्य असणे आवश्यक असते किंवा त्या लेखकाने अन्य साहित्याचा अनुवाद करायला पाहिजे.

आपण दहा कोटी रूपयाची तरतूद केलेली आहे. त्याची अंमलबजावणी कितपत शक्य होईल याबद्दल मी साशंक आहे. मराठी भाषेतील विनोद समृद्ध केला तर समाजात ती भाषा लोकप्रिय होईल. एवढे सांगून मी दोन शब्द पूर्ण करते. यानंतर श्री.देवदत्त....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ( महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित ) : माननीय सभापति महोदय, इस प्रस्ताव पर बहुत सारे माननीय सदस्यें ने अपने विचार रखे हैं और सभी माननीय सदस्यों ने बहुत अच्छे विचार और सुझाव यहां पर रखे हैं. इसलिए मैं सभी माननीय सदस्यों का अभिनन्दन करता हूं. मराठी भाषा को बढावा देने के लिए महाराष्ट्र सरकार ने एक विभाग बनाया है और उस विभाग को कुछ फंड भी दिया है. लेकिन सिर्फ इतना कर देने से ही मराठी भाषा का प्रचार और प्रसार हो जाएगा, ऐसा संभव नहीं है और न ही ऐसा मानने वालों में से मैं हूं. इसके प्रचार-प्रसार के लिए तथा मराठी भाषा को अंतर्राष्ट्रीय स्तर पर लोकप्रियता दिलाने के लिए और उसकी एक्सेप्टेबिलिटी बढ़ाने के लिए महाराष्ट्र सरकार को और मराठी प्रेमियों को मिलकर काम करना पड़ेगा.

मराठी भाषा का प्रचार-प्रसार करते समय दो-तीन बातें मैं सदन के ध्यान में लाना चाहता हूं. मैं मानता हूं कि भारत का संविधान बहुत व्यापक है. हमारा यह संविधान बहुत ही सोच समझ कर बनाया गया है. हमारे देश का जो फेडरल ढांचा है, देश की आजादी के बाद उस ढांचे को एक बनाए रखने में हमारा यह संविधान बहुत बड़ी शक्ति है. हमारे संविधान के अनुसार हमारे देश की एक आफिशियल लेंग्वेज है, सरकारी भाषा है. आफिशियल लेंग्वेज के बारे में हमारे संविधान में आर्टिकल 343 से 351 तक है. वहां पर आफिशियल लेंग्वेज शब्द है. उसका हिंदी और मराठी अनुवाद चाहे कुद भी हो. लेकिन हमारे देश में हिंदी को राजभाषा माना गया है, पूरे देश की सरकारी भाषा माना गया है

माननीय अध्यक्ष महोदय, आजादी के समय हमारी संपर्क भाषा अंग्रेजी थी. इसलिए 15 सालों तक उस भाषा को रखा गया. हमारा देश इतना बड़ा है कि अनेक राज्यों के लोगों को हिंदी भाषा नहीं आती. काफी जगहों पर लोग आज भी अंग्रेजी बोलते हैं. हम अंग्रेजी को विदेशी भाषा मानते हैं. लेकिन हमारे पूर्वोत्तर राज्यों में आज भी वहां की भाषा अंग्रेजी है. भारत के संविधान ने भाषा को किसी पर लादा नहीं है. उन्होंने इसके लिए काफी लंबा समय दिया. और चाहा कि हिंदी को राज्य भाषा का जो दर्जा है, उस भाषा को राष्ट्र भाषा का दर्जा मिले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा...

हमारे देश में जितनी भी रीजनल लेंग्वेज हैं उनमें मराठी का भी प्रमुख स्थान है. उसके प्रचार-प्रसार की व्यवस्था हमारे संविधान में की गयी है. इस बारे में दो राय नहीं हो सकती हैं कि जो लोग संविधान के दायरे में काम करते हैं, उन सभी को मिलकर मराठी भाषा को आगे बढ़ाने का काम करना चाहिए. यहां पर बाकी माननीय सदस्यों ने बहुत अच्छे सुझाव दिए हैं. माननीय सदस्य श्री विनोद तावडे जी, श्री रामदास कदम जी, श्री अरुण गुजराथी जी, श्री कपिल पाटील जी तथा श्रीमती नीलमताई ने भी यहां पर काफी बातें कही हैं. उन्होंने कहा कि अभी सरकार को बहुत काम करना है. चाहे वह काम शिक्षा के क्षेत्र में हो, साहित्य के क्षेत्र में हो, नाटय के क्षेत्र में हो या किसी और क्षेत्र में हो, हमें मराठी भाषा की एक्सेप्टेबिलिटी बढ़ानी होगी. उसको एक्सेप्टेबल विषय बनाना होगा. आज नागपुर में तथा अन्य छोटे शहरों में तथा तालुका लेवल पर भी पब्लिक स्कूल का कल्चर आ रहा है. आस्ट्रेलिया और मलेशिया की तथा दूसरी अन्तर्राष्ट्रीय यूनिवर्सिटी हमारे देश में शिक्षा देने आ रही हैं. मराठी भाषिक बच्चे आज वहां पर पढ़ रहे हैं. आज वे बच्चे मराठी स्कूलों में जाना नहीं चाहते. वे बच्चे आज अंग्रेजी स्कूलों में जाना चाहते हैं. आज ऐसे अंग्रेजी स्कूलों की भी संख्या बढ़ रही है , जिनको अनुदान नहीं मिलता है. महाराष्ट्र में महानगर पालिका और जिला परिषदों द्वारा अनेक मराठी स्कूल खोलने के बाद भी बच्चे वहां पर एडमिशन नहीं लेते हैं. इन बातों को ध्यान में रखते हुए हमें मराठी का कमर्शियलाइजेशन करना होगा. हमें बच्चों को यह विश्वास दिलाना होगा कि बच्चे यदि मराठी भाषा में टेकनिकल एज्युकेशन लेते हैं या उच्च शिक्षा लेते हैं तो उनको नौकरी मिल सकती है.

( इसके बाद भाषण श्री तालेवार के पास जारी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DD/ KTG/ पूर्वी श्री दत्त 16:25

श्री सय्यद ज़मा ....

न केवल महाराष्ट्र में बल्कि देश के दूसरे राज्यों में भी नौकरी मिल सकती है. इसलिए मराठी भाषा भी आनी चाहिए, हिंदी भाषा भी आनी चाहिए और अन्तर्राष्ट्रीय स्तर पर सम्पर्क भाषा के रुप में अंग्रेजी भाषा भी आनी चाहिए. सरकार को ऐसी कोई नीति बनानी होगी. ताकि मराठी भाषा में पढ़ने वाले विद्यार्थी को किसी भी क्षेत्र में, किसी भी राज्य में, किसी भी देश में नौकरी करने में कोई दिक्कत न आ सके. इसलिए इस दिशा में सरकार को काम करना होगा.

सम्माननीय सदस्य ने बताया कि केरल की भाषा मलयालम है. कर्नाटक की भाषा तेलगू है. वहां पर उनकी अपनी भाषा में काम चलता है. मैं यह बताना चाहता हूं कि हमारे देश में बहुत भाषाएं हैं. विश्व में ऐसा कोई देश नहीं होगा जहां इतनी भाषाएं होगी. इतनी संस्कृति, इतनी भाषाएं भारत देश में बोली जाती हैं. अमेरिका बहुत प्रगतिशील देश है. लेकिन उसकी भी अपनी कोई भाषा नहीं है. वहां भी ब्रिटीश कॉलोनी का राज रहा था. वहां कामकाज की भाषा अंग्रेजी है. लेकिन हमारे देश में बहुत सारी भाषा बोली जाती है. भाषा के क्षेत्र में हमारा देश धनवान है. संस्कृति के मामले में भी हमारा देश धनवान है. हमें गर्व है कि हम भारतीय है, हमें गर्व है कि हम महाराष्ट्रीयन है. इसलिए सरकार को मराठी भाषा के विकास के लिए बहुत कुछ करना होगा. पर्याप्त धनराशि का प्रावधान करना होगा, रिसर्च करना होगा. शब्दकोश का विस्तार करना होगा. मराठी साहित्य के बारे में, शब्द संग्रह के बारे में, ग्रामर के बारे में रिसर्च करके मराठी भाषा का विकास करना होगा. आज के कम्प्युटर युग में मराठी का विकास विश्वस्तर पर करना होगा. इस संदर्भ में यहां पर जितने भी सुझाव दिए गए हैं, उन सब पर विचार करके एक एक्शन प्रोग्राम सरकार को बनाना चाहिए. मराठी के विकास के लिए समयबध्द कार्यक्रम बनाया जाना चाहिए. पिछले अधिवेशन में सरकार की तरफ से यह कहा गया था कि मराठी माध्यम के स्कूलों को परमीशन नहीं दी जाएगी. हमारों मराठी माध्यम के स्कूलों की ओर से परमीशन मांगी गई थी लेकिन सरकार ने परमीशन नहीं दी. अब महाराष्ट्र में मराठी माध्यम के स्कूलों को परमीशन नहीं मिलेगी, अनुदान नहीं मिलेगा तो फिर कहां परमीशन मिलेगी, कहां अनुदान मिलेगा ? मुंबई महानगरपालिका के बारे में चर्चा चल रही थी. बताया जाता है कि करीब 70-80 प्रतिशत धनराशि आस्थापना पर खर्च हो जाती है. ऐसी स्थिति में विकास के लिए कितनी धनराशि दे सकेंगे इसमें शक है. इसलिए मैंने कहा था कि हमें अपना खर्च कम करना होगा. ताकि विकास के काम के

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा ....

लिए फंड दे सके. इस प्रस्ताव पर चर्चा के दौरान बहुत अच्छे सुझाव दिए गए हैं. मैं महाराष्ट्र सरकार से अनुरोध करता हूं कि वे मराठी भाषा के विकास के संबंध में समयबध्द कार्यक्रम बनाए.

सभापति महोदय, आजादी के इतने साल बाद भी हिंदी हमारे देश की राष्ट्रभाषा नहीं बनी है.संविधान में कहा गया है कि हिंदी भाषा लागू करने के लिए किसी भी राज्य पर जबर्दस्ती नहीं कर सकते हैं, हिंदी भाषा को किसी भी राज्य पर लाद नहीं सकते हैं. हिंदी भाषा का धीरे-धीरे प्रचार-प्रसार होगा, इस प्रकार का विचार संविधान बनाते समय व्यक्त किया गया था. इसलिए आपसी सहयोग से मराठी भाषा को न केवल महाराष्ट्र में बल्कि पूरे देश में, अंतर्राष्ट्रीय स्तर पर इसको स्वीकार करने के लिए जो भी करना हो वह महाराष्ट्र शासन को करना चाहिए. समयबध्द तरीके से करना चाहिए. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

......

यानंतर श्री मोते यांचे भाषण.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या विकास आणि संवर्धनाच्या संदर्भात नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून त्याकरिता दहा कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या विभागाच्या माध्यमातून जे काही कामकाज झालेले आहे वा येथून पुढे होणार आहे त्याकरता सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्य शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.खरे म्हणजे हा अभिनंदनाचा विषय होऊ शकत नाही. आपण सर्वजण महाराष्ट्रात राहतो, आपल्या सर्वाची मातृभाषा मराठी आहे. इतकेच नव्हे तर राज्याची राजभाषासुध्दा मराठी आहे अशा स्थितीमध्ये मराठी भाषिक राज्यांमध्ये राज्य शासनाकडून मराठीच्या बाबतीत दुर्लक्ष झालेले आहे.म्हणून मराठी भाषेच्या विकासासाठी आता अशा प्रकारे स्वतत्र विभाग स्थापन करावा लागत आहे . मराठी भाषिक राज्यामध्ये मराठी सारख्या मातृभाषेकडे राज्य शासनाकडून दुर्लक्ष केले गेले असल्यामुळे राज्य शासनाचे अभिनंदन करण्याचा विषय येता कामा नये. असे मला या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी श्ांसनाला काही सूचनाही केलेल्या आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने आपण मराठीचे संवर्धन करण्यासाठी, मराठीचा विकास करण्यासाठी या मंडळाच्या माध्यमातून योजना हाती घेणार आहात. त्याचे नियोजन होईल व त्याची अंमलबजावणी होईल. परंतु मला याठिकाणी स्पष्टपणे खेदाने नमूद करावेसे वाटते की, एका बाजूला मराठीचे समर्थन व मराठीच्या विकासाचा विचार करीत असतांना दुसऱ्या बाजूला मराठीचे खच्चीकरण करण्याचे काम राज्य सरकारकडून होत आहे कुणाचे काहीही मत असू द्या, परंतु खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये, मराठी भाषिक राज्यामध्ये मराठीचे खच्चीकरण करण्याचा निर्णय शालेय स्तरापासून, शिक्षणाच्या माध्यमातून शासनाने घेतला आहे, त्याला माझा सक्त विरोध आहे. खरे म्हणजे प्रत्येकाला मातृभाषेमधून शिक्षण मिळाले पाहिजे. आपली मुले ही खऱ्या अर्थाने मातृभाषेमधून शिकतात, त्यांना इंग्रजी माध्यम पाहिजे अशातली गोष्ट नाही. परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रेरणा,प्रोत्साहन द्यावयाचे आणि मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडण्याचे, मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी न देणारे असे दुटप्पी धोरण शासनाने स्वीकारले आहे. या धोरणाला माझा सक्त विरोध आहे. आम्हाला इंग्रजी आले पाहिजे हे मला मान्य आहे, इंग्रजी ही संपर्काची भाषा आहे, आंतरराष्ट्रीय भाषा आहे हे मला मान्य आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने निर्णय घेतला व तत्कालीन शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांनी या राज्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेतला की, आमच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना सुध्दा इंग्रजी भाषेमध्ये प्रगती करता यावी, त्यांनाही इंग्रजीमधून शिक्षण मिळावे म्हणून इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषयाचे, इंग्रजी भाषेचे ज्ञान त्यांना दिले पाहिजे. आणि म्हणून इयत्ता पहिलीपासून या राज्यामध्ये इंग्रजी विषय शाळेमध्ये शिकवायला सुरुवात झाली. त्याअगोदर इयत्ता पाचवीपासून इंग्रजी विषय होता. राज्याच्या शैक्षणिक धोरणानुसार पूर्वी इयत्ता आठवीपासून इंग्रजी हा विषय शिकविला जात होता. त्यानंतर इयत्ता 5 वी ते 7 वीपर्यंत इंग्रजी हा विषय शिकवायला सुरुवात झाली, आणि आता इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय शिकविला जातो. त्याचे पुढील पाऊल शासनाने असे टाकले आहे की, या राज्यातील माध्यमिक शाळांमधून सुरुवातीला गणित आणि विज्ञान हे विषय इंग्रजीमध्ये शिकविले जात होते. कारण आपण स्पर्धेच्या युगामध्ये आहोत.या स्पर्धेच्या युगामध्ये मराठी मुले टिकली पाहिजेत. त्यांनी स्पर्धेमध्ये रहावे, टिकावे या दृष्टीने गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी भाषेमध्ये शिकविण्याची सोय मराठी भाषिक शाळेमध्ये करण्यात आली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. रामनाथ मोते...

होती. त्याला सेमी इंग्रजीची संकल्पना देण्यात आली. हे धोरण फक्त माध्यमिक शाळेसाठी कार्यान्वित करण्याची सुरुवात झाली. त्यानंतर इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतच्या वर्गासाठी सेमी इंग्रजीचे धोरण स्वीकारले.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणतो की, राज्य सरकारच्या धोरणानुसार सेमी इंग्रजीची संकल्पना पहिल्या वर्गापासून सुरु करण्यात आली, आणि इयत्ता पहिलीपासून गणित आणि विज्ञान हे विषय इंग्रजी भाषेमधून शिकविण्याची मुभा मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये अंमलात आणण्यास शासनाने परवानगी दिली. हे दोन्ही विषय इंग्रजी भाषेमधून, इंग्रजी माध्यमातून शिकवावे . त्यामुळे अशा परिस्थितीत मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये गणित व विज्ञान हे दोन महत्वाचे विषय इंग्रजी भाषेतून शिकविले जातात, इंग्रजी माध्यमातून शिकविले जातात. इंग्रजी ही तृतीय भाषा म्हणून अपेक्षित असतांना आज खरोखर इंग्रजी माध्यमाच्या शाळांची गरज आहे काय? परंतु मराठी माध्यमाच्या शाळांना मारुन, मराठी भाषिक मुलांना शासनाच्या या चुकीच्या दुटप्पी धोरणामुळे आम्ही इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये जाण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देत आहोत. शासन त्यांना कां परवानगी देत आहे? मागील वर्षी 2 हजारपेक्षा अधिक शाळांना परवानगी देण्यात आली . शिक्षणाचा ढाचा ठरलेला असतांना आज खरेच आपल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळांची गरज आहे काय? इयत्ता पहिलीपासून इंग्रजी हा विषय शिकविला जात असतांना किंवा सेमी इंग्रजीच्या शाळा असतांना व तशी परिस्थिती असतांना या मराठी भाषिक असलेल्या महाराष्ट्र राज्यामध्ये 100-200 नाहीतर 2 हजारपेक्षा अधिक इंगजी माध्यमाच्या शाळांना परवानगी देत आहात, हे राज्य कुठे चालले आहे?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/ प्रथम श्री. सरफरे.... 16:40
श्री. रामनाथ मोते...

एका बाजूला मराठीचा विकास करण्याच्या संदर्भात समिती स्थापन करण्यात येत आहे. दुसऱ्या बाजूला मराठीचे खच्चीकरण करण्यात येते आहे. आणि दुसऱ्या बाजूला मराठीबद्दल बेगडी प्रेम आलेले आहे. म्हणून अशा प्रकारचे मंडळ स्थापन करण्यात येत आहे. मराठी बद्दल राज्य शासनाला खूप प्रेम आहे. राज्य शासनाला खऱ्या अर्थाने मराठी विकसित करायची आहे अशा प्रकारचे एक वातावरण निर्माण केले जात आहे.

सभापती महोदय, भाषा सूत्र स्वीकारण्यात आलेले आहे. हे करीत असताना शासन इतर राज्यांचे अनुकरण करणार आहे काय? किमान चांगल्या गोष्टी तरी अनुकरण करण्यात याव्यात अशी माझी सूचना आहे. मध्यंतरी मी हैद्राबादला आमच्या संघटनात्मक बैठकीसाठी गेलो होतो. हैद्राबादला उतरल्यानंतर त्या ठिकाणचा एकही माणूस माझ्याशी इंग्रजी आणि हिंदीत भाषेत बोलत नव्हता. मला ज्या ठिकाणी जायचे होते त्याठिकाणी कसे जायचे असा प्रश्न मला पडला होता. शेवटी मी एका कागदावर लिहून दिले तेव्हा मला त्या ठिकाणी नेऊन पोहचवण्यात आले. पण माझ याशी कोणीही इंग्रजी किंवा हिंदीतून बोलले नाही. या सभागृहाच्या सन्माननीय उपसभापती महोदयां बरोबर आम्ही बारा दिवस चीन, हाँगकाँग, थायलंड या देशांच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्या ठिकाणी आमची शिष्टमंडळे ज्या ज्या ठिकाणी गेली त्या त्या ठिकाणचे शासकीय अधिकारी, त्या ठिकाणचे राज्यकर्ते इंग्रजी भाषेमध्ये बोलत नव्हते. ते त्यांच्या भाषेमध्ये बोलत होते. ते चीनी भाषेतच बोलत होते. त्यांनी इंटरप्रिटर ठेवला होता. पण शेवटपर्यंत ते इंग्रजी भाषेत बोलले नाहीत. त्यांना इंग्रजी भाषा समजत नव्हती किंवा येत नव्हती अशातला भाग नव्हता. जर अशा प्रकारे इतर देशात घडू शकते, इतर राज्यामध्ये घडू शकते तर मग महाराष्ट्रामध्ये का घडू शकत नाही? इतर राज्यांना त्यांच्या राज्य भाषेचा जो अभिमान आहे तो आम्हाला आमच्या मातृभाषेबद्दल, आमच्या राज्य भाषेबद्दल, मराठी भाषेबद्दल का नसावा?.

सभापती महोदय, या राज्यामध्ये आता सीबीएसईच्या शाळांचे प्रमाण वाढत चालले आहे. हा विषय अनेक वेळा या सभागृहात चर्चेला आलेला आहे. सीबीएसई, आयसीएसईच्या शाळा ज्या राज्यामध्ये सुरु आहेत त्या राज्यातील जी राज्य भाषा असेल तो विषय शिकविण्याचे त्यांच्यावर बंधनकारक केलेले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये ज्या सीबीएसईच्या शाळा आहेत या शाळांना शासनाने ठणकावून सांगितले पाहिजे आणि त्यांना मराठी कम्पल्सरी केले पाहिजे. माजी शालेय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

शिक्षण मंत्री श्री. हसन मुश्रीफ, श्री. वसंत पुरके यांनी सांगितले होते की आम्ही पुढच्या वर्षी या शाळांमध्ये मराठी हा विषय कम्पल्सरी करणार आहोत. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना हे माहीत आहे. त्यांनी हा विषय खूप मनापासून आणि तळमळीने या ठिकाणी मांडला होता. त्यावेळच्या माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी या ठिकाणी आश्वासन दिले होते. ते रेकॉर्डवर आहे. पुढच्या वर्षी या शाळांनी मराठी हा विषय सुरु केला नाही तर त्या शाळांची एन.ओ.सी.काढून घेण्यात येईल. असे म्हटले होते. त्याप्रामणे या शाळांची एन.ओ.सी. काढून घेण्यात आली काय? मराठी हा विषय त्यांनी सुरु केला काय?तर त्याचे उत्तर नाही असे आहे. पण शासन त्यांच्या बाबतीत काहीही करु शकले नाही. खऱ्या अर्थाने या राज्यामध्ये मराठी भाषा टिकवायची असेल, खऱ्या अर्थाने मराठीला प्रेरणा आणि प्रोत्साहन द्यावयाचे असेल तर आपली मानसिकता बदलायला पाहिजे, आपले धोरण बदलायला पाहिजे आणि कणखरपणे मराठीच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

सभापती महोदय, 1973 साली मी येथे आलो त्यावेळी उल्हासनगरला सिंधी माध्यमाच्या 43 शाळा होत्या. आता त्या ठिकाणी मोजून तीन शाळा आहेत. उल्हासनगरला 90 टक्के सिंधी लोक रहातात. पण त्यांची सगळी मुले आता हिंदी माध्यमाच्या शाळांमधून इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये गेली आहेत. मी त्यांना विचारले की, तुम्ही घरी तरी सिंधी भाषेतून बोलता काय? तेव्हा अनेकांनी मला असे सांगितले की, सिंधी संस्कृति आता बुडाली आहे. आता आम्ही घरीसुध्दा सिंधी भाषेतून बोलत नाही. एक तर हिंदीतून बोलतो किंवा इंग्रजीमधून बोलतो. सभापती महोदय, अशा अन्य माध्यमांच्या ज्या शाळा आहेत त्यांना त्यांची जी मातृभाषा असेल ती प्रथम भाषा म्हणून घेण्याची त्यांना सवलत देण्यात यावी. आपण द्वितीय भाषा म्हणून हिंदी भाषा स्वीकारलेली आहे. मराठी भाषिक शाळांमध्येही ती स्वीकारलेली आहे. तृतीय भाषा इंग्रजी स्वीकारलली आहे पण ज्या अन्य माध्यमांच्या शाळा आहेत त्या शाळांमध्ये, जर गुजराथी माध्यमाची शाळा असेल तर या शाळेमध्ये प्रथम भाषा गुजराथी घेण्याची सवलत दिली पाहिजे.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सिंधी माध्यमाच्या शाळेत सिंधी असेल, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इंग्रजी असेल आणि त्रिभाषा सूत्रानुसार तिसरी भाषा म्हणून या महाराष्ट्र राज्यात प्रत्येक शाळेमध्ये मराठी हा विषय सक्तीचा करणार काय ? तो विषय सक्तीचा करावयास पाहिजे. तो विषय आपण सक्तीचा केलेला नाही. इतर भाषिक विद्यार्थी या राज्यामध्ये दोनच भाषा घेतात आणि तिसरी भाषा म्हणून अन्य कोणती तरी भाषा घेतात. ज्या भाषेमध्ये जास्त गुण मिळू शकतील ती भाषा घेतात. ते मराठी भाषा घेत नाहीत. मराठी भाषा न घेणाऱ्या सुध्दा शाळा आहेत. या राज्यामध्ये आम्ही ते सहन केले. हे धोरण आपल्याला बदलावयास पाहिजे. या राज्यामध्ये खऱ्या अर्थाने मराठीला चांगले दिवस आणावयाचे असतील तर याबाबतीत आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील साहित्य आणि संस्कृती टिकवावयाची असेल तर त्यादृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजे. श्री. मधुमंगेश कर्णिक हे मराठी साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी चांगले काम केले आणि करीत आहेत. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कॉम्प्युटर म्हणजे कॅल्क्युलेटर. कॉम्प्युटरला मराठीमध्ये शब्द नाही. आपण कॉप्युटरसाठी संगणक हा शब्द वापरतो. त्या क्षेत्रातील जी तज्ज्ञ मंडळी आहेत त्यांना एकत्र करुन तंत्रज्ञानाच्या संदर्भात एखादे चांगले पुस्तक तयार करणार आहोत असे श्री. मधुमंगेश कर्णिक यांनी सांगितले. अन्य भाषेतील ग्रंथांचे मराठीमध्ये भाषांतर होण्याची आवश्यकता आहे तसेच मराठी साहित्याचे अन्य भाषांमध्ये भाषांतर होण्याची आवश्यकता आहे. रेडियो, दूरदर्शन आणि इतर वाहिन्यांवर दिवसेंदिवस मराठीचा वापर कमी होत चाललेला आहे. किमान या राज्यामध्ये तरी रेडियोवर, दूरदर्शनवर आणि इतर वाहिन्यांवर मराठीचा आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. त्या वाहिन्यांवर मराठी कार्यक्रम होण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हरकत घेतील पण इंग्रजीमध्ये अशी म्हण आहे की, चॅरिटी बिगिन्स ॲट होम. आपण घरापासून सुरुवात करावयास पाहिजे. शासन स्तरावर आमच्या अधिकाऱ्यांकडून हे होते काय ?

सभापती महोदय, अपंग एकात्मिक विकास याजनेचा विषय आपल्याला माहीत आहे. 595 शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न होता. मला माहिती मिळत नव्हती. मी माहितीच्या अधिकारामध्ये

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

श्री. रामनाथ मोते ....

शासनाकडून माहिती मागितली. मी संपूर्ण फाईलची झेरॉक्स मागितली. ती फाईल मी मिळवली. ती फाईल चाळल्यानंतर असे लक्षात आले की, त्या फाईलवर ज्या टिप्पण्या लिहिल्या गेल्या आहेत त्या टिप्पण्या अधिकाऱ्यांनी इंग्रजीमध्ये लिहिलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये आपण मराठी राज्यभाषा स्वीकारलेली आहे परंतु आमचे अधिकारी इंग्रजीमध्ये टिप्पण्या लिहीत असतील आणि इंग्रजीमध्ये पत्रव्यवहार करण्यासाठी प्रेरित करीत असतील तर ही चिंतेची बाब आहे. त्यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. मराठी चित्रपट, मराठी कलावंत, मराठी साहित्यिक या सगळ्यांना एकत्र आणून त्यांचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता आहे. त्या सगळ्यांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने मराठी विकसित करण्याच्या संदर्भात प्रयत्न करावे लागतील. शासन फक्त घोषणा करते की, आम्ही सर्व स्तरावर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये, निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठीचा वापर करणार आहोत. न्यायालयांमध्ये सुध्दा मराठीचा वापर करणार आहोत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाला, सर्वसामान्य नागरिकाला न्यायालयाचे कामकाज समजावे म्हणून त्यांच्या मराठी मातृभाषेतून कामकाजाची माहिती तसेच मराठी भाषेतून न्यायालयाचा निकाल देण्याच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन सुध्दा तालुका स्तरावरील किंवा जिल्हा स्तरावरील न्यायालयांमध्ये कोणत्याही ठिकाणी मराठीमध्ये कामकाज झाल्याचे ऐकावयास मिळत नाही. त्या ठिकाणी मराठीमध्ये निकाल दिल्याचे ऐकावयास मिळत नाही. शालेय शिक्षण विभागात शालेय न्यायाधिकरण आहे त्यामध्ये शिक्षकाला आपली स्वत:ची बाजू मांडण्याची संधी दिली जाते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

त्याला वकील नेमण्याची आवश्यकता नाही. त्याठिकाणी मात्र न्यायालयाची भाषा इंग्रजीच गृहीत धरली जाते. प्रत्येक शिक्षक इंग्रजीमध्ये आपली बाजू मांडू शकेल असे नाही. त्याला इंग्रजीमध्ये न्याय दिला जातो. तो मराठीतून मिळण्याची आवश्यकता आहे. एका सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले आहे की, शालेय स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर मराठी भाषेसंबंधी प्रयत्न केले जात होते. आमच्या कॉलेज जीवनामध्ये दरवर्षी मराठी वाङमयाचा कार्यक्रम होत असे. सध्या महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात असे ऐकावयास मिळत नाही. यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. आपण बोली भाषेतून एकमेकांशी संवाद साधतो. परंतु असे म्हणतात की, 10 कोसाच्या अंतरावर भाषा बदलते. ठाणे जिल्हयामध्ये आगरी समाज आहे त्यांची भाषा वेगळी आहे, कोळी समाजाची भाषा वेगळी आहे. बहिणाबाईंची भाषा वेगळी आहे, व-हाडातील लक्ष्मणराव देशपांडे यांची व-हाडी भाषा वेगळी आहे. या बोली भाषांचा देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याला अनुमोदन देण्यासाठी व माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेचा विकास व्हावा, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या विषयावर आधारित ही चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करावे लागणे हीच आपली शोकांतिका आहे. ही शोकांतिका का झाली याचा आपण कधीच विचार केला नाही. आपल्या राज्यातील नोकरशहांपैकी किती अधिकारी मराठी आहेत व किती अमराठी आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या लक्षात आलेले नाही. या विभागाची सूत्रे श्री.अजयभूषण पांडे यांच्याकडे आहेत. हा विभाग सांभाळण्यासाठी शासनाला मराठी अधिकारी का मिळाले नाहीत ? म्हणजे एक प्रकारे आपणच आपल्या पायावर कु-हाड मारुन घेत आहोत. ज्या अधिका-यांना मराठी भाषेबद्दल अभिमान आहे, स्वाभिमान आहे, त्यांना बाजूला ठेवावयाचे आणि अन्य भाषिक अधिकाऱ्यांच्या हातात सूत्रे द्यावयाची. ज्यांना मराठी साहित्याबद्दल प्रेम आहे, जिव्हाळा आहे, आदर आहे, मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी तळमळ आहे अशांची या विभागात गरज आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेमध्ये जास्तीत जास्त शब्द आणले पाहिजेत. परंतु भाषांतर करणारे जे अनुवादक आहेत त्यांनी इंग्रजी शब्दांचे मराठी भाषांतर केलेले शब्द क्लिष्ट आहेत. इंग्रजीत ज्याला टंग ट्विस्टर म्हणतात. असे अनेक शब्द आहेत ते सोप्या भाषेत केले पाहिजे. आपण इंग्रजी भाषेतील अनेक शब्द मराठी भाषेत घेतले आहेत. त्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. त्याशिवाय आपले शब्द भांडार खुलणार नाही. मराठी भाषा समृध्द होणार नाही. आपण पटकन ध्वनिक्षेपक म्हणत नाही, माईक म्हणतो. आज मराठी भाषा जगभर पसरली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषा परदेशामध्ये समृध्द कशी होईल यादृष्टीने प्रयत्न केले आहेत. आपल्यापैकी त्याचा अनेकांना अनुभव आला असेल, ज्यावेळी आपण परदेशामध्ये असतो त्यावेळी 26 जानेवारी व 15 ऑगस्ट हे जोरात साजरे करतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...

तेथे गेल्यानंतर आपल्याला आपल्या भाषेची आणि संस्कृतिची प्रकर्षाने जाणीव होते. ते लोक देखील मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपल्या उपयोगी पडतात. सभापती महोदय, आपल्याकडे गुजराथी आणि हिंदी भाषेतील काही रुढ झालेले शब्द आहेत आणि त्या शब्दांना मराठी प्रतिशब्द शोधणे अवघड झालेले आहे. असे शब्द मराठी भाषेमध्ये सामावून घेऊन मराठी भाषेच्या शब्द भांडारामध्ये भर घालावी अशी माझी आग्रहाची सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे इंग्रजी भाषेच्या ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये 84 लाख इंग्रजी शब्द आहेत आणि आपल्याकडे फक्त 30,000 शब्द आहेत. सभापती महोदय, आपली मराठी भाषा ही लोकांच्या ओठावर यावयाची असेल तर आपल्या भाषेमध्ये दुस-या भाषेतील शब्दांची अधिकाधिक भर घातली पाहिजे. मघाशी या ठिकाणी आय.सी.एस.ई, सी.बी.एस.ई. शाळांचे उदाहरण देण्यात आले. हा प्रश्न या सभागृहामध्ये अनेक वेळा उपस्थित झाला. पण हे शासन अजूनही ढीम्म आहे. राज्य शासन स्वत: म्हणून मराठीच्या विकासासाठी कोणतेही प्रयत्न करताना दिसत नाही. तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांनी त्या राज्यांची भाषा त्या राज्यामध्ये बोलली जाणारच असाच नियम केलेला आहे. मग कर्नाटकामध्ये कानडी जाणणारा नसला आणि तामिळनाडूमध्ये तामिळ किंवा तेलगू भाषा जाणणारा नसला तरी त्याला ती भाषा शिकावी लागते. ही तेथील परिस्थिती आहे. मग आपण सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळातून मराठी शिकविण्याचा आग्रह का धरत नाही ? आपण मराठी आहोत, मराठी बोललो तर आपण बॅकफूटवर जातो ही आपली मानसिकता आपण बदलली पाहिजे. दोन मराठी माणसे फर्स्ट क्लास अे.सी. डब्यामध्ये बसली आणि बोलू लागली तर ती प्रथम इंग्रजीमध्ये किंवा हिंदीमध्ये संभाषण करतात. मी एकदा कोल्हापूरमधील माणसाला विचारले की, स्टेशन कोठे आहे ? तेव्हा त्याने सांगितले की, "साहब, वह सामने जो रास्ता है वह सीधा जाता है, उस रास्ते से राईट.... मी मराठीतून त्याला विचारले की तू हिंदीतून का उत्तर देतोस. म्हणजे मुळातच आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. तो मराठी माणूस हटकून हिंदीतून बोलला. जर असेच होणार असेल तर आपल्याला कुणाचाही तरणोपाय नाही. आपणच आपले तारणहार व्हायला पाहिजे. आपण अे.सी. कम्पार्टमेण्ट मधून, विमानातून जात असलो तर शेजारचा माणूस मराठी आहे हे समजायला 10 मिनिटे घालवावी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत

लागतात. प्रथम तो इंग्रजीमध्ये किंवा हिंदीमध्ये बोलायला सुरुवात करतो. परंतु कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये अशी परिस्थिती नाही. तामिळनाडूमध्ये आणि अन्य कोठेही जर दोन तमिळभाषिक एकत्र भेटले तर ते तमिळ भाषेतून बोलतात. दोन कानडी माणसे भेटली तर ती कानडी भाषेतून बोलतात. एवढेच कशाला दोन गुजराथी माणसे भेटली तर ते "केम छो" असे विचारतात. दुसरे लोक मार्केटिंगसाठी मराठी शब्द  हिंदी गाण्यातून वापरतात. परंतु आपले लोक मराठी भाषेतून बोलण्याचा अट्टाहास धरत नाही. ही आपल्या मराठी लोकांची मानसिकता आहे. श्री. करुणानिधी आणि जयललिता हे दोघे एकत्र भेटले की ते त्यांच्या भाषेत बोलतात. अशी सर्व परिस्थिती असताना आपणच हिंदी किंवा इंग्रजी भाषेतून का बोलतो. मराठी भाषेतून आपण का बोलत नाही ? सभापती महोदय, आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. शाळातून मराठी भाषा न शिकविण्याला कोण जबाबदार असेल तर ती या राज्यातील नोकरशाही आहे. या नोकरशाहीवर हा दोष येतो. तामिळनाडू आणि कर्नाटक सरकारने कोर्टाचा निर्णय बाजूला ठेवून त्यांच्या भाषेचा वापर सर्वत्र करण्याचे धाडस दाखवले. त्यांनी सांगितले की "आम्ही आमच्या मुलांना स्थानिक भाषेतून शिक्षण देणार."

...नंतर श्री. भोगले

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ SBT/          १७:००

डॉ.दीपक सावंत........

सभापती महोदय, मी काही दिवसांपूर्वी चेन्नईला गेलो होतो. तेथील शंकर नेत्रालयामध्ये डॉ.बद्रीनाथ हे जगप्रसिध्द नेत्र शल्यविशारद काम करीत आहेत. त्यांनी मला सांगितले की, तुमच्या मुंबईतील लोण आता आमच्याकडे येऊन पोहोचले आहे. मी याबाबत त्यांना विचारले असता ते म्हणाले की, दुकानांवरील पाट्या स्थानिक भाषेत लावण्यासाठी आंदोलन सुरु झाले आहे. तामीळनाडूमध्ये या आंदोलनाला सुरुवात झाल्यानंतर एका महिन्यात सर्व दुकानांवरील इंग्रजी भाषेतील पाट्या बदलून तामीळ भाषेत लिहिल्या गेल्या आहेत. आम्ही अशी मागणी केली तर आम्हाला का दोष दिला जातो? हे सर्वच राज्यात सुरु झाले आहे. अहमदाबाद, बडोदा, केरळ कुठेही जा. त्या त्या राज्याच्या भाषेत दुकानावरील पाट्या आढळून येतात. आम्ही तशी मागणी केली तर त्यात काय चुकले? तीन इंचाचे अक्षर असले पाहिजे, चार इंचाचे अक्षर असले पाहिजे असे सांगून यातही मोजमाप केले जात आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये मतदान झाल्यास त्याचा निकाल दर्शविण्यासाठी फलक लावलेला आहे. त्या फलकावर मराठीऐवजी इंग्रजी भाषेतील AYES, NOES, ABSENT, PRESENT हे शब्द आहेत. याठिकाणी कोणीतरी म्हटले की, Charity begins at home. १० कोटी रुपये देण्यापूर्वी हे महत्वाचे शब्द बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ४१४१ हा वाहन क्रमांक मराठीतून लिहिल्यास परिवहन विभागाकडून दंडाची आकारणी केली जाते. महाराष्ट्रात मराठीमध्ये वाहनाची नंबर प्लेट लावल्याबद्दल दंड आकारला जातो. हा कोणता कायदा आहे? परिवहन विभागाकडून सांगितले जाते की, परिवहन कायदा हा केंद्राचा आहे, त्यामुळे नंबर प्लेट इंग्रजीमध्ये असली पाहिजे. महाराष्ट्र वगळता देशात कोणत्याही राज्याकडून केंद्राचे लाड केले जात नाहीत. फक्त महाराष्ट्र राज्यातच केंद्राचे लाड केले जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी भाषणामध्ये वारंवार संविधानाचा उल्लेख केला. संविधान महाराष्ट्र राज्याला लागू असेल तर इतर राज्यांना देखील लागू आहे. त्या त्या राज्यांविरुध्द बोलण्याचे धाडस सन्माननीय सदस्य का दाखवित नाही? महाराष्ट्रामध्ये संविधान पुढे करुन मराठी भाषेची गळचेपी का केली जात आहे? आयसीएसई, केंद्रीय बोर्ड किंवा इतर कोणत्याही माध्यमाची शाळा असेल त्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी भाषा सुरु केली पाहिजे. आजही न्यायालयांमध्ये मराठीकरण झालेले नाही. पहिल्या पायरीला सुरुवात झाली आहे.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

परंतु न्यायालयांमध्ये सर्वार्थाने मराठीकरण कधी होणार आहे? मुंबई किंवा महाराष्ट्रातील आयकर कार्यालयांमध्ये अद्याप मराठी भाषेचा वापर केला जात नाही. आयकर कार्यालयाकडून जी पत्रे पाठविली जातात ती इंग्रजी भाषेतील असतात. त्या पत्रातील मजकुराचे भाषांतर अतिशय क्लिष्ट असते. नेमके काय म्हणायचे आहे हे कळून येत नाही.

सभापती महोदय, विमान उड्डाणाच्या वेळी आणि धावपट्टीवर उतरण्याच्या वेळी जी उद्‌घोषणा केली जाते ती मराठी भाषेतून कधीच केली जात नाही. मुंबईहून नागपूरला जा, संभाजीनगरला जा, पुण्याला जा. या विमान प्रवासात मराठी भाषेतून उद्‌घोषणा का केली जाऊ नये?

नंतर ३आर.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

जर चेन्नईमध्ये विमान उतरताना आणि उड्डाण घेतानाची उद्‌घोषणा तामिळ भाषेतून करण्यात येत असेल तर या राज्यात ती मराठीत का होऊ नये याचा विचार होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर "सीएसटी" हे छत्रपती शिवाजी टर्मिनसचे नामाभिधान0020झाले आहे. हा तर वेगळाच प्रश्न आहे.....अडथळा.....पण शासनाची इच्छाशक्ती, पॉलिटिकल विल असेल तर का होणार नाही हे मी सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांना सांगू इच्छितो. "मराठी असे अमुचि मायबोली" ही उक्ती खऱ्या अर्थाने आपल्याला रुढ करावयाची असेल तर एफ.एम. ही स्वतंत्र मराठी वाहिनी सुरु करावी, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या मराठीच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करीत असताना सुरुवातीलाच मी संत ज्ञानेश्वर माऊलींना अभिवादन करते की ज्यांनी मूठभरांच्या दावणीला बांधलेल्या संस्कृत भाषेत असलेली भगवत्गीत प्राकृत भाषेत आणून सर्वसामान्य माणसाच्या दारात नेण्याचा प्रयत्न केला त्या ज्ञानेश्वरांना मी प्रथम वंदन करते. जे वेद मूठभरांनाच माहीत होते ते ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मुखातून वदवून घेतले त्या ज्ञानेश्वरांची आठवण करुन मी माझे विचार व्यक्त करणार आहे. शासनाने सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 1 मे रोजी भाषा सल्लागार समितीची स्थापना केली असून त्यात न्या. नरेंद्र चपळगांवकर, आ.ह. साळुंके, सदानंद मोरे, लक्ष्मण गायकवाड, रमेश वरखेडे संजय पवार व इतर मंडळी या समितीवर आहेत. मला या सर्वांबद्दल अत्यंत आदर आहे. श्री. आ.ह.साळुंकेसारखा माणूस, ज्यांचे संपूर्ण आयुष्य सामाजिक बांधिलकी मानण्यात चालले असे लोक या समितीमध्ये असल्यामुळे मराठी भाषेला निश्चितच न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही. दिनांक 27.02.2007 च्या लोकसत्ता दैनिकाचा अंक माझ्या हातात आहे व त्यात कवि कुसुमाग्रज यांनी लिहिलेला "मराठीला हवा आहे आपल्या प्रेमाचा आधार" या शीर्षकाखाली एक लेख आहे तो मी प्रथम उद्धृत करणार आहे. त्यात कवि कुसुमाग्रज यांनी 12 व 13 ऑगस्ट, 1989 रोजी जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने भाषण केले होते त्याचा उतारा या लेखात दिलेला आहे. त्यांनी म्हटले आहे की, "मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोषावरील व साहित्यावरील संकट नाही. ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीपणावरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरीलही संकट आहे. समाजाची प्रगती व क्रांती स्वभाषेच्या किनाऱ्यावरच पेरता येते, असे क्रांतिकारकांच्या प्रणेत्याने म्हटलेले आहे. "संस्कृत भाषा देवे केली, प्राकृत काय चोरापासून झाली ?" असा संतप्त प्रश्न संत एकनाथांनी विचारला होता. आज तोच प्रश्न इंग्रजीच्या संबंधात विचारता येईल. संस्कृतचे स्तोम माजवून तेव्हाचा पुरोहित वर्ग आपली सत्ता समाजावर गाजवत होता. या मराठीवरील-लोकभाषा म्हणून सर्वात मोठे संकट आहे ते शिक्षणाच्या क्षेत्रात. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे, त्यातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे. राज्यभाषेचा स्पर्शही न होता, विद्यार्थी अंतिम पदवी परीक्षेपर्यंत पोहचू शकतो. हा चमत्कार मला वाटतो. फक्त महाराष्ट्रातच घडत असेल. आपली शेजारी राज्येही या बाबतीत अधिक जागरुक, अधिक अस्मिताशील आहेत. ख्रिस्ती धर्मसंस्थांनी म्हणजे कॉन्व्हेंटसनी आपले शिक्षणविषयक धोरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

आमूलाग्र बदलले ही एक चिंतेची आणि खेदाची बाब आहे. आज कॉन्व्हेंटची शाळा म्हणजे मुलांना महागडा गणवेष घालायला लावणारी, भरमसाठ फी आकारणारी, मुलांनी आणि त्यांच्या पालकांनीही चोवीस तास इंग्रजी बोलले पाहिजे असा आग्रह धरणारी शाळा, असे समीकरण झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांच्या काळातील मिशनऱ्यांच्या संस्थांचे हे स्वरुप नव्हते. तेव्हाच्या त्यांच्या बहुसंख्य शाळा समाजातील अर्थदुर्बल, निराधार, अपंग, जातीय चक्रात भरडल्या जाणाऱ्या वर्गासाठी असत आणि हे काम तेथे सेवावृत्तीने, "जे का रंजले-गांजले" या भूमिकेवरुन चालत असे. आता हे सूत्र बाजूला फेकून त्यांनी एकदम धनिकवणिक बाळाचे संपूर्ण विदेशीकरण करण्याचे नवे धोरण स्वीकारलेले दिसते. सेवावृत्तीची जागा व्यापारी वृत्तीने घेतलेली आहे. आज सर्वत्र शिक्षण व्यवस्था सामाजिक विषमतेचा गुणाकार करणारी आहे, समान संधीचे तत्व घटनेमध्ये कुलूपबंद होऊन पडलेले आहे. जेथे त्याचा प्राथमिक आणि पायाभूत आविष्कार व्हायला हवा, तेथेच ते अमाप देणग्यांच्या आणि शुल्कांच्या राशीत चिणून टाकण्यात आले आहे. आपले मूळ अवतारकार्य विसरुन मिशनच्या शाळा या दुरवस्थेला हातभार लावत आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

आपल्याला शिक्षण प्रसाराचे काम करावयाचे आहे की, मुलांच्या स्वाभाविक जीवन धारणेवर वेगळया जीवन पध्दतीचे आरोपण करावयाचे आहे ? असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे. वेगळी जीवन पध्दती निर्माण करणारी भाषा आम्हाला हवी आहे. भाषा ही सर्वसामान्यांचे दु:ख झेलणारी असली पाहिजे. अनेक वर्षापासून मराठी भाषेच्या आस्तित्वाचा संदर्भात संघर्ष चालू आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात सुरेख निर्णय घेतला व सल्लागार समिती स्थापन करुन 10 कोटी रुपयांचा निधी ठेवला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते परंतु शासनाचे अभिनंदन करीत असतांना या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मराठीसाठी राजकीय इच्छाशक्ती असली पाहिजे, सामाजिक इच्छा शक्ती पाहिजे केवळ सेक ऑफ दि ऑर्ग्यूमेंट म्हणून ऑग्यू करतो तसे होता कामा नये. मराठीला चांगले रुप द्यावयाचे असेल तर मराठीसाठी एक वेगळे खाते निर्माण केले पाहिजे, त्यासाठी वेगळा मंत्री असणे गरजेचे आहे, वेगळा सचिव असणे व त्यासाठी कमीतकमी 400 ते 500 कोटी रुपयांच्या निधीची व्यवस्था करणे ही खरी काळाची गरज आहे. मराठीसाठी शासनाने 10 कोटी रुपये उपलब्ध केलेले आहे परंतु हे 10 कोटी रुपये फार टोकन वाटतात. परंतु भविष्यामध्ये महाराष्ट्राचे सरकार यासाठी विचार करेल अशी मला खात्री वाटते.

सभापती महोदय, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय, मराठी विश्वकोश, पाठपुस्तक मंडळ इत्यादी क्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासन काम करते. खरे म्हणजे सल्लागार समिती स्थापन करतांना, वेगवेगळे मंडळ काम करतांना यांचा उद्देश भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या विविध कोषामध्ये सुधारणा आणि प्रचलित शब्दाचा अंतर्भाव करणे, कोष अद्यावत करणे असा असतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, इंग्रजी आणि मराठी भाषेमतील शब्दांच्या संख्यांमध्ये जो फरक सांगितला आहे तो डोळयात अंजन घालणारा आहे. या पध्दतीने मराठीचा शब्द कोष आणि त्याची श्रीमंती वाढवणे गरजेचे आहे. मराठी पारिभाषिक शब्दांच्या समस्या सोडवणे गरजेचे आहे. वेळोवेळी आढावा घेऊन मराठी अभिवृध्दीसाठी कार्यक्रम आखणे गरजेचे आहे. पारिभाषिक शब्दांचा विचार करण्यासाठी साहित्य मंडळ स्थापन केलेले आहे. साहित्य मंडळीच या विषयाला न्याय देऊ शकतील असे नाही. तर आरोग्यापासून ते क्रीडा क्षेत्रापर्यंत सर्व क्षेत्रातील मंडळींचा अंतर्भाव करणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

गरजेचे आहे. ग्रामीण भागाचे आपण खरे म्हणजे अभिनंदन केले पाहिजे. मराठी भाषेतील बोली भाषेची संस्कृती, लोक गीतांची संस्कृती ग्रामीण भागाने जपलेली आहे. परंतु नागरी भागातून मराठी हद्दपार होतांना दिसते. लोकलमध्ये जर दोन मैत्रिणी शेजारी बसल्या तर त्या इंग्रजीतूनच बोलत असतात. कॉलेजच्या परिसरात हिंदी किंवा मराठी बोलणारे कोणी सापडतच नाही. पाटलाच्या किंवा सावकाराच्या घरातील मुलगा किंवा मुलगी इंग्रजीमधून टकाटक बोलतात याचा त्यांना आनंद वाटतो. माझी मुलगी खूप चांगली इंग्रजी बोलते याचा त्यांना अभिमान वाटतो. "चांदोबा चांदोबा भागलास का, लिंबोणीच्या झाडामागे लपलास का" असे अगोदर बोलले जात होते परंतु आता हा चांदोबा कोठे तरी विसरला गेला आहे असे मला वाटते. या पध्दतीने मराठीवर अतिक्रमण व्हावयास लागले आहे.

शेवटी ज्ञान हे मातृ भाषेतूनच मिळत असते. आईला जर सही करता येत नसेल, तिला केवळ बोली भाषाच येत असेल आणि तिने आपल्या मुलीला इंगजी माध्यमाच्या शाळेत टाकले तर वर्गामध्ये काय शिकवले आहे हे तिची आई तिला विचारुच शकणार नाही. म्हणून मानसिक, बौद्धिक जी वाढ व्हावयास पाहिजे व त्याला एक सामाजिक अंग असावयास पाहिजे. समाजाचे दु:ख आपल्याला कळले पाहिजे. विद्यार्थी शिक्षण घेऊन मोठा झाल्यावर त्याला आदिवासींचे प्रश्न समजले पाहिजे. अजूनही गुडघाभर पाण्यात बाळंत होणा-या बायकांची दु:खे समाजात आहेत, डोंबा-याचा खेळ करुन जगणारी लेकरे आहेत. यांचे प्रश्न कसे सोडवायचे याची सामाजिक जाण असणारे नागरिक सध्याच्या अभ्यासक्रमातून निर्माण होणार नाही असा धोका नागरी भागात निर्माण झालेला आहे याची मला खंत वाटते. मला कै. यशवंतराव चव्हाणांची आठवण येते त्यांनी म्हटले होते की, "एक साहित्यीक म्हणून राजकारण करणा-या माणसाला, समाज कारणही करता आले पाहिजे, त्याला साहित्याचाही टच असला पाहिजे, राज्यामध्ये असलेल्या सर्व क्षेत्रांचा त्यांना अनुभव असला पाहिजे". साहित्यक म्हणून कै. यशवंतराव चव्हाणांनी परिपूर्ण माणूस म्हणून जो ठसा उमठवला होता तसा ठसा आजच्या राजकारण्यांनी उमठवण्याची गरज आहे. यशवंतराव चव्हाणांचा आदर्श डोळयासमोर ठेवून सहयाद्री सारखे मराठीच्या पाठीशी खंबीर ऊभे राहणे व इंग्रजीचे आक्रमण परतावून लावणे ही आज काळाची गरज आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.उषा दराडे...

भाषिक गरजा ही एक भूक आहे. ती भागवणे गरजेचे आहे. भाषा हे विकासाचे माध्यम आहे. अनेक वैज्ञानिक असे आहेत की, जे मराठी भाषेमध्ये शिकले आहेत. मी देखील मराठी भाषेमध्ये शिकले आहे. मी या सदनाची सदस्या आहे. मी देखील जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकले आहे. त्याचा मला स्वाभिमान वाटतो. त्यामुळे विकासाचे माध्यम म्हणून मराठी भाषेकडे पाहिले पाहिजे आणि त्या दृष्टीने विचार केला पाहिजे. मराठी भाषा संचालनालयावर मागील 10 वर्षापासून अधिकारी नेमलेला नाही. त्यामुळे मराठी भाषा आपण कशी काय वैश्विक करणार आहात ? हे विश्वची माझे घर म्हणणारे श्री ज्ञानेश्वर माऊली, माणसांमध्ये देव पहावा असे म्हणणारे श्री ज्ञानेश्वर माऊली, लहानपणी जगाला प्राकृत काय असते ते शिकविणारे श्री ज्ञानेश्वर माऊली...... शेक्सपिअरने इंग्रजी लिखाण केले म्हणून इंग्रजी ही वैश्विक भाषा होते. मग प्राकृतमधील भगवद्‌गीता वैश्विक का होत नाही ? भाषा संचालनालयावर गेल्या दहा वर्षापासून आपण एक साधा अधिकारी नेमू शकलो नाही. हे दुर्दैव आहे. भाषा कोण जपणार आहे ? काल परवा श्री.भालचंद्र नेमाडे यांची म.टा.मधील मुलाखत वाचली. त्यामध्ये सुंदर प्रकाश पाडला आहे. रामायण वाल्मिकीने लिहिले आहे ते खरे आहे काय ? त्या आधीची 29 रामायणे एका लिखिकेने शोधून काढली आहेत. हे सगळे मराठीतून आमच्या समोर येणार आहे की नाही ? खरा इतिहास आमच्यासमोर येणार आहे की नाही ? आमचे भाषा संचालनालय नीट काम करणार नसेल तर भालचंद्र नेमाडे यांच्या सारख्या माणसांनी, अ.आ.साळुंखे यांच्या सारख्या माणसांनी निर्माण केलेले मोठे क्षेत्र या महाराष्ट्रात जपले जाणार आहे की नाही, याचा सुद्धा विचार केला गेला पाहिजे. एक साधी गोष्ट आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील पुस्तके आपण मूठभर छापतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पुस्तके आपण मूठभर छापतो. पण नको ती पुस्तके मात्र आपण भारंभर छापतो. यातून आपण समाजाला काय दृष्टी देणार आहोत, कोणते पुरोगामित्त्व शिकविणार आहोत ? शाहू,फुले,आंबेडकरांचा काय विचार शिकविणार आहोत? भगतसिंह सारखी जीव देणारी माणसे, छत्रपती शिवाजी महाराजांसारखे हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहणारी माणसे मराठीमुळेच निर्माण होणार आहेत. इंग्रजी मुळे निर्माण होणार नाहीत. मराठी सिनेमे देखील आता पाश्चात्य

ॲड्.उषा दराडे...

शैलीचे अनुकरण करायला लागले आहेत. मराठी सिनेमातील चाली पाश्चिमात्य देशातील संगीताच्या चालीवर निघायला लागली आहेत. मला तर हे फारच अवघड दिसत आहे.

20 वर्षापासून निधी अभावी परिभाषा कोषाचे पुनर्मद्रण झालेले नाही. या गोष्टीचा आपण गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही ? मराठी भाषेच्या शाळांना परवानगी देण्याचे आपण बंद केले. या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांचे हेच म्हणणे आहे की, मराठी माध्यमांच्या शाळा झाल्या पहिजेत. मराठी शाळेच्या शाळा का बदं करीत आहात ? यासाठी जास्त पैसा लागला तरी चालेल. नाही तरी आपण आंतरराष्ट्रीय पातळीवरून पैसे आणत आहोत. लाखो रूपयाचे कर्ज काढत आहोत. शाळा आणि शिक्षण ही मूलभूत गरज आहे. हक्कामध्ये त्यांचे रूपांतर झाले पाहिजे. फक्त 6 ते 14 वयोगटातील नव्हे तर सर्व मुलांना जन्मापासून शिक्षणाचा हक्क मिळाला पाहिजे. तो पण अगदी पी.जी.पर्यंत. एवढेच नव्हे तर त्याला नोकरीची देखील हमी दिली पाहिजे. मी असे ऐकले आहे की, मराठी शाळेचा बृहत आराखडा तयार केला असून पुन्हा एकदा शाळांना परवानगी देण्यात येणार आहे. आपण इंग्रजी शाळा भरपूर देत आहात. कुठल्याही शाळेचे दार आपल्याला बंद करता येणार नाही. विद्येचे दार बंद करता येणार नाही आणि मराठी भाषेवर देखील अन्याय करता येणार नाही या गोष्टीची आपण दखल घेतली पाहिजे. आज महानगरपालिकेच्या आणि जिल्हा परिषदेच्या सगळ्या शाळा बंद पडत आहेत.

मध्य प्रदेश, आंध्रप्रदेश,कर्नाटक, गुजरात येथून मराठी भाषा हद्दपार झाली आहे. वारंवार सांगून सुद्धा अजूनही न्यायालयाचा कारभार इंग्रजीतून होत आहे. प्लेंट, दावा, जवाबदावा,अंतरिम आदेशाचे अर्ज ह्या सगळ्यांवर माझा शेतकरी डोळे झाकून सही करतो. न्यायालयामध्ये माझ्यासासठी काय चालले आहे हे त्याला काहीही माहीत नसते. वकील प्लीड करतो आणि जज निकाल देतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

पक्षकाराला आपल्या बाजूने निकाल लागला की विरोधात निकाल लागला एवढीच माहिती असते. माझ्या केसमध्ये यशाची शाश्वती आहे की नाही याची काहीही माहिती नसते. न्याय देवता आंधळी असते असे म्हणणे सोपे असते. परंतु आज लाखो गरीब लोकांचे दावे वर्षानुवर्षे चालत आहेत आणि त्याला त्या विषयी काहीही माहिती नसते. हे अत्यंत वाईट पध्दतीने चालले आहे. त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मराठी भाषेचा विकास, भाषा विषयक उपक्रम सक्षमपणे राबविण्यासाठी आपणास प्राधान्य द्यावे लागेल. मराठी भाषा संचालनालयाचा कारभार सामान्य प्रशासन विभागाकडे असल्यामुळे तो विभाग कायम दुर्लक्षित राहिला आहे. संचालनालयाच्या उदासीन भूमिकेमुळे मराठी भाषेविषयक शब्दकोशासह कित्येक उपक्रम अनेक वर्षापासून बंद आहेत. संचालनालयाच्या एकूण तरतुदीपैकी 80 टक्के रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होते. ही अतिशय वाईट गोष्ट आहे. मराठी अस्मितेची आणि अभिमानाची भाषा आहे पण ती रोजगाराची भाषा झाली पाहिजे. या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, आपल्या जाती व्यवस्था मनुवादाने निर्माण केल्या, त्यामुळे भाषेवर सामाजिक विषमतेचे सावट पसरलेले आहे. ते दूर करावयाचे असेल तर सामाजिक परिवर्तन केल्याशिवाय गत्यंतर नाही.

सभापती महोदय, मराठी भाषा साहित्यिकांनी जपली आहे. कवि श्री.विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील दोन ओळी वाचून दाखविते -

काळ्या मातीत, मातीत तिफण चालती,
वीज थय थय नाचती, ढग ढोल वाजविती

बहिणाबाई चौधरी म्हणतात -

धरतीच्या कुशीमध्ये,
बीजबियाणे रुजंल,
वरे हातरली माती,
जशी शाल पांघरली,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

संत नामदेव म्हणतात

नामा म्हणे आता लोपला दिनकर
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ

संत नामदेव म्हणतात ज्ञानेश्वर माऊली समाधिस्थ झालेली आहे, तो माझा बाप होता. म्हणजे नाती फक्त रक्ताने आणि जन्माने निर्माण होत नाहीत, जातीने निर्माण होत नाहीत, धर्माने निर्माण होत नाहीत तर नाती ही विचाराने आणि प्रेमाने निर्माण होतात. संत नामदेवांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वरानी रेड्यामध्ये देव पाहिला, ज्ञानेश्वरानी देव पाहिला, म्हणून तो माझा बाप होता आणि तो बाप आता गेलेला आहे. "माझे माहेर पंढरी, आहे भिवरेच्या तीरी" या ओळी पाहिल्या तर आपणास याच गोष्टींचा अनुभव येतो.

मी लहानपणी माझ्या आईला जात्यावर गाणे म्हणताना ऐकले आहे. आई पहाटे चार वाजता ऊठून जात्यावर दळण दळायला बसायची. दळण दळताना गाणं म्हणायची -

राम म्हणू राम राम
साखरेची रजी
रामाचं नाव घेता
रंगली जीभ माझी

ही मराठी आहे. रामा विषयी स्वत:च्या मनातील प्रेम माझ्या आईला कोणत्याही शाळेत शिकायला मिळाले नाही. ती पुढे म्हणायची -

राघु माझी ग मैना
दोन्ही अंब्याच्या शेंड्याला
राघुची लाल चोच
मैना मागती गोंड्याला

काय कल्पना शक्ती आहे ! हे साहित्य कोणी जपायचे ? हे साहित्य जपण्यासाठी शासन काही करणार आहे की नाही ? मराठी भाषेला आपण सर्वजण साथ देणार आहोत की नाही ?

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

कवी ग्रेस एके ठिकाणी म्हणतो -

अंबारीचा हत्ती नसे अंबारीचा स्वामी
लक्ष्मणाची रेघ आली ऊर्मिलेच्या कामी

वनवासात राम गेला, वनवासात सीता गेली, वनवासात लक्ष्मण गेला पण वनवास ऊर्मिलेने भोगला. पण ऊर्मिलेला प्रश्न विचारण्याची हिम्मत वाल्मिकेची सुध्दा झाली नाही. कवी ग्रेस लिहितात लक्ष्मणाने सीतेसाठी रेघ मारली, परंतु ती रेघ ऊर्मिलेच्या कामी आली. इतके मोठे प्रचंड तिचे दु:ख होते, जे ऊर्मिला बोललीच नाही. माझ्या देशातील बाई बोलतच नाही. पण दु:खाचा सागर तिच्या मनामध्ये असतो. हे दु:ख कवी ग्रेसने व्यक्त केले. ही मराठी कोण सांभाळणार आहे ? या मराठीला पांघरुण घालण्याची आणि सांभाळण्याची गरज आहे.

मी लहानपणी एक खेळ असत असे.

माझा पिंगा, तुझा पिंगा,
गेला वेशीत, मात्र निशित,
मात्रात खडा वहिनी रडा,
वहिनीचे लेकरु टॅ%%हा टॅ%%हा,
आम्हालाच म्हणते घ्या घ्या

कुठे गेले हे सगळे ? कुठे गेली फुगडीची गाणी ?

आज लोकगीताने मराठी सांभाळली आहे,तशी साहित्यिकांनी देखील सांभाळली आहे. मी महानायक वाचला आणि मला सुभाषचंद्र बोस यांच्याविषयी कौतुक वाटायला लागले. पत्नी एलिनी आणि मुलगी अनिता यांना सोडून ते जर्मनीमध्ये गेले.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे .............

त्या ठिकाणाहून आझाद हिंद सेनेचे स्वप्न घेऊन ते जपान मध्ये गेले होते. महानायक हे पुस्तक जर मराठीतून लिहिले गेले नसते तर मला त्यातील ब-याच गोष्टी समजल्या नसत्या. मी जरी इंग्रजी भाषेतून एल.एल.बी. चा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असला तरी मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छिते की, मराठीतून मला जे आकलन झाले आहे ते आकलन इंग्रजीतून झाले नसते. महानायक वाचल्यामुळे मला ब-याच गोष्टी कळावयास लागल्या. मी ज्यावेळी कर्णाच्या जीवनावर आधारित पुस्तके वाचली त्यावेळी मला असे कळले की, अर्जुना पेक्षा कर्ण निश्चितच श्रेष्ठ होता. अर्जुनाला विद्या दिली गेली होती परंतु कर्णाला मात्र विद्या दिली गेली नाही. तो कुंतीचा पुत्र होता, कर्ण श्रेष्ठ होता हे कृष्णाला माहीत होते. मात्र कृष्णानेसुध्दा अर्जुनाचीच बाजू घेतली होती. खरा नायक अर्जुन की कर्ण होता असे जर मला कोणी विचारले तर मी सांगेन की, कर्ण खरा नायक होता.तसेच एकलव्य हा खरा नायक होता . मराठीतील पुस्तके वाचल्यामुळे मला या गोष्टी समजल्या आहेत. संभाजीवर आधारित पुस्तके वाचल्यानंतर मला हे समजले की, त्यावेळी. अत्यंविधी करण्यासाठी कोणी पुढे यावयास तयार नव्हते म्हणून अंत्यविधीच्या वेळी मागासवर्गीय समाजातील महिलांनी एकत्रं येऊन जागा करुन दिली होती. संभाजीवर आधारित पुस्तके वाचल्यानंतर मला यागोष्टी समजल्या होत्या. त्याचप्रमाणे .श्रीमान योगी वाचल्यानंतर मला हे समजले की,छत्रपती शिवाजी महाराजांच्या हातामध्ये सातव्या वर्षी जिजाऊ माऊलीने नांगर दिला आणि पुणे शहर पुन्हा वसविण्याचा प्रयत्न केला होता. अशा प्रकारे हे सगळेज्ञान ,हा सगळा इतिहास , ही संस्कृती मराठीची पुस्तके वाचल्यानंतरच मला कळायास लागली.तो इतिहास तरुण पिढीला आपण शिकविणार आहोत की नाही ?

सभापती महोदय, अहिल्याबाई होळकर यांनी महिलांचे सैन्य कसे निर्माण केले, महिलांच्या सशस्त्र तुकडया कशा निर्माण केल्या याचा इतिहास , झाशीच्या राणीचा इतिहास आणि देशाच्या स्वातंत्र्य लढयाचा इतिहास आपण तरुण पिढीला शिकविणार आहेत की दूरदर्शनावरील मालिका शिकविणार आहोत ? या मालिकांमध्ये दोन बहिणींची भांडणे, सासू सुनेची भांडणे, नवरा बायकोची भाडणे इत्यादीची दृश्ये दाखविण्यात येतात. त्याचबरोबर एखाद्याचे आज लग्न झाल्याबरोबर दोन दिवसांनी घटस्फोट घेतल्याचे दृश्य दाखविण्यात येते.दूरदर्शनवरील मालिकांवर तसेच चित्रपटावर

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

अंकुश घालण्यात येणार आहे किंवा नाही ? जर त्यावर आपल्याला अंकुश घालावयाचा असेल तर मराठी भाषेच्या संदर्भात अधिक जागरुक रहावे लागेल तसेच महाराष्ट्राला वाचविण्यासाठी, मराठी वैश्विक भाषा झाली पाहिजे .मराठी भाषा फक्त या देशाच्या भिंतीपुरतीच मर्यादित राहता कामा नये तर संपूर्ण जगाला संदेश देणारी आणि जगातील शेतकरी, कामगार, शेतमजूर, कारखानदार, मध्यमवर्गीय, भटक्या आणि विमुक्त समाजाचे,आदिवासींचे प्रश्न सोडविणारी आणि जाती व्यवस्थेचे निर्मूलन करणारी एकमेव भाषा होईल, अशा प्रकारचा प्रयत्न या चर्चेअंती व्हावा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन मी माझे विचार संपविते. धन्यवाद .

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील माझे सहकारी आणि विधान परिषदेतील शिवसेनेचे गट नेते आदरणीय श्री.दिवाकर रावते यांनी मराठी भाषेच्या विकासाच्या आणि संवर्धनाच्या संदर्भात नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या देशावर ब्रिटीशांनी 150 वर्षे राज्य केले ही गोष्ट सर्व प्रथम आपण सर्वजणांनी मान्य करावयास पाहिजे. या देशातील बंगाल आणि महाराष्ट्र या दोन राज्यांमध्ये त्यांचे प्राबल्य आणि उठबस जास्त होती. त्यामुळे या दोन राज्यामध्ये मोठया प्रमाणावर आदोलने झाली असे चित्र तुम्हा आम्हाला पहावयास मिळाले होते. त्यावेळी आम्ही सर्वजण इंग्रजीचा हात धरुन चालण्याचा प्रयत्न करीत होतो आपली जी मराठी भाषा आहे, ती दर बारा कोसावर बदलत असली तरी त्या भाषेला विसरत विसरत आपण सर्वजण इंग्रजीच्या मागे लागलो आहोत परंतु एक गोष्ट आपण सर्वजण विसरतो की, आपल्या देशामधील इतर राज्यामध्ये आपण जेव्हा जातो तेव्हा त्या राज्याची भाषा तेथे वापरली जाते आणि ज्यावेळी दुस-या देशामध्ये जातो त्यावेळी दुस-या देशाचीच भाषा वापरली जाते ...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

आज बंगाल आणि महाराष्ट्रामधील लोकांच्या बोलीभाषेमध्ये थोडीसुधारणा झाली आहे. दोन महाराष्ट्रीयन माणसे एकत्र येतात तेव्हा एकमेकांना विचारतात किंवा दोन गुजराथी माणसे एकत्र भेटल्यानंतर एक-दुसऱ्यांना विचारतात की, "तमे केम छो, तमे क्या गया हता"... म्हणजे तू कसा आहेस, कुठे गेला होतास? अशाप्रकारे इंग्रजी भाषेमधून देखील आपण एकमेकांची विचारपूस करतो. आपला भारत देश स्वतंत्र झाल्यापासून मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा द्यावयास पाहिजे होता. आपल्या मराठी भाषेला अहंम किंमत दिली पाहिजे. यामध्ये कोणत्या पक्षाचे राज्य आहे, कोण राज्य करीत आहे या विषयामध्ये मी जात नाही. परंतु आज मोठ मोठया शहरांमध्ये, मुंबई, पुणे व नागपूरसारख्या मोठया शहरांमध्ये मराठी भाषा हद्दपार होतांना तुम्हा-आम्हाला दिसत आहे. महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेकरिता निरनिराळी मंडळे निर्माण केली, मराठी विश्वकोष, मराठी भाषा कोष निर्माण केले, मुंबई मराठी ग्रंथालय निर्माण केले, साहित्य संस्कृती मंडळ निर्माण केले . अशा वेगवेगळया संस्थांचे गठन केल्यानंतर सुध्दा सामान्य लोकांपर्यंत ही भाषा जावून पोहोचली आहे काय? त्याचे "नाही" असे उत्तर सापडते.

जेव्हा मी मुंबई महानगरपालिकेची सदस्या होते, त्यावेळी अट्टाहास करुन माझ्या मतदारसंघामध्ये मराठी ग्रंथसंग्रहालयाची शाखा सुरु केली. त्याठिकाणी चांगले ग्रंथ आणून ठेवले. तत्कालीन आयुक्त श्री. सदाशिवराव तिनईकर साहेबांच्या हस्ते त्या ग्रंथसंग्रहालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या कार्याला हातभार लावला. ते म्हणाले की, तुम्ही चांगले काम करीत आहात म्हणून आम्ही तुम्हाला मदत करतो. आज मी स्वत: त्याठिकाणी ग्रंथालयाची अवस्था जाऊन पाहिली आहे. त्या ग्रंथसंग्रहालयामधून एकही पुस्तक कुणीही वाचायला घेऊन जात नाही. तर मग आपण इंग्रजी भाषेचा आपल्यावर पगडा आहे असे म्हणावयाचे काय? आज आपल्यावर दूरदर्शनवर दाखविल्या जाणाऱ्या वेगवेगळया मालिकांचा पगडा पडला आहे, हे काय चालले आहे? हे माझ्यासारख्या लहान माणसाला उमजले नाही. ते समजून घेण्याची आवश्यकता असते जेव्हा आपण मराठी भाषेच्या विकासासाठी 10 कोटी रुपये खर्च करणार आहोत असे म्हणतो. त्यावेळी दुसऱ्या बाजूने 10 कोटी रुपये पुरणार नाहीत, हे पैसे वाढविले पाहिजेत असेही म्हणतो. याठिकाणी पैसे वाढविण्याचा प्रश्न नाही तर याव्दारे मराठी भाषेचा विकास करणार आहोत की नाही हा प्रश्न आहे. तो जर आपण केला नाही तर देशामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/ D/ KTG/

श्रीमती अलका देसाई...

या भाषेची किंमत शून्य आहे. या प्रश्नाशी संबंधित असलेल्या समितीवर माझ्या माणसाची वर्णी लागली किंवा दुसरा कुणी तरी माणूस त्या समितीवर गेला असे म्हणून आपला मूळ मुद्दा सफल होईल असे मला वाटत नाही. आणि म्हणून या विषयाची घोषणा केली गेली त्यावेळी या भाषेचा चांगल्याप्रकारे विकास व्हावा तो विकास होत असतांना महाराष्ट्रातील जनतेला स्वत:च्या भाषेचा आनंद मिळावा हे लक्षात घेतले पाहिजे.

मराठी भाषेच्या विकासाचा मुद्दा ज्यावेळी आपल्यापुढे येतो त्यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांची आठवण होते, संत तुकाराम महाराजांची आठवण होते, दिंडीमध्ये नाचलो म्हणून आपण मराठी भाषेचे कैवारी होत नाही. 300 वर्षे झाली तरी तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराजांच्या ओव्यांनी तुम्हा-आम्हाला भाषेचे ज्ञान दिले. त्या ओव्या अभंग आहेत, त्यामध्ये खंड पडलेला नाही. अखंडीतपणे त्या तुमच्या-आमच्यापर्यंत, लोकांपर्यंत एकरुप होऊन पोहोचतात. त्यावेळी सहजपणे आपल्या मुखातून "इंद्रायणी काठी देवाची आळंदी लागली समाधी ज्ञानेशाची" हा अभंग बाहेर पडतो. हे म्हणत असतांना संत ज्ञानेश्वर महाराज आपल्यासमोर उभे रहातात. आणि म्हणून अशावेळी राज्यकर्त्यांकडून मराठी भाषेचे संवर्धन झाले पाहिजे यासंबंधीची घोषणा केली जाते. तुमच्याकडे अशी काही योजना आहे का की, संत ज्ञानेश्वराच्या समाधीची घोषणा केली त्याप्रमाणे त्यांच्या वाङ्मयीन साहित्याची निर्मिती कुणाकडून करुन घेणार आहात, आणि ती लोकांपर्यंत पोहोचविणार आहात? याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

सभापती महोदय, शिवाजी महाराजांचे आपण सर्वजण गुणगान गातो. शिवाजी महाराजांच्या जीवावर या महाराष्ट्रामध्ये आपण सगळेजण राजकारण करतो.

शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती,
देव, देश अन धर्मासाठी प्राण घेतले हाती.

हे सांगण्यासाठी तलवार हातात घेण्याची गरज भासत नाही किंवा लढाई करण्याचीही गरज भासत नाही. पण त्या भाषेमध्ये जी उर्मी आहे ती उर्मी आपल्याला ताकद देते. अशा प्रकारची ताकद आपण निर्माण करणार आहोत काय? याचा विचार होणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी केलेल्या सूचनेचे मी समर्थन करते. आयसीएसई आणि सीबीएसईच्या शाळांना एवढे डोक्यावर कां घेण्यात येते? संपूर्ण महाराष्ट्रात आमच्या मुलांना आम्ही इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शिकवायला सुरुवात केलेली आहे. अत्यंत चांगली आणि स्तुत्य अशी ती गोष्ट आहे. परदेशात शिकायला गेल्यानंतर आपल्याला इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील आायसीएसई आणि सीबीएसईच्या शाळांना मराठी सक्तीचे करण्यात येणार आहे काय हा महत्वाचा मुद्दा आहे. या शाळांमध्ये धनदांडग्यांची मुले शिक्षण घेतात म्हणून त्यांच्यासमोर एवढे नतमस्तक व्हायचे काय याचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयं श्री. पाचपुते सभागृहात बसलेले आहेत. सभापती महोदय, या सदनाच्या माध्यमातून मी माननीय मंत्रिमहोदयांना सुचवू इच्छिते की, आयसीएसई आणि सीबीएसईच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली पासून मराठी सक्तीचे करण्यात यावे. तरच शासनाच्या घोषणांचा उपयोग होईल. अन्यथा शासनाच्या घोषणा वर्तमापत्रात छापून येतील. आम्ही ती कात्रणे कापून घेऊ आणि आमच्या घरी बसू. अशा प्रकारचा विरोधाभास निर्माण होईल.

सभापती महोदय कुसुमाग्रजांच्या एका ओळीची या ठिकाणी मला आठवण होते त्यांनी असे म्हटले होते की, "आमच्या मराठी भाषेच्या शिरावर सोन्याचा मुकुट आहे पण अंगावर मात्र फाटकी-तुटकी वस्त्र घेऊन आज मराठी भाषा दैन्यावस्थेत मंत्रालयाच्या दारात उभी आहे." असे चित्र राज्यकर्त्यांना आणि आम्हाला बघायचे आहे काय? याचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ D/

श्रीमती अलका देसाई....

सभापती महोदय, मला या ठिकाणी इतर राज्यांची आठवण करुन द्यावीशी वाटते. इतर राज्यांमध्ये त्या राज्यांच्या भाषेतून ज्या गोष्टी होतात त्या पध्दतीने महाराष्ट्राने सुध्दा मराठी भाषेचा विकास होण्यासाठी मग ती कायद्याची भाषा असेल,वैद्यकीय भाषा असेल, मराठी साहित्याची भाषा असेल किंवा अजून कुठलीही भाषा असेल ती सगळी मराठीतून असली पाहिजे. मराठी भाषेचा आग्रह धरत असताना त्यामध्ये राजकारण आणता कामा नये. मराठी भाषेच्या मुद्दावर राजकारण होता कामा नये असे मला या ठिकाणी नम्रपणे सूचवावयाचे आहे. सभापती महोदय, असे म्हटले जाते की,

मराठी असे आमुची मायबोली
परी आज ही राजभाषा नसे,
तिचे पुत्र आम्ही तिचे पांग फेडू,
तिला बसवू वैभवाच्या शिरी.

वैभवाच्या शिरावर या भाषेला बसवत असताना या सगळया गोष्टींचा विचार करण्यात येणार आहे काय याचा देखील विचार व्हावा असे मला याठिकाणी आग्रहाने आणि नम्रतेने सुचवावेसे वाटते. सगळयांना इंग्रजी येते आणि ते आले पाहिजे. कारण पुढे जाण्यासाठी या भाषेची गरज आहे. इंग्रजी भाषेबरोबरच जरी महाराष्ट्रावर इंग्रजांनी राज्य केले असेल आणि त्याचे काही पडसाद या ठिकाणी ठेवले असले तरी प्रत्येकाने ते बदलायला शिकले पाहिजे. हा बदल करीत असताना मराठी भाषा समृध्द कशी होईल. मराठी भाषेचा विकास कसा होईल आणि ती भाषा सगळयांची कशी होईल याचा आपण सगळयांनी विचार करु या. एवढेच बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या सभागृहामध्ये महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केली आणि आपले निवेदन केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो तसेच मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. त्याचबरोबर आतापर्यंत बहुतेक सर्व वक्त्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत ते सोडून अन्य काही मुद्यांवर लक्ष वेधणे ही जबाबदारी माझ्यावर येते. त्या जबाबदारीच्या अनुषंगाने बोलत असताना मला कवी बा.भ.बोरकर यांच्या कवितचे शब्द आठवतात. 'अमृत घट भरले तुझ्या घरी, का वणवण फिरशी बाजारी.' एवढ्या समृध्द असलेल्या आपल्या मराठी भाषेवर अशी दयनीय अवस्था आपल्या काही चुकीच्या धोरणांमुळे येते यासंबंधात मी थोडक्यात बोलणार आहे.

पहिला मुद्दा असा येतो की, मराठी भाषेच्या विकासाचे तीन टप्पे होतात. एक म्हणजे स्वातत्र्यपूर्व विकासाचा टप्पा. मी त्याच्या खोलात जात नाही. स्वातंत्र्यपूर्व विकासाच्या टप्प्यामध्ये आपण मोडी भाषेमध्ये लिहीत होतो. मराठी भाषा सार्वत्रिक होती, महाराष्ट्रामध्ये बोलली जात होती परंतु तिला राजभाषा म्हणून मान्यता नव्हती असा एक टप्पा आला. 1955-56 साली आपण मराठी माध्यमातून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा चालू केली आणि तिथून मराठी भाषेला एक प्रतिष्ठा प्राप्त होण्यास सुरुवात झाली. ती भाषा आपण राजभाषा म्हणून स्वीकारली. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये बोलत असताना गेल्या पन्नास वर्षामध्ये सुध्दा न्यायालयासह अनेक क्षेत्रांमध्ये मराठीचा सर्रासपणे उपयोग केला जात नाही ही वस्तुस्थिती आपण सर्व अनुभवत आहोत. हे जरी खरे असले तरी सुध्दा गेल्या पन्नास वर्षामध्ये मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून एका बाजूने शासकीय पातळीवर झालेल्या प्रयत्नांचाही उल्लेख या निमित्ताने करण्याची आवश्यकता आहे. उदा. मराठी भाषेचे व्याकरण आणि त्या व्याकरणामध्ये असलेली क्लिष्टता भाषा संचालनालयाने काढली आणि मराठी भाषेचे 16 नियम हे व्याकरणाचे नियम म्हणून घोषित केले. आज मराठी शुद्धलेखन त्या 16 नियमानुसारच केले जाते. त्याचबरोबर आपण मराठीमध्ये देवनागरी लिपी स्वीकारली. हिंदीचीही लिपी देवनागरी आहे आणि मराठी भाषेचीही लिपी देवनागरीच आहे. पण यामध्ये प्रचंड मोठा संस्कृत भाषेचा प्रभाव होता. त्यातील काही बोजड आणि क्लिष्ट वर्ण काढून टाकणे आवश्यक होते. तेही काम भाषा संचालनालयाने केले आणि मराठी भाषा सुलभ करण्याचे काम केले. हे भाषा संचालनालयाचे काम आपण नजरेआड करु शकत नाही म्हणून मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. भगवान साळुंखे .....

त्याचा मुद्दाम या ठिकाणी उल्लेख करतो.

या ठिकाणी संत साहित्याचा उल्लेख झाला. त्याचबरोबर गेल्या पन्नास वर्षामध्ये आपल्या साहित्यामध्ये दलित साहित्य सुध्दा प्रचंड विकसित झाले. त्याचबरोबर मध्यंतरी एक दशक असे येऊन गेले की, आत्मकथा खूप गाजल्या गेल्या. आता वास्तववादी साहित्याचे मोठे युग साहित्याच्या क्षेत्रामध्ये येत आहे आणि गेल्या दहा वर्षामध्ये विज्ञानवादी साहित्याचा मोठा पगडा मराठीमध्ये निर्माण होत आहे. साहित्याच्या क्षेत्रामध्ये मराठीचा होणारा विकास त्याला शासनाचा प्रतिसाद किती, शासनाचे प्रोत्साहन किती हा विषय कदाचित वादाचा असू शकेल परंतु गेल्या पन्नास वर्षामध्ये मराठीतून जे उच्च विद्याविभूषित झाले त्यांनी मराठी भाषेच्या साहित्याची प्रचंड सेवा केली आहे, ही गोष्ट नजरेआड करुन चालणार नाही. आता वादाचा मुद्दा असा येतो की, 1991 साली आपण जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण वगैरे सर्व स्वीकारले. आपण हे धोरणात्मक बदल स्वीकारले आणि या बदलाबरोबरच आपल्याकडे संगणकीकरण आले आणि इंग्रजी भाषेचा प्रचंड मोठा प्रभाव वाढत गेला आणि दुर्दैवाने तो प्रभाव महाराष्ट्रामध्ये प्रचंड वाढत गेला. गेल्या वीस वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये मराठीवर इंग्रजी भाषेचा एवढा प्रभाव वाढेल, इंग्रजी भाषेचे एवढे शब्द मराठीमध्ये येतील आणि मराठी माणसाला मराठी बोलणेच अवमानकारक वाटेल, इंग्रजीप्रचूर बोलणे, इंग्रजी शब्द वापरणे किंवा इंग्रजीमध्ये बोलणे म्हणजे मी खरा विद्वान आहे असा गैरसमज निर्माण होणे, इतके गेल्या वीस वर्षात घडले आहे. आता आपण एका विशिष्ट टप्प्यावर आलो आहे. गेल्या तीस वर्षामध्ये मराठी भाषेचा विकास घडला पण गेल्या 20 वर्षाचा जो संधीकाळ आहे त्या संधीकाळामध्ये मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचा प्रचंड मोठा प्रादुर्भाव वाढला आहे आणि आता बोली भाषा तर नामशेष झालीच आहे. आपण जरी राजभाषा म्हणून मराठी भाषा वापरत असलो तरी आपण ती पूर्णांशाने वापरत नाही आणि दुसऱ्या बाजूने मराठी भाषिकाकडे आणि मराठी भाषेकडे बघण्याचा उपहासाचा दृष्टीकोन तयार होत आहे हे वाईट आहे. याला आपण सर्वच जबाबदार आहोत. त्याबाबत मी राजकीय बोलीभाषेत बोलण्यास तयार नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

मराठी माणसाचे दोन दोष त्याला कारणीभूत आहेत असे मला वाटते. एक दोष आमचा असा आहे की, आम्ही जे लढून मिळवितो ते वाटाघाटीत गमवितो. मराठी राज्य मिळविण्यासाठी 105 हुतात्मे झ ााले. हा सर्व इतिहास खरा आहे. परंतु वाटाघाटी करीत असताना गेल्या 50 वर्षामध्ये मराठी भाषा व मराठी राज्य हेच आपण गमवित निघालो आहे. एका अर्थाने त्याला राजकीय दिवाळखोरीचे लक्षण आहे, असा शब्द वापरला तर ते वावगे होणार नाही.

दुसरा दोष असा आहे की, येणा-या पाहुण्याचा आम्ही पाहुणचार करतो, पण कित्येक वेळेला त्या पाहुण्याच्या हातात घराची सूत्रेच देऊन टाकतो. आज आमच्याकडे मराठी माणसांनी महाराष्ट्राची सूत्रे बाहेरुन आलेल्या भाषेच्या ताब्यात दिली आहेत आणि त्या भाषेच्या माध्यमातून ते लोक राज्यात येत आहेत आणि नाममात्र मराठी भाषिक राज्य करतो आहोत. हे कर्नाटक राज्यात घडले नाही, हे मध्य प्रदेशात घडले नाही, हे तामिळनाडूत घडले नाही, गुजरात राज्यामध्ये घडले नाही, पण दुर्दैवाने हे महाराष्ट्रात घडत आहे. एका बाजूला मराठी विकसित होत गेली, प्रगल्भ होत गेली, मराठी साहित्यिकांनी, मराठी अभ्यासकांनी मराठी विद्यापीठांनी व शाळांनी सुध्दा मराठी विषयाचा चांगला विकास केला तरी सुध्दा या दोन दोषांना बळी पडून आम्ही मात्र मराठीकडे दुर्लक्ष करीत आहोत. आता इंग्रजीची प्रचंड वाढ करीत आहोत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपण इंग्रजीला किती बळी पडलो आहोत ते सांगितले. त्याचे कारणही सहज लक्षात येण्यासारखे आहे. ते कारण मला मात्र येथे नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, दोन गोष्टींचा उल्लेख पुनरावृत्तीचा दोष पत्करुन बोलतो. एक म्हणजे आमची मराठी भाषा ही राजभाषा म्हणून चांगली राहिली पाहिजे, समृध्द असली पाहिजे. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. दुसरा असा मुद्दा आहे की, तो म्हणजे आमच्या महाराष्ट्राच्या शिक्षण पध्दतीमध्ये मराठी माध्यमाच्या शाळा हळूहळू बंद पाडण्याचे एक प्रचंड षडयंत्र रचले जात आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेत घेत, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी 1962 साली 12 वर्षांच्या आतील मुलांना मोफत शिकण्याची व्यवस्था केली आणि खेडयापाडयामध्ये माध्यमिक शाळा सुरु करण्यात आल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रचंड प्राथमिक शाळा निघाल्या. शिवाजी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.भगवान साळुंखे....

विद्यापीठासारखी, मराठवाडा विद्यापीठासारखी अनेक विद्यापीठे स्थापन झाली. तालुक्याच्या पातळीवर कला, वाणिज्य व विज्ञानाची महाविद्यालये सुरु झाली. त्याच्यातून शिक्षणाचा प्रचंड प्रसार झाला. आज त्याच ठिकाणी अर्थोपायधिष्ठीत शिक्षण व्यवस्था प्रस्थापित करण्याचे एक प्रचंड षडयंत्र रचले जात आहे. करा फी गोळा, चालवा तुमच्या शाळा, असा संदेश दिला जात आहे. आमच्या जनआंदोलनासमोर सरकारला वाकावे लागले. कायम मराठी माध्यमांच्या शाळांचा कायम हा शब्द काढावा लागला. मराठी माध्यमांच्या शाळांमधील माणूस हा भिकारी असतो ही शासनाची मानसिकता आहे. अनुदानाची भाषा ही शिक्षणात असूच नये. पण दुर्दैवाने ती आहे. शाळांना अनुदान देणे ही शासनाची जबाबदारी आहे. मेहेरबानीचा हा विषय नाही. कारण सामान्य माणूस निढळाच्या घामातून महसूल भरत असतो त्याच्यातून रयतेला शिक्षण देण्याचे अभिवचन दिले आहे. त्याचेच भान हरपले आहे. त्याच्यातून मराठी शाळा बंद पाडल्या जात आहेत. कारण त्यांना अनुदान द्यावे लागते, निधी द्यावा लागतो. त्यासाठी इंग्रजी शाळांचे स्तोम माजविले जात आहे. त्याचा परिणाम पूर्व प्राथमिक शाळा, ज्याला लोअर के.जी.असे म्हटले जाते तेथे 50 हजार ते 1 लाख रुपये घेणा-या शाळांची व्यवस्था निर्माण केली जात आहे. तेथे इंग्रजीवर प्रेम आहे असे मला वाटत नाही. राज्यकर्त्यांनी शिक्षणातील आर्थिक सहभाग काढून घेण्याचे जे षडयंत्र रचले आहे त्या षडयंत्रापोटी राज्यकर्ते इंग्रजी शाळांना खतपाणी घालत आहेत आणि महाराष्ट्रातील बहुजनांच्या, हरिजनांच्या शाळा बंद पाडत आहेत. त्यांच्या हातून महत् पाप घडत आहे ते किती भयंकर आहे हे माझ्या दोन भगिनींनी सांगितले आहे.

यािठकाणी बहिणाबाईंचा उल्लेख झाला आहे. ज्ञानेश्वर महाराजांचा उल्लेख झाला. मराठी संस्कृतीचा उल्लेख झाला, मराठी भाषेचा उल्लेख झाला, हे सर्व नष्ट करुन मम्मी डॅडीची संस्कृती निर्माण केली जात आहे. औक्षण थांबवून येथे केक कापण्याची संस्कृती आणली जात आहे. या देशातील खेडयापाडयामध्ये ज्या तालमीतून आम्ही व्यायाम करीत होतो तेथे आता बियर बार संस्कृती आणली जात आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण या सगळया माध्यमातून हे सर्व पाहिजे होते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भगवान साळुंखे...

आम्हाला पाश्चिमात्यकरण अभिप्रेत आहे की आधुनिकीकरण अभिप्रेत आहे ? या प्रश्नाचे उत्तर आम्हाला आधुनिकीकरण अभिप्रेत आहे असे आहे. आधुनिकीकरणाच्या माध्यमातून आपल्याला संगणकाचा स्वीकार करावा लागेल, त्यामध्ये तज्ज्ञ व्हावे लागेल. हे सर्व होत असताना जो पाश्चिमात्यांचा चंगळवाद आमच्या संस्कृतीमध्ये रुजत चालला आहे त्याकडे आपणाला गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी उल्लेख केला की दूरदर्शन वाहिन्यावरुन ज्या काही मालिका दाखविल्या जात आहेत त्यामधून अनैतिक संबंधाचे चित्रण दाखविले जात आहे. ह्या गोष्टी सहज आहेत आणि त्या मानवी जीवनाशी निगडित आहेत, तो मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे अशा प्रकारचे विचार नव्या पिढीवर बिंबविले जात आहेत. हे पाश्चिमात्यिकरण आपल्याकडे झपाट्याने अवतरत आहे. हया सर्व गोष्टी आपल्याला रोखाव्या लागतील. धरणे किती बांधली, रस्ते किती बांधले, विकासाच्या योजना किती आणल्या या परिभाषेमध्ये आम्ही राज्याच्या प्रगतीचा आढावा घेत असतो आणि तो घेणे आवश्यक आहे. पण त्याच बरोबर आमच्या राज्याचे जे भव्य दिव्य आहे, ज्या संस्कृतीचे तुम्ही आम्ही वारसदार आहोत त्या सर्व गोष्टी जतन करण्यासाठी भान ठेवण्याची आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने ते भान ठेवले जात नाही. मराठी माणूस हा एका वेगळया विचारसरणीत वाढलेला आहे. तो आपल्या राज्याकडे मग राज्यकर्ते कोणी मुख्यमंत्री असतील, कोणी पंतप्रधान असतील, तेच आपले आदर्श आहेत, तेच प्रमाणभूत आहेत आणि त्यांचे अनुकरण आम्ही करायचे असते असे मानणारा एक भोळा, भाबडा आणि सरळ असा मोठा वर्ग या महाराष्ट्रामध्ये आहे. 10 कोटीच्या या महाराष्ट्रामध्ये 8-9 कोटी मंडळी अशी आहेत की राजा ज्या वाटेने नेईल त्याच वाटेने जाणारी आहेत. पण राजा चुकला आहे आणि चुकीच्या वाटेने जाणे बरोबर नाही असे म्हणणारी माणसे फार थोडी आहेत. मग राजाची जबाबदारी वाढते, पर्यायाने राज्य सरकारची जबाबदारी वाढते. आपण जे काही करीत आहोत त्याचे दूरगामी परिणाम काय होणार आहेत याकडे राज्यकर्त्यांचे लक्ष असले पाहिजे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी आदरणीय कै.मधुकरराव चौधरी यांचा आवर्जून उल्लेख करतो. कालपरवा त्यांचे निधन झाले. ते शालेय शिक्षण मंत्री असताना त्यांनी देदिप्यमान असे निर्णय घेतलेले होते. निधन होण्यापूर्वी ते शिक्षणाविषयी चर्चा करीत होते आणि आजची परिस्थिती





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भगवान साळुंके...

पाहून फार व्यथित होत होते. ते खाजगीत म्हणायचे की, आम्ही महाराष्ट्रामध्ये काय करायला निघालो होतो आणि काय घडते आहे. आज मंत्रिमंडळातील माझ्या सर्वच भावंडांना असे सांगेन की, आज ज्या दिशेला या महाराष्ट्राला तुम्ही घेऊन चालला आहात ती दिशा पाहता आणखीन 10-20 वर्षानंतर, जेव्हा केव्हा तुम्ही थकून भागून जागेवर बसाल त्यावेळी "हेची काय फळ मम तपाला" असे म्हणण्याची वेळ दुर्दैवाने तुमच्यावर येऊ नये असे तुम्हाला वाटत असेल तर मी त्यांना सांगेन की, या प्रश्नाकडे तुम्ही राजकीय परिभाषेतून बघू नका. तुम्हाला जागतिकीकरण हवे आहे काय, वैश्विकीकरण हवे आहे काय, खाजगीकरण हवे आहे काय या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या पलीकडे परिस्थिती गेलेली आहे. ही परिस्थिती आपण स्वीकारलेली आहे. आपला 20 वर्षाचा व्यवहार झालेला आहे. आपले मागे येण्याचे दोर कापले गेले आहेत. त्यामुळे आपल्याला हे करावेच लागेल. पण हे करत असताना आमचेपण, आमची संस्कृती, आमची भाषा जतन करण्याचे भान आम्ही हरवित आहोत. हे भान हरविले जाऊ नये एवढेच राज्यकर्त्यांना मी सांगेन. त्यादृष्टीने या प्रश्नाकडे त्यांनी गांभीर्याने बघावे. केवळ 10 कोटी रुपये देऊन हा विषय होण्यासारखा नाही. यासाठी सदनातील दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या चांगल्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत त्या सर्व सूचना विचारात घ्याव्यात.

मी शेवटीची सूचना राज्यकर्त्यांना करु इच्छितो ती म्हणजे या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने या विषयाची ज्याप्रमाणे सभागृहामध्ये चर्चा झाली त्याप्रमाणे बाहेरही या क्षेत्रातील दिग्गजांचे विभागनिहाय चर्चासत्र घ्यावे आणि महाराष्ट्राची मराठी भाषा महाराष्ट्रामध्येच वाचविण्यासाठी आणि मराठी संस्कृती टिकविण्यासाठी काय काय केले पाहिजे यासंबंधीच्या सूचना त्यांच्याकडून घ्याव्यात आणि त्या सूचना घेऊन मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, तिचे जतन करण्यासाठी लवकरात लवकर पावले उचलावीत अशी मी माननीय मुख्यमंत्री, माननीय शालेय शिक्षण मंत्री, उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो. या विषयासाठी राज्यकर्त्यांना थेट लोकांपर्यन्त पोहोचण्याची आवश्यकता असून तेथपर्यन्त पोहोचण्याचे औदार्य राज्य सरकारने दाखववावे अशा त-हेची पुन्हा विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. भोगले...

**तालिका सभापती** (श्री.चंद्रकांत पाटील) : आजचे अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात आले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 26 जुलै, 2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 11.00 ते 12.45 या वेळेत विशेष बैठकीत कोकण विकासाच्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 55 मिनिटांनी सोमवार, दिनांक 26 जुलै, 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही